VOLUME 5 ISSUE 6 JUNE 2020


*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra**

# *MODLIB*

## *E-Bulletin of Library and Information Centre*




**Published by** : Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.
**Editor** : Dr. Shantashree Sengupta, Librarian.
**Editorial Assistant** : Mrs. Sarika Sable
**Website** : http://www.mcasclib.com/
**E-mail** : librarian@moderncollegepune.edu.in

Image Courtesy: <a href='https://www.freepik.com/vectors/medical'>Medical vector created by freepik - www.freepik.com</a>

# Table of Contents


| Sr.No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 1 | **Progressive Education Society's Chairperson** | |
| | ***Prof. Dr. Gajanan R. Ekbote invited as Resource Person*** | **3 - 4** |
| 2 | **International Yoga Day 2020** | |
| | ***Online Yoga Sessions by NCC Unit– Prof.Dr.Ashok Kamble*** | **5** |
| | ***Online Session on Sahaja Yoga—H.H.Shri.Mataji Nirmala Devi*** | **6** |
| 3 | **New Arrivals in Library and Information Centre** | **7** |
| 4 | **Online Orientation Program** | |
| | ***- Online User Orientation program for M.A. Psychology Students: Use of E-resources*** | **8-9** |
| 5 | **Faculty Members invited as Resource Person** | |
| | ***- Dr. Shantashree Sengupta, Librarian*** | **11-12** |
| | ***- Dr. Prerna Ubale, Head, Department of Hindi*** | **13-14** |
| 6 | **Modern Alumni Achievement** | |
| | ***- Shri. Surendra Sable, Police Naik, Unit IV, Crime Branch Pune*** | **15** |
| 7 | **Newspaper Clippings** | **16-63** |
| 8 | **Shraddhanjali** | |
| | ***- Shri.Anil Pawar, Senior Police Inspector, Thane*** | **64** |

# *Progressive Education Society's* Chairperson Prof. Dr. Gajanan R. Ekbote invited as Resource Person

*Progressive Education Society's* Chairperson Prof. Dr. Gajanan R. Ekbote was invited as Resource Person in Webinar organised by Savitribai Phule Pune University, Pune on 13th June 2020. The topic of the webinar was ***'परीक्षेला पर्याय काय…?'***

The webinar was co-ordinated by Ms. Bageshri Manthalkar and Shri. Rajesh Pande of SPPU, Pune. Prof.Dr.R.S.Mali, Prof,.Dr.Arun Adsul, Prof.Dr.V.B.Gaikwad, Shri. Vishal Chordiya, Shri. Milind Marathe, Shri. Rajiv Sabade, Shri. Prashant Sathe were amongst the other Academicians who were invited for discussion on the topic of examinations in the COVID-19 situation.

The webinar received a massive response from the attendees and was streamed live on Facebook Social Media Platform.







# *Progressive Education Society's* Chairperson Prof. Dr. Gajanan R. Ekbote invited as Resource Person

*Progressive Education Society's Chairperson* Prof. Dr. Gajanan R. Ekbote was invited as Resource Person in Webinar organised by Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Saswad on 27th June 2020.

The topic of the webinar was '*धर्मदाय संस्था आणि अर्थसंकल्प २०२० व कायदेशीर बाबींची पूर्तता*' .
The webinar was streamed live on YouTube.









# INTERNATIONAL YOGA DAY 21ST JUNE

In the COVID-19 pandemic situation, this year on 21st June 2020, the NCC Wing of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous) organised ***Online International Yoga Day*** under the leadership of Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir and College NCC Officer Prof. Dr. Ashok Kamble.

Three days practice Yoga Sessions were also organised in Online Mode through Google Meet platform by NCC Unit of the College on 19th, 20th and 21st June 2020 from 6:45 am for staff and students. The sessions were taken by Modern College, Ganeshkhind NCC Cadet Rahul Sunar who is also an Yoga Expert under the guidance of NCC Officer Prof.Dr.Ashok Kamble.

























## INTERNATIONAL YOGA DAY 21ST JUNE


On 22nd June 2020, Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous) organised online session on ***Sahaja Yoga*** on the occasion of ***International Yoga Day*** under the leadership of Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir.


H.H.Shri.Mataji Nirmala Devi conducted guided on how to discover our inner power through Sahaja Yoga. All the faculty members of the college attended the online session.




# New Arrivals in Library During June 2020



# Online Library Orientation Program– M.A. Psychology Students


Department of Psychology and Library and Information Centre jointly organised ***'Online User Orientation program for M.A. Psychology Students : Use of E-resources'*** on 25th June 2020.

Dr. Shantashree Sengupta, Librarian of Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Pune-5 introduced the students to the e-resources databases subscribed by the college as well as several free e-resources which can be accessed anywhere, anytime by the student.

INFLIBNET's NLIST, National Digital Library, Directory of Open Access Journals (DOAJ), Directory of Open Access Books (DOAB), Shodhganga: Reservoir of Indian Theses and Shodhgangotri: Repository of Indian Research in Progress were introduced to the students and with the help of several examples demonstration was given regarding the search strategy of the database.


Prof. Dr. Amruta S. Oke, Vice Principal, Faculty of Arts and Head, Department of Psychology and Prof.Dr.Shradhha Sakatkar, Assistant Professor, Department of Psychology co-ordinated the online orientation program which received a good response from the M.A.Psychology students.

The session was conducted on Google Meet Platform.














# Online Library Orientation Program– M.A. Psychology Students




# *Faculty Members Invited as Resource Persons during June 2020*

# DR. SHANTASHREE SENGUPTA, LIBRARIAN INVITED AS RESOURCE PERSON

Dr. Shantashree Sengupta, Librarian, Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 was invited as Resource Person for **National Level Faculty Development Program** organised by Navsari Agricultural University, Navsari, Gujarat ; Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth, Parbhani, Maharashtra and Association of Agricultural Librarians and Documentalists of India (AALDI) on '**SOWSEEKNOW: Sowing Seeds of Knowledge to Library and Information Professionals'** from 18th to 22nd June 2020.


Dr. S. Sengupta delivered her online Practical Session on *'OBS STUDIO : OPEN SOURCE SOFTWARE FOR E-CONTENT DEVELOPMENT'* on Sunday, 21st June 2020.










# DR. SHANTASHREE SENGUPTA, LIBRARIAN INVITED AS RESOURCE PERSON

Dr. Shantashree Sengupta, Librarian, Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 was invited as Resource Person for **National Webinar** on ***'Strategies to Enhance Research and Academic Visibility : Role of Libraries and Information Centres'*** organised by Learning Resource Centre and IQAC, Bunts Sangha's S.M.Shetty College of Science, Commerce and Management Studies, Powai, Mumbai on 23rd June 2020.



BUNTS SANGHA'S
S.M. SHETTY COLLEGE OF SCIENCE, COMMERCE & MANAGEMENT STUDIES
Hiranandani Garden, Powai, Mumbai-400076
(Affiliated to University of Mumbai)
NAAC 'A' GRADE
IMC RBNQA CERTIFICATE OF MERIT 2019
ISO 9001:2015 CERTIFIED

Learning Resource Center
&
Internal Quality Assurance Cell (I.Q.A.C.)
*Organize*

*National Webinar*
On
*"Strategies to Enhance Research & Academic Visibility: Role of Libraries and Information Centers"*

*Date : 23rd June, 2020* *Time : 5:00 p.m to 7:00 p.m.*

PROGRAM SCHEDULE

| | |
|---|---|
| Opening Remarks | **Dr. Liji Santosh**<br>Vice Principal & I.Q.A.C Cordinator |
| NATIONAL ANTHEM | |
| About the College | **Asst. Prof. Steffi Salve Desouza** |
| Welcome Address | **Dr. Sridhara Shetty**<br>*Principal*<br>Bunts Sangha's S.M.Shetty College of Science, Commerce & Management Studies, Powai. |
| Introduction of The Resource Person | **Mrs. Smitha Ravindranath**<br>Librarian |
| Address By Chairman | **CA Shankar B. Shetty**<br>Chairman - Powai Education Committee |
| Technical Session | **Dr. Shantashree Sengupta**<br>Librarian (Associate Professor Grade)<br>Modern College of Arts,Science & Commerce (Autonomous), Pune-5. |
| Q&A | **Mrs. Smitha Ravindranath** (Librarian) & **Mrs. Vandana Gharge** (Library Assistant) |
| Vote of Thanks | **Asst. Prof. CA Zainab Rangwala** |



# DR. PRERNA UBALE, HEAD, DEPARTMENT OF HINDI INVITED AS RESOURCE PERSON

## कविता आणि इतर गप्पा- फेसबुक लाइव्ह

हिंदी विभागाध्यक्षा डॉ. प्रेरणा उबाळे जी का कविताओं का ***"कविता आणि इतर गप्पा"*** कार्यक्रम मराठी साहित्य वार्ता, नागपुर के द्वारा आयोजित फेसबुक लाइव के माध्यम से 29 जून 2020 को संपन्न हुआ। वर्तमान समय में मनुष्य का आपसी संवाद कम हो रहा है, उसके अनेक दुष्परिणाम भोगने पड़ रहे हैं। भौतिक उन्नति होने तथा जीवन में अनेक सुख- सुविधाओं से लैस होने के बावजूद मनुष्य अकेलापन महसूस कर रहा है। संवादहीनता के कारण जीवन की रिक्तता अधिक बढ़ रही है और जीवन में आवश्यक संतुलन नष्ट हो रहा है।इस संवाद का महत्व बतानेवाली कविताएँ डॉ. प्रेरणा उबाळे जी ने इस कार्यक्रम में प्रस्तुत की। साथ ही मनुष्य के मन की कठोरता कम करने का संदेश इन कविताओं से प्रदान किया। जैसे –

"पोलादासारखे शहर आहे,
पोलादासारखे लोक आहेत,
कठीण प्रवाहामध्ये वाहत जाणारे
हे पोलाद वितळले पाहिजेत."


डॉ. प्रेरणा उबाळे जी के द्वारा प्रस्तुत "कविता आणि इतर गप्पा"
यह कार्यक्रम फेसबुक लाइव पर तीन हजार से अधिक दर्शकों
तथा सुप्रतिष्ठित मराठी-हिंदी कवि-लेखकों द्वारा देखा और सराहा गया।

-डॉ. प्रेरणा उबाळे
हिंदी विभागाध्यक्षा , मॉडर्न महाविद्यालय (स्वायत्त) पुणे- 05.










# DR. PRERNA UBALE, HEAD, DEPARTMENT OF HINDI INVITED AS RESOURCE PERSON









# *MODERN ALUMNI ACHIEVEMENT*

**श्री. सुरेंद्र साबळे, Police Naik, Unit IV Crime Branch Pune** (मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ चे माजी विद्यार्थी व श्री प्रकाश साबळे,सहाय्यक ग्रंथपाल, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ यांचे लहान बंधू) सध्या क्राईम ब्रँच पुणे यांच्या टीम ने भारतीय सैन्यदलासोबत पुण्यात केलेल्या संयुक्त कारवाईत उत्कृष्ट कामगिरीबद्दल सदर्न कमांड पुणे (Southern Command Liaison Unit, Pune) यांच्या कडून प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.










सामना १०/६/२०२०

## विमाननगरमध्ये बनावट नोटांचे रॅकेट उद्ध्वस्त

### ४४ कोटींहून अधिक नोटा जप्त

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) -हिंदुस्थानी चलनासारख्या हुबेहूब दिसणाऱ्या बनावट नोटांचा साठा केलेल्या टोळीला लष्करी गुप्तचर यंत्रणा आणि गुन्हे शाखेने विमाननगर भागात पकडले. त्यांच्याकडून ४४ कोटी रुपयांचे बनावट चलन आणि चार कोटी २० लाख रुपयांचे बनावट अमेरिकन डॉलर्स जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी सहाजणांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांपैकी एकजण लष्करी सेवेत आहे.

शेख अलिम गुलाब खान, सुनील बद्रिनाथ सारडा, रितेश रत्नाकर, तौफिल अहमद मोहम्मद इसाक खान, अब्दुल गनी रेहमतुल्ला खान, अब्दुल रेहमान अब्दुल गनी खान अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत.

विमाननगर भागातील संजय पार्क परिसरात बनावट हिंदुस्थानी चलन आणि अमेरिकन डॉलर्सचा मोठ्या प्रमाणावर साठा केल्याची माहिती लष्करी गुप्तचर यंत्रणेला मिळाली होती. त्यानंतर गुप्तचर यंत्रणेने याबाबतची माहिती गुन्हे शाखेला दिली. त्यानंतर गुन्हे शाखा आणि



लष्करी गुप्तचर यंत्रणेच्या पथकाने सापळा रचून सहाजणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता, शेख अलिम गुलाब खान हा मुख्य सूत्रधार असून, तो बॉम्बे सॅपियर्समध्ये कामाला असल्याची माहिती मिळाली. वर्षभरापूर्वी त्याने संजय पार्क परिसरात एक बंगला भाड्याने घेतला होता. नागरिकांची फसवणूक करण्यासाठी चिल्ड्रेन बँकसाठी वापरण्यात येणाऱ्या नोटा एकत्रित करण्याचे काम तो बंगल्यामध्ये करीत होता. त्यानंतर नागरिकांना आमिष दाखवून फसवणूक केली जात होती. त्यासाठी

● पान २

## विमाननगरमध्ये बनावट नोटांचे रॅकेट उद्ध्वस्त

*(पान १ वरून)*

कोंढव्यातील सुनील सारडा त्याला मदत करीत होता. त्यानंतर ठिकठिकाणी नागरिकांची फसवणूक करण्यासाठी मुंबईतील रत्नाकर, तौफिल, अब्दुल, अब्दुल गनी हे बनावट नोटांची वाहतूक करीत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. ही कामगिरी पोलीस उपायुक्त बच्चन सिंह, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, पोलीस उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडिक, सुनील पवार, गणेश साळुंके, सुरेंद्र साबळे, दत्तात्रय फुलसुंदर, रमेश राठोड, सययद यांच्या पथकाने केली.

*Image Courtesy:https://www.pinterest.com/pin/176484879133519463/ ; https://depositphotos.com/29743189/stock-illustration-congratulations-bouquet-of-roses.html*

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020



Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries.*
*Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf*]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time.

As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. From July 2019- September 2019 Issue of *MODLIB Bulletin* has introduced E-newspaper Clippings Service through which it will have a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service.

The E-Newspaper Clippings Section is divided into ***Education, Work of Appreciation, Contribution of Institutions towards the Society, Health, Research, Sports, Miscellaneous .***

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

लोकमत

# पर्याय नसेल तर परीक्षा रद्द करणे योग्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाचे संकट एकट्या महाराष्ट्रावर आलेले नाही, तर जगभरात कोरोनाने थैमान घातले आहे. त्यामुळे जगभरातील शैक्षणिक संस्थांना विद्यार्थ्यांच्या परीक्षा कशा घ्यायच्या, असा प्रश्न भेडसावत आहे; तसेच एकट्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवरच 'कोरोना बॅच' असा शिक्का पडणार नाही. त्यामुळे उगाचच कोल्हेकुई करत या विषयाचे राजकारण करणे योग्य नाही. विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीचा विचार करून मागील वर्षाच्या परीक्षांमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे अंतिम वर्षाचा निकाल जाहीर करावा असा सूर आता शिक्षण वर्तुळात उमटू लागला आहे.

कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याने विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. उपाय म्हणून केंद्र व राज्य शासनातर्फे वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जात आहेत. सद्य:स्थितीमध्ये शाळा, महाविद्यालये सुरु करण्यास केंद्र शासन सकारात्मक नाही. तर, अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत महाराष्ट्रात सुरु असलेल्या राजकारणामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

तसेच, शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचे भवितव्य आदी मुद्द्यांवर परीक्षा घेतलीच पाहिजे असे मत शिक्षण क्षेत्रातील काही जाणकार व्यक्त करत आहेत. परंतु, काही विद्यार्थ्यांची परीक्षा देण्याची मानसिकता नसल्याचे दिसून येत आहे.

"मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांकडून, तर अंतिम वर्षाच्या परीक्षेला विद्यापीठाकडून घेतल्या जातात. एकही परीक्षा न घेता विद्यापीठाने विद्यार्थ्यांना पदवी देणे हे सयुक्तिक नाही. कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर परीक्षा घेता येऊ शकतात.

– **डॉ. वासुदेव गाडे**, माजी कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

"एखादी नैसर्गिक आपत्ती येते, त्या वेळी त्यात कोणत्या व्यक्तीचा काहीच दोष नसतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची परीक्षा न घेता त्यांना उत्तीर्ण केले म्हणून या विद्यार्थ्यांवर 'कोरोनाग्रस्त बॅच' असा शिक्का पडेल, अशी कोल्हेकुई करण्यात काहीच अर्थ नाही. राज्यात सुमारे दहा लाख अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावी लागणार आहे.

– **डॉ. अशोक चासकर**, माजी अधिष्ठाता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

"पुणे, नाशिक, अहमदनगर या तीनही जिल्ह्यांमध्ये कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. सध्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची पहिली सत्र परीक्षा झालेली आहे; तसेच विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षाही झाल्या आहेत. त्यामुळे द्वितीय वर्षाच्या दोन आणि तृतीय वर्षातील पहिल्या, अशा एकूण ३ सत्रांमध्ये मिळवलेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करणे योग्य ठरेल; तसेच ज्या विद्यार्थ्यांना ग्रेड इंप्रूव्ह करायचा आहे, त्यांना विद्यापीठाने पर्याय उपलब्ध करून द्यावा.

– **डॉ. दिलीप शेठ**, प्राचार्य, स. प. महाविद्यालय

Pune Main
Page No. 2 Jun 01, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

## राज्यपालांचे मुख्यमंत्र्यांना पत्र : राजभवन-सरकार पुन्हा आमने-सामने

# अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार माझा

**विशेष प्रतिनिधी**
लोकमत न्यूज नेटवर्क



**मुंबई** : विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करून सरासरी गुण देण्यात येतील, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दोन दिवसांपूर्वी जाहीर केले असतानाच परीक्षा घ्यायची की नाही याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार कुलपती म्हणून मला आहे,असे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग आणि केंद्राच्या अन्य प्राधिकरणांनी अंतिम वर्षाच्या परीक्षांना पर्याय असू शकत नाही असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. म्हणून राज्य शासनानेही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले पाहिजे तसेच महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याचेदेखील पालन केले पाहिजे, असे राज्यपालांनी बजावले आहे.

मुख्यमंत्र्यांना मंगळवारी लिहिलेल्या पत्रात राज्यपालांनी म्हटले आहे, की अंतिम वर्षाच्या परीक्षा घ्यायचा की नाही याबाबत विद्यापीठ कायद्यातील तरतुदींच्या आधारे निर्णय घेण्यात येईल. परीक्षा रद्द करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयाबद्दल राज्यपालांनी सखेद आश्चर्य व्यक्त केले आहे. हा निर्णय अभूतपूर्व आणि त्याचे कायदेशीर परिणाम काय होतील याचा प्रगल्भ विचार न करता घेण्यात आला आहे, अशी तीव्र नाराजी राज्यपालांनी व्यक्त केली आहे.

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण शिक्षण मंत्र्यांनी कुलगुरुंची एक समिती स्थापन करून त्या समितीला सध्याच्या परिस्थितीचे विश्लेषण करून परीक्षा घेण्यासंदर्भात कुठले पर्याय उपलब्ध असू शकतात यासंबंधी अहवाल देण्यास सांगितले होते. या समितीने ६ मे रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सचिवांकडे अहवाल सादर केला आहे. मात्र तो अहवाल अद्याप आपल्याकडे आलेला नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

वैद्यकीय स्थापत्य विधी यासारख्या व्यवसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था प्रस्थापित माप दंडाच्या आधारित परवान किंवा प्रॅक्टिस सुरु करण्यासाठीचा परवाना/अनुमती देतात. अंतिम वर्षाची परीक्षा घेतली नाही तर ती अनुमती मिळण्यात अडचणी येतील याकडेही राज्यपालांनी लक्ष वेधले आहे.

### 'तो' निर्णय अतार्किक मनमानी

- सरासरी गुण दिल्यानंतर तो पर्याय ज्यांना मान्य नाही त्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध असेल असे मुख्यमंत्री ठाकरे यांनी म्हटले होते त्यावर राज्यपालांनी या पत्रात असे म्हटले आहे की एकाच परीक्षेसाठी दोन निकष असू शकत नाहीत त्यामुळे हा निर्णय अतार्किक, मनमानी ठरतो.

Pune Main
Page No. 5 Jun 03, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# उत्तरपत्रिकांचे संकलन रखडले

## दहावी, बारावीच्या निकालावर करोनाचे सावट; मुंबई–पुणे, औरंगाबादमधील समस्या

देवेश गोंडाणे, लोकसत्ता



**नागपूर :** विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राच्या बहुतांश भागातील इयत्ता दहावी आणि बारावीच्या उत्तरपत्रिकांचे संकलन झाले असले, तरी मुंबई, पुणे आणि औरंगाबाद या लाल क्षेत्रातील उत्तरपत्रिका अद्यापही परीक्षा केंद्र, नियामक व टपाल कार्यालयातच पडून आहेत. त्यामुळे दहावी, बारावीचा निकाल कधी लागेल याबाबत शिक्षण मंडळही साशंक आहे.

विभागीय मंडळांकडे उत्तरपत्रिकांचे संकलन झाल्यानंतर निकाल तयार होण्यास किमान महिनाभराचा अवधी लागतो हे येथे उल्लेखनीय.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीची परीक्षा सुरळीत झाली. परंतु त्यानंतर टाळेबंदी जाहीर करण्यात आल्याने दहावी भूगोल विषयाचा पेपर रद्द करण्यात आला. दरम्यान, टाळेबंदीमुळे दळणवळणाची साधनेही बंद असल्याने शिक्षकांकडे असलेल्या उत्तरपत्रिका संकलित करणे कठीण झाले होते.

मंडळाने उत्तरपत्रिका ने-आण करण्याची विशेष परवानगी शासनाकडे मागितली. परवानगी मिळताच शिक्षण मंडळाने जिल्हा स्तरावरुन उत्तरपत्रिकांचे संकलन सुरू केले आहे.

शिक्षण मंडळाच्या नागपूर, अमरावती, लातूर, कोल्हापूर, कोकण आणि नाशिक या सहा विभागातील उत्तरपत्रिकांचे संकलन ९० ते ९८ टक्के पूर्ण झाले आहे. मात्र, मुंबई, पुणे आणि औरंगाबाद विभागात रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याने येथील उत्तरपत्रिकांचे संकलन संथगतीने सुरू आहे. काही भागातील उत्तरपत्रिकांचे ५० टक्के तर काही भागात केवळ २५ टक्केच उत्तरपत्रिका विभागीय कार्यालयात संकलित झाल्या आहेत. त्यामुळे याचा फटका दहावी आणि बारावीच्या निकालाला बसणार आहे.

### साशंकता कायम

मुंबई, पुणे आणि औरंगाबाद विभागातील उत्तरपत्रिकांचे शंभर टक्के संकलन कधी होईल हे सांगणे कठीण असल्याने शिक्षण मंडळाने निकालाच्या तारखेबाबत साशंकता व्यक्त केली आहे.

### ... म्हणून निकाल लांबतो



गुणवंत विद्यार्थ्यांची यादी जाहीर करणे बंद केले असले तरी गुणवंत विद्यार्थ्यांना देण्यात येणारे पुरस्कार सुरूच असल्याने शिक्षण मंडळाच्या पातळीवर राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यांची यादी तयार केली जाते. परिणामी इतर विभागांचा निकाल तयार झाला तरी लाल क्षेत्रातील विभागांच्या निकालाची शिक्षण मंडळाला वाट बघावी लागणार आहे.

“ नागपूर, अमरावती, लातूर, कोल्हापूर विभागातील उत्तरपत्रिका संकलन बहुतांश पूर्ण झाले आहे. मात्र, करोनामुळे काही विभागातील स्थिती बिकट असल्याने निकाल कधी लागेल हे सांगता येणार नाही.

\- रविकांत देशपांडे, विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.

लोकसत्ता Wed, 03 June 2020
https://epaper.loksatta.com/c/52469993

लोकमत

## अंतिम परीक्षेचा पेच : विद्यार्थीहिताचा निर्णय घेण्याची अपेक्षा

# ‘आपत्ती व्यवस्थापन’अंतर्गत मुख्यमंत्री, विद्यापीठ ॲक्टनुसार राज्यपाल योग्यच

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यापीठ कायद्यानुसार राज्यपाल सर्व विद्यापीठांचे प्रमुख असून, त्यांना शैक्षणिक निर्णय घेण्याचे सर्वाधिकार आहेत. तर आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार मुख्यमंत्री विद्यापीठांना परीक्षेसंदर्भात सूचना देऊ शकतात. त्यामुळे मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांची भूमिका त्यांच्या पातळीवर योग्यच आहे. राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांनी एकत्रितपणे चर्चा करून यावर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी जेबीव्हीसीची बैठक हा पर्याय असू शकतो, असे मत शिक्षण व विधी क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा विषय राजकीय बनला आहे. राज्यातील कुलगुरुंबरोबर घेतलेल्या बैठकीनंतर कायदेशीर बाबी तपासून अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटले होते. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील तरतुदी आणि विद्यापीठ कायद्यातील तरतुदी तपासाव्या लागणार आहेत.

कायद्याचे अभ्यासक ॲड. असीम सरोदे म्हणाले, आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार मुख्यमंत्री विद्यापीठांना परीक्षेसंदर्भात आदेश देऊ शकतात. मात्र, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार राज्य शासनाला परीक्षेसंदर्भातील वेगवेगळ्या पर्यायांचा विचार करता आला असता. सरासरी गुणांच्या आधारे निकाल जाहीर केल्यानंतरही ज्यांना परीक्षा द्यायची आहे. त्यांना परीक्षा देण्याचा पर्यायही उपलब्ध आहे. मात्र, बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा प्रश्न निर्माण होतो.

ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. एस. के. जैन म्हणाले, ‘मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राज्यपालांनी काम करावे. हे जरी खरे असले तरी; कुलपती म्हणून राज्यपालांचे विशिष्ट स्थान आहे. मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांशी चर्चा करून निर्णय घेतला असता, तर मध्यम मार्ग निघाला असता. सरासरी गुण देऊन निकाल जाहीर केल्यामुळे पुढील काळात अनेक अडचणी निर्माण होऊ शकतात.’

विद्यापीठ विकास मंचचे प्रांतप्रमुख डॉ. ए. पी. कुलकर्णी म्हणाले, ‘कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर परीक्षा घ्यावी. परीक्षा घेणे विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे. जेबीव्हीसीमध्ये यावर मार्ग काढता येऊ शकतो.’

### जेबीव्हीसीचा पर्याय



जेबीव्हीसीमध्ये राज्यपाल, सर्व विद्यापीठांचे कुलगुरु, मुख्यमंत्री, उच्च शिक्षण मंत्री, राज्याचे प्रधान सचिव, उच्च शिक्षण विभागाचे सचिव आदी उपस्थित असतात. त्यामुळे जेबीव्हीसीमधून परीक्षेचा पेच सोडविला जाऊ शकतो. राज्यपाल हे जेबीव्हीसीचे पदसिद्ध अध्यक्ष असून, या बैठकीत साकल्याने चर्चा होण्याची शक्यता अधिक असते. जेबीव्हीसी ही अंतिम परीक्षेबाबत निर्णय होण्यास मदतकारक ठरू शकते.

“ अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंदर्भात निर्माण झालेल्या एकूण परिस्थितीवर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी ऑनलाइन जेबीव्हीसी बोलवून कुलगुरु व राज्य शासनाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी बरोबर चर्चा करणे योग्य होईल.

\- **डॉ. वासुदेव गाडे**, माजी कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

“ जेबीव्हीसीला एक विशिष्ट स्थान असल्यामुळे गांभीर्याने चर्चा करून एका दिवसात अंतिम वर्षाच्या परीक्षेवर मार्ग काढला जाऊ शकतो.

\- **डॉ. आर. एस. माळी**, माजी कुलगुरु, जळगाव विद्यापीठ

Pune Main
Page No. 3 Jun 05, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

## महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून सुरू करण्याची तयारी

### विद्यापीठाच्या परिपत्रकाबाबत प्रश्न

**लोकसत्ता प्रतिनिधी,**

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) नवे शैक्षणिक वर्ष १ सप्टेंबरपासून आणि यापूर्वीच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून सुरू करण्याचे निर्देश दिलेले असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून सुरू करण्याचे निश्चित केले आहे. मात्र करोना संसर्गाच्या काळात १५ जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरू कसे करणार, असा प्रश्न आता विचारण्यात येत आहे.

**शैक्षणिक वर्षाची सुरुवात म्हणजे प्रशासकीय कामकाज १५ जूनपासून सुरू करण्यात येत आहे. त्यात नॅक मूल्यमापन, समुपदेशन, विविध अहवाल–माहिती संकलित करून पाठवणे, संलग्नता, प्रवेश परीक्षांची तयारी आदी अनेक कामे असतात. त्यांचा प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नाही. सध्याच्या परिस्थितीमुळे प्रत्यक्ष शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून शक्य नाही.**

– **डॉ. एन. एस. उमराणी,** प्र कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विद्यापीठाकडून १५ जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षाचे परिपत्रक संके तस्थळावर मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आले. विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेतील विज्ञान, अभियांत्रिकी, वास्तुरचना, औषधनिर्माण यांचे पदवी अभ्यासक्रम १५ जून, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम १ जुलैपासून सुरू होणार आहे. मानव्यविज्ञान विद्याशाखेतील कला, सामाजिक शास्त्र अभ्यासक्रम १५ जून, तर विधी अभ्यासक्रम १ जुलैपासुन सुरू करण्यात येणार आहेत. आंतरविद्याशाखीय विद्याशाखेच्या अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष १ जुलैपासून, तर विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांचे शैक्षणिक वर्ष १ जुलैपासुन सुरू करण्यात येणार असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### संलग्न महाविद्यालयांशी तफावत का?

**संलग्न महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून, तर विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे शैक्षणिक वर्ष १ जुलैपासून सुरू करण्यात येणार आहे. मात्र, संलग्न महाविद्यालये आणि विद्यापीठातील शैक्षणिक विभाग यांचे शैक्षणिक वर्ष सुरू करण्याबाबत तफावत का, असाही प्रश्न विचारण्यात आला आहे.**

शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या परीक्षांचे निकाल कधी जाहीर होणार, विद्यार्थ्यांच्या राहिलेल्या विषयांच्या परीक्षा होणार की नाही, असे अनेक प्रश्न अनुत्तरित असताना विद्यापीठाने मात्र नव्या शैक्षणिक वर्षाची तयारी केली आहे. करोना संसर्गामुळे प्रवास, घरातून बाहेर पडण्यावरही निर्बंध असताना नवे शैक्षणिक वर्ष कसे सुरू करायचे, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

## परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयास राज्यपालांचा आक्षेप

**(पान १ वरून)** दिले होते. त्यावरून राज्यपालांनी शासनाला 'परीक्षा रद्द करणे अव्यवहार्य आणि बेकायदा ठरेल,' अशा आशयाचे पत्र लिहिले होते. मात्र, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अंतिम वर्षाची परीक्षा रद्द करण्याची घोषणा रविवारी केली. त्यावर आता पुन्हा राज्यपालांनी नाराजी व्यक्त करणारे पत्र मुख्यमंत्र्यांना लिहिले आहे.

'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या सर्व विषयांवर निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार कुलपतींना आहेत. कोणत्याही कायदेशीर बाबी आणि परिणामांचा विचार न करता परीक्षा रद्द करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या घोषणेची अंमलबजावणी झाल्यास विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येईल. मुख्यमंत्र्यांनी कायद्यानुसार निर्णय घ्यावा,' असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. 'यापूर्वी पाठवलेल्या पत्राच्या उत्तराची अपेक्षा असताना त्यापूर्वीच परीक्षा रद्द करण्याची घोषणा करण्यात आल्याचे वृत्त वाचून धक्का बसला,' असेही राज्यपालांनी पत्रात म्हटले आहे.

### अहवाल मिळालाच नाही

**शासनाने परीक्षा कशा घेता येतील, याचा अभ्यास करण्यासाठी कुलगुरू आणि अधिकाऱ्यांची समिती नेमली होती. त्याचा सचिवांना सादर करण्यात आलेला अहवाल अद्यापही मिळाला नसल्याचे राज्यपालांनी सांगितले आहे. 'कुलगुरूंची बैठक घेतली तेव्हा राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंनी परीक्षा घेण्याची तयारी दर्शवली होती. केंद्रीय शिक्षण मंडळ (सीबीएसई) आणि आयसीएसई यांनी लहान असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेत असेल तर विद्यापीठेही परीक्षा घेऊ शकतील,' असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.**

aper.loksatta.com

लोकसत्ता Wed, 03 June 2020 https://epaper.loksatta.com/

## ...तर पदवीच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह!

### अभ्यासक्रमांच्या नियामक मंडळांना विश्वासात न घेताच परीक्षा रद्द




**राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षांबाबत सध्या अभूतपूर्व गोंधळाचे वातावरण आहे. विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयाचे तीव्र पडसाद शिक्षण वर्तुळात उमटत आहेत. या विषयाचे विविध कंगोरे समोर आणणारी ही वृत्तमालिका आजपासून...**

**देवेश गोंडाणे, लोकसत्ता**

**नागपूर :** अभ्यासक्रमापासून ते परीक्षा, मूल्यांकनाची नियमावली ठरवण्यापर्यंतच्या सर्व कामकाजाचे नियंत्रण करणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नियामक मंडळांना विश्वासात न घेता सरकारने परीक्षा रद्द करण्याचा घेतलेला निर्णय सरकारवर उलटण्याची शक्यता या क्षेत्रातील तज्ज्ञांनी वर्तवली आहे. राष्ट्रीय पातळीवरील नियामक मंडळांना डावलून परीक्षा रद्द केल्याने पदवीच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

उच्च शिक्षणामध्ये व्यावसायिक आणि पारंपरिक असे अभ्यासक्रमांचे वर्गीकरण आहे. पारंपरिक अभ्यासक्रमासंदर्भात विद्यापीठाला पूर्ण स्वायत्तता आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहमतीने या अभ्यासक्रमाबाबत निर्णय होत असतात. मात्र, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी राष्ट्रीय पातळीवर नियामक मंडळांची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यात **(पान २ वर)**

### धोका काय?

**व्यावसायिक अभ्यासक्रमाची पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नियामक मंडळांकडे नोंदणी करावी लागते. उदाहरणार्थ वकिली व्यवसायात जाताना बार कौन्सिलकडे नोंदणी करणे अनिवार्य असते. मात्र, पदवीच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित करीत नोंदणी नाकारण्याचा अधिकार या मंडळांकडे असतो. त्यामुळे हा संभाव्य धोका शासनाने लक्षात घ्यावा, अशी मागणीही होत आहे.**

**पारंपरिक अभ्यासक्रमांच्या पदवीला फारशी अडचण येणार नाही. मात्र, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवीधारकांना विविध परिषदांकडे नोंदणी करावी लागते. त्यामुळे त्यांच्यासमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.**

– **ॲड. भानुदास कुलकर्णी,** विद्यापीठ कायदातज्ज्ञ

लोकसत्ता Tue, 09 June 2020 https://epaper.loksatta.com/c/52617050

## ...तर पदवीच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह!

***(पान १ वरून)*** एआयसीटीई, फार्मसी कौन्सिल, बार कौन्सिल आदी मंडळे आहेत.

कसोटीच्या प्रसंगी नियामक मंडळांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांसंदर्भातील नियामक मंडळांची संमती घेऊन, त्यांच्याशी सल्लामसलत करूनच सरकारला निर्णय घ्यायचा असतो. अभ्यासक्रम कसा असावा, किती वर्षांचा असावा, काय शिकवावे, त्याचे मूल्यांकन कसे असावे या शैक्षणिक दर्जावर नियामक मंडळ काम करतात. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घ्यायच्या की नाहीत, परीक्षा न घेता पदव्या द्यायच्या की कसे, यासंदर्भात नियामक मंडळांशी सल्लामसलत होत नाही तोपर्यंत राज्य सरकार आणि कुठल्याही विद्यापीठांना निर्णयच घेता येत नाही, असा दावा शिक्षणतज्ज्ञांनी केला आहे. सरकारने नियामक मंडळांना विश्वासात न घेतल्याने सरकारच्या या चुकीचे दूरगामी परिणाम विद्यार्थ्यांना भोगावे लागू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

लोकसत्ता Tue, 09 June 2020 https://epaper.loksatta.com/c/5261708

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# प्रस्तावित शुल्कवाढीला स्थगिती

## विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा निर्णय



लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची प्रस्तावित शुल्कवाढ स्थगित करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षासाठी (२०२०-२१) शुल्कवाढ होणार नसल्याने लाखो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. त्याशिवाय अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याची कार्यवाही सुरू ठेवली जाणार आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक सोमवारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. काही दिवसांपूर्वी विद्यापीठाच्या विद्या परिषदेने शुल्कवाढीला स्थगिती देण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेला केली होती. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे म्हणाले, की प्रस्तावित शुल्कवाढीला स्थगिती देण्याबरोबर विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयात शुल्क भरण्याबाबत कोणत्याही प्रकारे सक्ती करता येणार नसल्याचाही ठराव करण्यात आला. तसेच विद्यापीठाची अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याबाबतची कार्यवाही सुरू ठेवण्याचा निर्णयही घेण्यात आला.

### खर्चाला कात्री

टाळेबंदीमुळे विद्यापीठाची मार्चमध्ये अर्थसंकल्पीय अधिसभा होऊ शकली नव्हती. आता निर्माण झालेल्या आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर अंदाजपत्रकात काही बदल करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला. त्यानुसार येत्या वर्षात विद्यापीठाचे उत्पन्न काही प्रमाणात घटण्याची शक्यता विचारात घेऊन खर्चालाही कात्री लावली जाणार आहे. त्यानुसार विद्यापीठाला खर्च आटोक्यात ठेवण्यासाठी खर्च कमी करण्यात येणार आहेत. त्याचे बदल अंदाजपत्रकात केले जातील.

लोकसत्ता Tue, 09 June 2020 https://epaper.loksatta.com/c/5

# विद्यापीठाकडून शुल्कवाढ स्थगित

## विद्यार्थ्यांकडून निर्णयाचे स्वागत



म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोना संसर्गामुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील सर्व अनुदानित व विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या शुल्कवाढीच्या निर्णयाला एक वर्षासाठी स्थगिती दिली आहे. विद्यापीठात सोमवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यामुळे २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात कोणतीही शुल्कवाढ होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यापीठाच्या शुल्क नियमन समितीने गेल्या काही महिन्यांपूर्वी सर्व अनुदानित व विनाअनुदानित अभ्यासक्रमांच्या शुल्कात सुमारे २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याची शिफारस केली होती. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेची बैठक सोमवारी झाली. त्यात विद्या परिषदेने शुल्कवाढी संदर्भात सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली. करोनामुळे पालकांचे आर्थिक नियोजन कोलमडले असल्याने यंदा शुल्कवाढ करू नये, या प्रस्तावाला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA

**Maharashtra Times: 9.6.2020**

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

लोकमत

विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचा निर्णय : शासनाच्या लेखी आदेशानुसार प्रक्रिया सुरु ठेवणार

# अंतिम वर्षाची परीक्षा घेणारच

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांतील महाविद्यालय व शैक्षणिक संस्थांमधील अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याची तयारी सुरु ठेवण्याचा निर्णय सोमवारी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. यावरून सध्या तरी विद्यापीठ अंतिम वर्षाची परीक्षा घेणार असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच, येत्या ३० जूनपूर्वी विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक बोलवून त्यात विद्यापीठाचे अंदाजपत्रक मंजूर करण्याचे निश्चित केले.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षा घेतल्या जातील, असे पत्र राज्य शासनाला पाठविले. तर, राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्या जाणार नाहीत, अशी घोषणा केली. त्यामुळे परीक्षेबाबत निर्माण झालेल्या या पेचावर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत काय निर्णय होणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. त्यामुळे सोमवारी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत चर्चा केली. राज्य शासनाने सर्व विद्यापीठांना प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षा वगळून अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या लेखी सूचना दिल्या आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत घोषणा केली असली, तरी त्याबाबतचा कोणताही लेखी आदेश अद्याप विद्यापीठाला प्राप्त झालेला नाही. त्यामुळे शासनाकडून मे महिन्यात प्राप्त झालेल्या आदेशानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षेची तयारी सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

विद्यापीठाच्या विद्या परिषद व परीक्षा मंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांना व्यवस्थापन परिषदेत मंजुरी दिली. तसेच, परीक्षेच्या कामासाठी दिल्या जाणाऱ्या वाढीव मानधनाला स्थगिती दिली. विद्यापीठातर्फे प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा न घेता पुढच्या वर्गात पाठविले. परंतु, परीक्षाच घेतली नाही त्यामुळे परीक्षा शुल्काची रक्कम परत द्या, अशी मागणी काही विद्यार्थी संघटनांकडून केली आहे. मात्र, विद्यापीठाकडून या मागणीचा अभ्यास केला जात असून विद्यार्थ्यांना काही प्रमाणात शुल्काची रक्कम परत मिळू शकते, असे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी सांगितले. अंतिम वर्षाची परीक्षा झाली पाहिजे, अशी भूमिकाही यावेळी काही सदस्यांनी स्पष्टपणे बोलून दाखविली. प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षातील परीक्षांसाठी प्रविष्ट होताना येणाऱ्या अडचणींवर मार्ग काढण्यासाठी समिती स्थापन केली.

### येत्या १५ जून रोजी अधिसभेची बैठक



कोरोनामुळे विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक स्थगित केली होती. परिणामी, विद्यापीठाच्या अर्थसंकल्प मंजुरीची प्रक्रिया रखडली आहे. त्यामुळे येत्या १५ जून रोजी ऑनलाइन पद्धतीने अधिसभेची बैठक घेण्यास परवानगी मिळावी, असे पत्र विद्यापीठातर्फे राज्यपाल कार्यालयास पाठविण्यात आले आहे.

सद्य:परिस्थितीत यूजीसी व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी आदेशानुसार अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याबाबत तयारी सुरु ठेवण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेतला. कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुधारणा झाल्यावर परीक्षा घेतल्या जातील. तसेच, विद्यापीठाच्या उत्पन्नात मोठी घट होणार असल्यामुळे विद्यापीठाच्या खर्चावर कपात करण्याबाबत अहवाल तयार केला जात आहे. विद्यापीठातर्फे 30 जूनपूर्वी अधिसभा घेऊन अर्थसंकल्पास मंजुरी दिली जाणार.

**- राजेश पांडे**, व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### विद्यापीठाकडून शुल्कवाढीला स्थगिती

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने नवीन शैक्षणिक वर्षापासून लागू केल्या जाणाऱ्या शुल्कवाढीला स्थगिती दिली आहे. त्यामुळे पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील लाखो विद्यार्थी व पालकांचा फायदा होणार आहे.
- गेल्या महिन्यात विद्या परिषदेमध्ये विद्यापीठ प्रशासनाने शुल्कवाढीच्या प्रस्तावास स्थगिती देण्याचा निर्णय घेतला होता. त्यास व्यवस्थापन परिषदेने सोमवारी मंजुरी दिल्यामुळे विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक संस्थांना २०१९-२0 मध्ये आकारले जाणारे जुनेच शुल्क घ्यावे लागणार आहे. सुमारे दहा वर्षांनी शुल्कवाढीचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु,या निर्णयाची अंमलबजावणी एका वर्षानंतर केली जाणार आहे.



Pune Main
Page No. 2 Jun 09, 2020
Powered by: erelego.com





Image Courtesy: https://www.enkiquotes.com/quotes-on-benefits-of-education.html

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# परीक्षा कामातील चुकांवर कारवाई आता सौम्य

### शिक्षणसंस्थांच्या दबावामुळे पुणे विद्यापीठाचा निर्णय

ब्रिजमोहन पाटील

**पुणे, ता. १० :** परीक्षेच्या कामात चूक आढळल्यास संबंधित प्राध्यापक आणि महाविद्यालयास पुढची दोन वर्षे कोणत्याही पुरस्कारासाठी अर्ज करता येणार नाही. तसेच, विविध योजनांमधील निधीचा लाभ घेता येणार नाही, असा कडक निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला होता. मात्र, यात अनेक महाविद्यालयांना फटका बसल्याने संस्थांच्या दबावापुढे विद्यापीठाने नमते घेतले असून, ही शिक्षा आता सौम्य करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेतला आहे. आता अशा चुकीला केवळ दंड आकारला जाणार आहे.

पान ३ वर »

### 'अभियांत्रिकी'ला जास्त फटका

अंतर्गत गुण देताना चूक आढळल्याने त्यात सुधारणा करण्यासाठी मोठी प्रक्रिया पार पाडावी लागत होती. त्यामुळे गुण देताना प्राध्यापकाकडून चूक झाल्यास त्यास संपूर्ण महाविद्यालयास दोषी धरले जात होते. त्यामुळे उत्कृष्ट काम करणारे अनेक प्राध्यापक विद्यापीठाच्या पुरस्कारासाठी अपात्र ठरले. गुणवत्ता सुधार योजनेतून महाविद्यालयास लाभ मिळाले नाहीत. गेल्या तीन वर्षांत या नियमांचा सर्वाधिक फटका अभियांत्रिकी महाविद्यालयांना बसला आहे.

# परीक्षा कामातील चुकांवर कारवाई आता सौम्य

» पान १ वरून

पुणे विद्यापीठाकडून परीक्षा झाल्यानंतर महाविद्यालयांकडून अंतर्गत गुण मागितले जातात. पण ही माहिती व्यवस्थित संकलित न करणे, गुण देताना चुका करणे, बेरीज चुकणे, सरासरी काढताना तसेच इतर प्रकारच्या चुका होतात. यामुळे इतर यंत्रणा कामाला लागते. त्यामुळे पुणे विद्यापीठाने सुमारे तीन वर्षांपूर्वी थेट संबंधित महाविद्यालयाला शिक्षा करण्याचा निर्णय घेतला.

> चुकीचे गुण दिल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होते, त्यामुळे याबद्दल शिक्षा झाली पाहिजे. पण त्यासाठी संपूर्ण संस्थेला जबाबदार धरणे योग्य नव्हते. या नियमांमुळे अनेकांना संधी गमवावी लागली होती. त्यामुळे जाचक अटी रद्द करण्याची मागणी केली होती. त्यास अखेर विद्यापीठाने मान्यता दिली.
>
> – **श्यामकांत देशमुख**, अधिसभा सदस्य, पुणे विद्यापीठ

> अंतर्गत गुण देताना चूक झाल्यास महाविद्यालयास अनेक लाभासाठी अपात्र ठरवले जात होते. आता हा नियम रद्द झाला आहे. महाविद्यालय, प्राध्यापक पुरस्कारासाठी अर्ज करू शकणार आहेत. गुण देताना चूक झाल्यास प्रत्येक चुकीला १ हजार रूपये दंड केला जाणार आहे.
>
> – **डॉ. एन. एस. उमराणी**, प्र-कुलगुरू, पुणे विद्यापीठ

### अशी होती शिक्षा

सप्टेंबर २०१८ पासून या नियमाची अंमलबजावणी सुरू झाली. त्यात १० किंवा १० पेक्षा कमी विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण भरायचे राहून गेल्यास प्रति विद्यार्थी १ हजार किंवा कमीत कमी कमी ५ हजार रुपये दंड, गुणवत्ता सुधार योजनेतील निधीचा तसेच १० टक्के वाढीव जागा याचा दोन वर्ष फायदा घेता येणार नाही, असा नियम केला होता. तर चूक करणाऱ्या प्राध्यापकासही दंडाची शिक्षा करून, लेखी व प्रॅक्टीकल परीक्षेचे पेपर सेटिंगचे अध्यक्षपद न मिळणे, पुरस्कारासाठी अपात्र ठरवणे आदी तरतुदी केल्या होत्या.

**Sakal: 11.6.2020**

लोकमत

## शिक्षण तज्ज्ञांचे मत : सुट्ट्या रद्द करून अभ्यासक्रम पूर्ण करावा

# अभ्यासक्रम लगेच कमी करण्याची घाई कशाला?

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** अभ्यासक्रम कमी करण्याचा निर्णय घेण्याबाबत घाई होत असून शासनाने प्रत्येक राज्यातील काही शिक्षणतज्ज्ञांशी चर्चा करून अंतिम निर्णयावर यावे. शैक्षणिक वर्षासाठी किती दिवसांचा कालावधी मिळतो, याचा विचार करूनच अभ्यासक्रम कमी करावा. दिवाळीच्या व उन्हाळ्यातील सुट्ट्या रद्द करून आवश्यक दिवस उपलब्ध होत असतील तर अभ्यासक्रम कमी करण्याची आवश्यकता नाही, असे मत शिक्षण तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

केंद्रीय मनुष्यबळ मंत्री डॉ. रमेश पोखरियाल 'निशंक' यांनी अभ्यासक्रम कमी करण्याबाबत विचार सुरु असल्याचे सांगितले. परंतु,अभ्यासक्रम कमी करण्याबाबत आत्ताच विचार करण्याची आवश्यकता नाही. शैक्षणिक वर्षासाठी किती दिवस उपलब्ध होतात यावर सर्व काही अवलंबून आहे. पाठ्यपुस्तक आणि अभ्यासक्रम याबाबत नेहमीच गल्लत केली जाते. कोणत्या इयत्तेमधील विद्यार्थ्याला कोणते घटक येणे आवश्यक आहे, याचा विचार होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमता त्या-त्या इयत्तेमध्ये विकसित व्हायला हव्यात. केवळ सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (सीबीएससीई) च्या शाळांसाठीच हा निर्णय लागू असणार आहे की राज्य शासनही याबाबत निर्णय घेणार हे पाहणे उत्सुकतेचे आहे. परीक्षा घेतली नाही तरी चालेल पण अभ्यासक्रम पूर्ण केला पाहिजे, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

> सप्टेंबर- ऑक्टोबरपर्यंत शाळा सुरु झाल्या तरी दिवाळीच्या उन्हाळ्याच्या सुट्या कमी करून सर्व अभ्यासकम पूर्ण करता येऊ शकतो. केंद्र शासनाने प्रत्येक राज्यातील काही शिक्षणतज्ज्ञांशी चर्चा करून निर्णय घ्यावा. अभ्यासकम कमी करण्याची घाई करू नये.
>
> – **डॉ. अ. ल. देशमुख,** ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ

> अभ्यासक्रम कमी करताना पुढच्या वर्गातील अभ्यासक्रम शिकताना विद्यार्थ्यांना काही अडचण येणार नाही याची खात्री करावी. भाषा किंवा गणित विषयांचे अभ्यासक्रम कमी करताना न शिकवल्या जणाऱ्या भागामुळे पुढचा भाग शिकविण्यास अडचण येणार नाही याची काळजी घ्यावी.
>
> – **बसंती रॉय**, शिक्षणतज्ज्ञ

> शैक्षणिक वर्षासाठी २३० ते २३० दिवस आवश्यक असतात. त्यामुळे शैक्षणिक काम करण्यासाठी किती दिवस उपलब्ध आहेत, त्यावर अभ्यासक्रम कमी करावा किंवा नाही हे ठरवावे. पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम याची नेहमीच गल्लत केली जाते. विद्यार्थ्यांच्या श्रावण, वाचन, लेखन आणि संभाषण अधिक क्षमता विकसित व्हायला हव्यात. पाठ्यपुस्तकातील कमी महत्त्वाचे घटक वगळे तरी काही हरकत नाही.
>
> – **एन. के.जरग**, माजी माध्यमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य

> अभ्यासक्रमातील कमी महत्त्वाचे घटक वगळले तरी फारसा फरक पडत नाही. परंतु, कोणत्या इयत्तेमधील विद्यार्थ्याला काय आले पाहिजे. याबाबत निश्चित झालेल्या क्षमता तशाच ठेवाव्या लागतील.
>
> – **हेमांगी जोशी**, निमंत्रक, महाराष्ट्र शिक्षण हक्क मंच

Pune Main
Page No. 3 Jun 11, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

लोकमत

# आपत्कालीन स्थितीत परीक्षेपेक्षा शिक्षण सुरु राहणे महत्त्वाचे

## राज्यपालांसमोरच मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अंतिम वर्षाच्या परिक्षांवरुन राज्यपाल आणि राज्य सरकारमधील संघर्षाचे पडसाद गुरुवारी मुंबईतील समूह विद्यापीठाच्या उद्घघाटनप्रसंगी पाहायला मिळाले. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या समोरच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपत्कालीन स्थितीत परीक्षा नव्हे तर शिक्षण सुरु राहणे महत्त्वाचे आहे, असे विधान करत राज्यपालांवरच निशाणा साधला.

मुंबईतील के. सी. महाविद्यालय, एच. आर. वाणिज्य महाविद्यालय व बॉम्बे टीचर्स ट्रेनिंग कॉलेज यांचा समावेश असलेल्या हैदराबाद सिंध नॅशनल कॉलेजिएट (एचएसएनसी) समूह विद्यापीठाचे उदघाटन राज्यपालांच्या हस्ते गुरुवारी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री ठाकरेही उपस्थित होते. शिक्षण जीवनावश्यक गोष्ट आहे, असे सांगून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपत्कालीन परिस्थीतीमध्ये देखील विद्यार्थ्यांचे शिक्षण अविरत सुरुच राहिले पाहिजे, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. नवे समूह विद्यापीठ पारंपारिक शिक्षणासोबत संगीत, नृत्य, कला इत्यादी विषयांचे शिक्षण घेण्याची संधी देणार असल्याबद्दल विद्यापीठाचे अभिनंदन करुन जीवनात कला फार महत्त्वाची आहे असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

तर, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्री ठाकरे यांच्या राजकीय विधानांकडे साफ दुर्लक्ष केले. मागील शतक संशोधनाचे होते. आता नावीन्यपूर्ण आविष्कार आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा काळ आला आहे. यादिशेने शिक्षण संस्थांनी कार्य करुन सेंटर ऑफ एक्सलंस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात भारताचा समृद्ध वारसा असलेली आध्यात्मिक बुद्धिमत्ताही तितकीच महत्त्वाची आहे. या आध्यात्मिक ज्ञानाच्या तसेच योगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वत: मध्ये असलेले पूर्णत्व अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन राज्यपालांनी केले.

आगामी काळात शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल करावे लागतील, असे सांगून सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे रुपातंर विद्यापीठात करण्याच्या दृष्टीने शासन विचार करीत असल्याचे उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी यावेळी सांगितले. एचएसएनसी क्लस्टर विद्यापीठ विद्यार्थ्यांना कौशल्याच्या माध्यमातून आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न करील असे निरंजन हिरानंदानी म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विद्यापीठाच्या संकेत स्थळाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी हैदराबाद सिंध महाविद्यालय मंडळाचे अध्यक्ष किशु मनसुखानी, विद्यापीठ संस्थामधील प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

Pune Main
Page No. 8 Jun 12, 2020
Powered by: erelego.com

# 'पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मिळावी'

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ११** - लॉकडाऊन कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना संशोधनाचे काम पूर्ण करता आलेले नाही. त्यामुळे पीएचडी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी सिनेट सदस्यांनी केली.

प्रा. शामकांत देशमुख, डॉ. संजय खरात, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, शशिकांत तिकोटे, गिरीश भवाळकर, बागेश्री मंठाळकर यांनी निवेदन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना दिले. तसेच, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह प्रा. निवेदिता एकबोटे, प्राचार्य डॉ. प्रवीण चौधरी, सुनीता आढाव यांची निवेदनावर स्वाक्षरी आहे. पीएचडीसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शकांना संपर्क साधता आलेला नाही. त्यांचे संशोधनाचे काम पूर्ण करण्यासाठी ग्रंथालय व संशोधनासाठी प्रयोगशाळा उपलब्ध होऊ शकलेली नाही. त्यामुळे त्यांचे संशोधनाचे काम मागे पडले आहे.

Prabhat: 12.6.2020

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# रद्द परीक्षांचे शुल्क विद्यापीठाने विद्यार्थ्यांना परत करावे

**पिंपरी** : कोविड–१९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील महाविद्यालयाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. या परीक्षांसाठी विद्यापीठाने विद्यार्थ्यांकडून २०० ते २००० रुपये एवढे परीक्षा शुल्क आकारले आहे. मात्र, परीक्षा रद्द करण्यात आल्यामुळे हे आकारण्यात आलेले शुल्क विद्यापीठाने परत करावे अशी मागणी छात्र युवा संघर्ष समिती व आप युवा आघाडीने केली आहे.

कोविड–१९ महामारीमुळे पालक वर्गदेखील आर्थिक अडचणीत सापडले आहेत. तसेच परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यापीठाने आकारलेली परीक्षा शुल्क परत विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करावे अशी मागणी 'छात्र युवा संघर्ष समिती' व 'आप' युवा आघाडीच्या वतीने केली आहे. या मागणीसाठी 'आप' च्या वतीने पुणे व मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंना पत्र देण्यात आले आहे. तसेच आप तर्फ 'परीक्षा फी परत करा' हे हॅशटॅग वापरून ट्विटर कॅम्पेन चालवण्यात येत आहे. याबाबत बोलताना छात्र युवा संघर्ष समितीचे महासचिव महेश सामंत म्हणाले की, लॉकडाऊनमुळे नागरिकांवर आर्थिक ताण आला आहे. महाराष्ट्रात बरेच विद्यार्थी शेतकरी कुटुंबातील, कामगारवर्गातील व काही स्वतः कमवून शिकणारे आहेत. परीक्षा फी परत मिळाल्यास या विद्यार्थ्यांच्या परिवाराला बरीच मदत मिळू शकेल. जोपर्यंत परीक्षा फी परत मिळत नाही, तोपर्यंत समिती प्रयत्न करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. आप युवा आघाडीनेचे उपाध्यक्ष संदीप सोनावणे म्हणाले, कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत अंतिम वर्ष सोडून इतर सर्व परीक्षा रद्द झालेल्या असताना अडचणीत आलेल्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा फी वसूल करणे म्हणजे टाळूवरचे लोणी खाण्यासारखा प्रकार आहे.

Kesari: 12.6.2020

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

### पुणे विद्यापीठाचे मानांकन उंचावले

- देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या यादीत नववे स्थान
- पहिल्या दहा क्रमांकात स्थान मिळविणारे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ



**पुणे, दि. ११** - देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांची २०20 सालची यादी (राष्ट्रीय संस्थात्मक नामांकन) जाहीर झाली आहे. त्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सलग चौथ्या वर्षी पहिल्या दहामध्ये स्थान कायम ठेवले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पुणे विद्यापीठाची कामगिरी एक क्रमांकाने उंचावली आहे. देशातील विद्यापीठांमध्ये नववे स्थान पटकावले आहे. पहिल्या दहा क्रमांकात स्थान मिळविणारे हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे.

विद्यापीठ गटात पुणे विद्यापीठ सरस ठरले असली तरी देशातील सर्व संस्थांच्या गटामध्येही (ओव्हर ऑल) पुणे विद्यापीठाची दोन क्रमांकानी नामांकन घसरले आहे. यंदा १९ वे स्थान मिळाले आहे. केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे ही नामांकने दिली जातात. क्रमवारी ठरविताना विद्यापीठे, सर्व संस्था, अभियांत्रिकी, महाविद्यालये, व्यवस्थापन, फार्मसी, वैद्यकीय व कायदा असे एकंदर नऊ गट निश्चित केले होते.

> पुणे विद्यापीठाबद्दल 'परसेप्शन' या गटात गतवर्षीच्या १६.५५ वरून यंदा ४४.९९ इतके गुण मिळाले आहेत. त्यावरून लोकांचा विद्यापीठाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सुधारला आहे. सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व अधिकार मंडळांच्या कार्याचे हे सामूहिक यश आहे.
>
> – **प्रा. (डॉ.) नितीन करमळकर**, कुलगुरू

Sakal: 12.6.2020



# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# देशात पहिल्या दहामध्ये पुणे विद्यापीठ

## राष्ट्रीय संस्थात्मक मानांकन यादी जाहीर

**पुणे, ता. ११ :** देशातील दहा दर्जेदार शिक्षण संस्थांच्या यादीमध्ये आयआयटी मुंबई आणि विद्यापीठ गटात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या दोन संस्थांचा समावेश झाला आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे राष्ट्रीय संस्थात्मक मानांकन यादी (एनआयआरएफ) २०२० आज जाहीर करण्यात आली आहे.

राष्ट्रीय स्तरावरील विद्यापीठांच्या क्रमवारीत पहिल्या दहामध्ये स्थान पटकाविणारे पुणे विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ ठरले आहे. मात्र, देशातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या गटात विद्यापीठाची कामगिरी घसरली आहे. या गटात यंदा विद्यापीठाचे नामांकन दोन क्रमांकांनी घसरले असून, यंदा पुणे विद्यापीठ १९व्या स्थानावर आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे ही नामांकने दरवर्षी जाहीर होतात. रँकिंग ठरविताना विद्यापीठे, सर्व शैक्षणिक संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालये, व्यवस्थापन, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय, स्थापत्यशास्त्र आणि कायदा असे एकूण नऊ गट निश्चित केले आहेत. पान ६ वर »

### पहिली दहा विद्यापीठे

१. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळूरू
२. जेएनयू, दिल्ली
३. बनारस हिंदू विद्यापीठ - वाराणसी
४. अमृता विश्व विद्यापीठम, कोइमतूर
५. जादवपूर विद्यापीठ, कोलकता
६. हैदराबाद विद्यापीठ, हैदराबाद
७. कलकत्ता विद्यापीठ, कोलकता
८. मणिपाल ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन, मणिपाल
९. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
१०. जामिया मिलिया इस्लामिया, नवी दिल्ली

### क्रमवारीतील पुण्यातील विद्यापीठे


| विद्यापीठाचे नाव | रँकिंग स्थान |
| --- | --- |
| सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | ९वे |
| सिम्बायोसिस इंटरनॅशनल | ४३वे |
| डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ | ४६वे |
| भारती विद्यापीठ | ६३वे |

**राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाला मिळालेल्या क्रमवारीबाबत आम्ही आनंदी आहोत. रँकिंगसाठी असलेल्या निकषामध्ये विद्यापीठाची कामगिरी समाधानकारक आहे. विशेषत: संशोधन आणि प्रकाशन यामधील कार्य उल्लेखनीय आहे.**

**- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

### फर्ग्युसनचा गौरव

राष्ट्रीय स्तरावरील महाविद्यालयाच्या रँकिंगमध्ये पहिल्या शंभर महाविद्यालयांमध्ये विद्येच्या माहेरघरातील केवळ फर्ग्युसन महाविद्यालय हे एकच महाविद्यालय आहे. या क्रमवारीत फर्ग्युसन महाविद्यालय ५६.०४ गुणांसह ४२व्या क्रमांकावर आहे.



# देशात पहिल्या दहामध्ये पुणे विद्यापीठ

» पान १ वरून

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्थान

- विद्यापीठाच्या यादीत यंदा ६१.१३ गुणांसह नवव्या स्थानावर
- गेल्या वर्षी ५८. ४० गुण
- सर्व संस्थांच्या गटात यंदा १९व्या स्थानावर

### पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये

**महाविद्यालयाचे नाव : रँकिंगमधील स्थान**

- अभियांत्रिकी महाविद्यालय (सीओईपी) : ५०वे
- डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी : ६३वे
- भारती विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग : ९९वे

### 'एनआयआरएफ'मध्ये शहरातील संस्थांचे स्थान

- **सर्व शैक्षणिक संस्था गट :**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ- १९वे, आयसर-२५वे, सिम्बायोसिस इंटरनॅशनल-७३वे,
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ-७५वे, भारती विद्यापीठ-९८वे
- **व्यवस्थापन गट :** सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनजेमेंट- २२वे
- **वैद्यकीय गट :** डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ- २४वे
- **कायदा गट :** सिम्बायोसिस लॉ स्कूल- आठवे
- **औषधनिर्माणशास्त्र गट :** पूना कॉलेज ऑफ फार्मसी-२२वे,
पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च-४१वे,
पी. ई. एस. मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी-६८वे,
पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी-७१ वे,
डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी-७३वे
- **दंतवैद्यकीय गट :** डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ- तिसरे

Sakal: 12.6.2020

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education




### केंद्रीय पद्धतीने परीक्षा शक्य

#### सर्व विद्यापीठांसाठी एकाच बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेचा पर्याय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सहायक प्राध्यापक पदासाठी घेतल्या जाणाऱ्या राज्य पात्रता परीक्षेच्या (सेट) धर्तीवर राज्यातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची केंद्रीय पद्धतीने परीक्षा घेणे शक्य आहे. राज्यातील सर्व विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांसाठी विद्याशाखानिहाय एकच बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार करून ही परीक्षा घेतली जाऊ शकते. केंद्रीय पद्धतीमुळे *(पान २ वर)*

- राज्यातील विद्यापीठांचे अंतिम वर्षाचे अभ्यासक्रम वेगळे असले, तरी त्यात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) धोरणानुसार ७० टक्के साम्य आहे. त्यामुळे सर्व विषयांचा समावेश असलेली एकच बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार करणे शक्य आहे.
- राज्यातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची एकाच वेळी परीक्षा घेता येऊ शकते. या प्रश्नपत्रिकेत सर्व

**उपयुक्तता कशी?**

विषयांचा समावेश असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाची स्वतंत्र परीक्षा द्यावी लागणार नाही.

- प्रश्नपत्रिकेवरील बारकोड आणि ओएमआर पद्धतीमुळे या परीक्षेचा निकाल लवकर जाहीर करता येऊ शकतो.
- सर्व विद्यापीठांकडे तयार असलेल्या अंतिम वर्ष परीक्षांसाठीच्या प्रश्नपत्रिकांचा वापर करून पंधरा ते वीस दिवसांत केंद्रीय परीक्षेसाठीची प्रश्नपत्रिका तयार केली जाऊ शकते. त्यात किमान काठिण्यपातळीही राखली जाईल.
- परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना त्यांची नोंदणी असलेल्या महाविद्यालयात किंवा विद्यापीठात जाण्याची गरज नाही. नजीकच्या केंद्रावरूनही ते परीक्षा देऊ शकतात.

लोकसत्ता Wed, 17 June 2020
https://epaper.loksatta.com/c/52794879

### केंद्रीय पद्धतीने परीक्षा शक्य

*(पान १ वरून)* कोणत्याही विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावरून ही परीक्षा देणे शक्य होईल, असे शिक्षण वर्तुळातील सूत्रांचे मत आहे.

करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. मात्र, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी त्याबाबत नाराजी व्यक्त करत विद्यापीठ कायद्यानुसार परीक्षा घेण्याची ठाम भूमिका मांडली. त्यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षांचा पेच निर्माण झाला आहे. या घडामोडींना आता पंधरा दिवस होत आले, तरी परीक्षांच्या निर्णयाचे घोंगडे अद्याप भिजत पडले आहे. राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या बैठकीत 'सेट' परीक्षेच्या धर्तीवर केंद्रीय पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत चर्चा झाली होती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सेट ही परीक्षा महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांमध्ये घेतली जाते. सध्याच्या करोना संसर्गाच्या काळात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयाची स्वतंत्र परीक्षा घेण्याऐवजी एकच बहुपर्यायी प्रश्नपत्रिका असलेली केंद्रीय पद्धत सोपी आणि उपयुक्त ठरू शकते. सर्व विद्यार्थ्यांसाठी एकच परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना त्यांची पदवी त्यांच्याच विद्यापीठाकडून देता येऊ शकते. मात्र, या पर्यायाचा सर्व बाजूने विचार करण्यापूर्वीच शासनाकडून परीक्षा रद्दचा निर्णय घेण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

**निर्णय राज्यपालांकडे...**

केंद्रीय पद्धतीने परीक्षा घेण्याचा पर्याय राज्य शासनाला अद्यापही खुला आहे. या पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत राज्यपाल निर्णय घेऊ शकतात, अशी माहिती देण्यात आली.

लोकसत्ता Wed, 17 June 2020
https://epaper.loksatta.com/c/52795055

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

पुढारी

# अंतिम वर्षाच्या परीक्षेचे त्रांगडे

**पुणे : गणेश खळदकर**

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत राज्यपाल व राज्य सरकारने वेगवेगळी भूमिका घेतल्याने अंतिम वर्षाच्या परीक्षांचे घोंगडे भिजत पडले आहे. त्यातच शहरातील काही नामांकित शिक्षण संस्थांनी पहिल्यांदाच समोर येत परीक्षा घेण्याची भूमिका स्पष्ट केली आहे.

विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांची भूमिका परीक्षा रद्द करण्याची आहे. तिसऱ्या बाजूला परीक्षा घेतली तरी ते केवळ सोपस्कार होणार असल्याची भूमिका परीक्षा घेणाऱ्या काही अधिकाऱ्यांनी मांडली आहे. त्यामुळे राज्यपाल, शिक्षणसंस्था आणि राज्य शासन या तिहेरी त्रांगड्यात विद्यार्थी भरडले जात आहे.

**परीक्षा तर नावालाच**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा घ्यायच्या की नाही यावरून सध्या मोठा



संभ्रमावस्था/ पान ५

वाद सुरू आहे. त्यातच विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी परीक्षा घेण्यासाठी किमान दोन महिने आणि निकालासाठी किमान दोन महिने असा एकूण चार महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच, परीक्षांचे स्वरूप मवाळ केले असून त्या केवळ नावालाच घेतल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे केवळ परीक्षांसाठी विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालण्यात काहीच अर्थ नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता विद्यार्थ्यांची परीक्षा रद्द करणे हेच सर्वांच्या हिताचे आहे. यामध्ये विद्यार्थी, पालक यांचे आरोग्य सुरक्षित राहील, अशी भूमिका शैक्षणिक अधिकाऱ्यांनी मांडली आहे.

- **शिक्षण संस्थांची भूमिका परीक्षा घेण्याची**
- **विद्यार्थी संघटनांची भूमिका परीक्षा रद्द करण्याची**
- **परीक्षा मंडळ म्हणते होऊ पाहणाऱ्या परीक्षा तर एक सोपस्कार**

### परीक्षा व मूल्यांकन कसे?

- सत्र स्तरावरील परीक्षा फक्त अखेरच्या सत्राच्याच
- परीक्षा वार्षिक असल्यास केवळ अंतिम वर्षाची परीक्षा
- ज्यांच्या परीक्षा होणार नाहीत त्यांना पुढील वर्गात प्रवेश
- वर्षातील किंवा सत्रातील अंतर्गत मूल्यमापनाचे ५० टक्के आणि आधीच्या सत्रातील किंवा वर्षातील गुण ५० टक्के असे ग्राह्य धरून मूल्यांकन
- पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांचे फक्त अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ग्राह्य धरून सरासरी काढणार
- अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा झाल्या नसल्यास विद्यार्थ्यांचा प्रकल्प, प्रयोगवहीच्याआधारे किंवा ऑनलाइन तोंडी परीक्षा घेऊन मूल्यांकन

Pune Edition
17 Jun, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# दहावी, बारावीचा निकाल जुलैमध्ये जाहीर होणार

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. १६ - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षेचा निकाल जुलैमध्ये लावण्यात येणार आहे.

राज्यात करोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने लॉकडाऊनही करण्यात




आले आहे. यामुळे पेपर तपासणीच्या कामावर त्याचा परिणाम झाला होता. आता मात्र उत्तरपत्रिका तपासणी व सबमिशनची कामे वेगाने पूर्ण होऊ लागली आहेत. निकाल कधी लागणार याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

१५ जुलैपर्यंत बारावीचा निकाल जाहीर करणार असल्याचे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी स्पष्ट संकेत दिले आहेत. जुलैच्या शेवटच्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर होणार आहे. त्यानंतर अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑगस्टमध्ये पूर्ण करून सप्टेंबरपासून अकरावीचे वर्ग सुरू करता येणार आहेत. ज्या ठिकाणी शाळा सुरू होणार नाही तिथे टाटा स्काय, जिओ यांच्या मदतीने शिक्षणाचे पायलट प्रोजेक्ट लगेचच सुरू करून त्याचा बारकाईने आढावा घेण्याचे नियोजनही करण्यात येणार आहे.

प्रभात Wed, 17 June 2020
epaper.eprabhat.net/c/52800293

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# पदवी परीक्षा नाहीच!

## मुख्यमंत्री ठाम; व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा निर्णय शिखर संस्थांकडे

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**मुंबई** : राज्यपाल व कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी आक्षेप घेतला तरी कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ठाम आहेत. अभियांत्रिकी, वैद्यकीय, तसेच अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षाही रद्द कराव्यात, अशी विनंती राज्य सरकार संबंधित शिखर संस्थांकडे करणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

करोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठांच्या व्यावसायिक आणि कला, विज्ञान, वाणिज्य आदी पारंपरिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यासारखी परिस्थिती सध्या तरी राज्यात नाही. त्यामुळे या परीक्षा न घेण्याचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला होता. मुख्यमंत्र्यांनी तो जाहीरही केला. मात्र, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सरकारचा हा निर्णय फेटाळून लावत कायद्यानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याची भूमिका मांडल्याने सरकारपुढे मोठा पेच निर्माण झाला होता. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी याबाबत घेतलेल्या बैठकीत पारंपरिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयाचा पुनरुच्चार केला. बैठकीस उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, विद्यापीठांचे कुलगुरू आणि विभागाचे सचिव उपस्थित होते.

विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करून सरासरी गुणांच्या आधारे मूल्यांकन करण्याचा निर्णय आधीच घेण्यात आला आहे. अशा पद्धतीने मिळालेल्या गुणांवर समाधानी नसलेल्या विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षा देण्याची संधीही मिळणार (पान २ वर)

### कायदेशीर सल्ल्यानंतरच निर्णय कायम...

अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्यास राज्यपालांनी आक्षेप घेतल्यानंतर सरकारने हे प्रकरण महाधिवक्त्यांकडे पाठवले होते. त्यांचा अभिप्राय, तसेच अन्य तज्ज्ञांशी सल्लामसलत केल्यानंतर सरकारने हा निर्णय घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. आपत्कालीन व्यवस्थापन कायदा आणि साथरोग अधिनियमानुसार सरकारच्या अधिकारात परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, याबाबतचे आदेश लवकरच काढण्यात येणार असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

देशपातळीवर परीक्षेच्या समान सूत्राला विरोध / ४

लोकसत्ता Fri, 19 June 2020 https://epaper.loksatta.com/c/52851656

# पदवी परीक्षा नाहीच!

(पान १ वरून)

आहे. करोनास्थितीचा आढावा घेऊन तारीख जाहीर करण्यात येईल. अभियांत्रिकी, वैद्यकीय, वास्तूकला, व्यवस्थापन, विधि या व्यावसायिक



अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासारखी स्थिती राज्यात नाही. त्या रद्द करण्याची विनंती राज्य सरकार शिखर संस्थांना करणार आहे. परीक्षांबाबत या संस्थांनीच निर्णय घ्यावा. मात्र, राज्यात परीक्षा कधी होतील, हे आता सांगता येणार नसल्याचेही संस्थांना कळविण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

लोकसत्ता Fri, 19 https://

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

पुढारी

# बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. अंतिम वर्षाची परीक्षा रद्द

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक व अव्यावसायिक (बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.) अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. कोरोनाची साथ नियंत्रणात केव्हापर्यंत येईल याबाबत स्पष्टता नसल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी फेसबुक लाईव्हद्वारे सांगितले. मात्र, ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा असेल त्यांना परीक्षा देण्याची मुभा असणार आहे. एटीकेटी असलेल्या विद्यार्थ्यांबाबत पुढील दोन दिवसांत निर्णय घेण्यात येईल, असेही स्पष्ट केले.

राज्यभरात १४ सार्वजनिक विद्यापीठांमध्ये अंतिम वर्षाच्या अव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाला ७ लाख ३४ हजार५१६ तर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी २ लाख ८३ हजार ९३७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कोरोनाची राज्यातील परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने परीक्षेसाठी राज्यातील विविध ठिकाणांहून ये-जा करणे, एकत्र जमा होणे याचा विचार होणे गरजेचे आहे.

सध्या राज्यातील ४१ महाविद्यालयांच्या इमारती आणि १९८ वसतिगृहे ही विलगीकरण कक्षासाठी वापरात आहेत. वाढत्या कोरोनामुळे राज्यभरातील बहुतांश विद्यार्थी शिक्षणाच्या ठिकाणापासून आपल्या गावी गेले आहेत. कोरोना नियंत्रणात केव्हापर्यंत येईल याबाबत कोणतेही भाकीत करणे शक्य नाही. अशा परिस्थितीत अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा जुलैमध्ये घेणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय १८ जूनला झालेल्या राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत झाला पान २ वर »

### संभ्रम वाढणार...



सर्व सत्रांत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा असल्यास त्यांच्याकडून लेखी स्वरूपात घेऊन त्यांना परीक्षेला बसण्याची संधी देण्यात यावी. कोरोनाची स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल. यामुळे राज्यातील संभ्रम मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. असे विद्यार्थी मोठ्या संख्येने आले तर त्यांची परीक्षा कशी घेणार आणि नियोजन कसे करणार, हा प्रश्न पुन्हा तयार होणार आहे. या विद्यार्थ्यांमुळे पुन्हा पदवी निकालाचा प्रश्न तयार होणार आहे.

Pune Edition
20 Jun, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

पान १ वरून...

## बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. अंतिम वर्षाची परीक्षा रद्द

असल्याचे सामंत यांनी स्पष्ट करत यासंदर्भात शासन निर्णय जारी केला असल्याचेही सांगितले. मागील सर्व सत्रांत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र हवे असल्यास त्यांनी लेखी द्यावे.

त्यानंतर विद्यापीठांनी योग्य सूत्र वापरून निकाल घोषित करावा असे म्हटले आहे. एटीकेटी, बॅकलॉग विषयांच्या परीक्षेसंदर्भात विद्यापीठांचे कुलगुरू व संबंधित अधिकाऱ्यांची शासनस्तरावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येईल. असेही ते म्हणाले.

**विद्यार्थ्यांना असणार मुभा...**

परीक्षा देण्यासंदर्भातील निर्णय घेण्याची मुभा विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची इच्छा असेल त्यांच्याकडून लेखी स्वरूपात घेऊन त्यांना परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येणार आहे. अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेताना स्थानिक पातळीवरील कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन वेळापत्रक विद्यापीठाकडून जाहीर केले जाणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा न देता प्रमाणपत्र हवे असेल त्यांना विद्यापीठांनी योग्य सूत्र वापरून त्यांचा निकाल जाहीर केला जाणार आहे.

**विद्यार्थ्यांसोबत ही तर हेराफेरी : आशिष शेलार**

बॅकलॉग व एटीकेटीच्या ३ लाख ४१ हजार ३०८ विद्यार्थ्यांना वाऱ्यावरच सोडले? राज्यातील विद्यार्थ्यांचा एकत्रित एकसूत्री निर्णय नाही... हे शैक्षणिक आरोग्य बिघडवण्याचे पाप असून आमची भीती खरी ठरली आहे. राज्य सरकारने विद्यार्थ्यांसोबत हेराफेरीच केली, अशा शब्दांत भाजप नेते, माजी शिक्षणमंत्री आमदार ॲड. आशिष शेलार यांनी टीका केली आहे.

**शिखर संस्थेची मान्यता घेणार...**

व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणजेच अभियांत्रिकी, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट, व्यवस्थापनशास्त्र, वास्तुकला, प्लॅनिंग, संगणकशास्त्र, विधी, शारीरिक शिक्षण, अध्यापन शास्त्र या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र या निर्णयाला दिल्लीत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिखर संस्थेची मान्यता असणे आवश्यक आहे. त्यामुळे हा निर्णय शिखर संस्थेकडे पाठवण्यात आला असून, त्यासंदर्भात स्वतंत्ररीत्या कळवण्यात येईल, असेही उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांची घोषणा ▪ एटीकेटीचा निर्णय दोन दिवसांत

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) – विद्यापीठाच्या अंतिम वर्षातील परीक्षांबाबतचा निर्णय अखेर जारी झाला असून जे विद्यार्थी आतापर्यंत उत्तीर्ण झाले आहेत त्यांची परीक्षा होणार नसल्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी केली. तसेच एटीकेटीसंदर्भात येत्या दोन दिवसांत निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अंतिम वर्षांच्या परीक्षांबाबतचा अध्यादेश शुक्रवारी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जारी केला तसेच उदय सामंत यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून



विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची आहे त्यांनी विद्यापीठाला लिहून कळवायचे आहे. त्याचप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा न देता पदवी हवी आहे अशांनीदेखील विद्यापीठाला लेखी स्वरूपात कळवावे असे निर्णय झाले ▪ पान ६

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ नुसार राज्यातील अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात निर्णय घेण्यात आले. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र हवे आहे. त्यांनी विद्यापीठाला लेखी स्वरूपात लिहून द्यायचे आहे. त्यानुसार विद्यापीठ त्याच्या मागील परीक्षेच्या आधारावर निकाल तयार करणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची इच्छा आहे अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठाला तसे लिहून देणे आणि विद्यापीठाने त्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेची तयारी करणे अपेक्षित आहे. या विद्यार्थ्यांची परीक्षा आयोजित करतांना जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने विद्यापीठाने परीक्षेचे वेळापत्रक तयार करायचे आहे.

एटीकेटीच्या विद्यार्थ्यांबाबत सर्व कुलगुरू आणि अधिकारी बैठक घेऊन पुढील २ दिवसात निर्णय घेणार आहेत.

20-06-2020
http://epaper.saamana.com/

# अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द

*(पान १ वरून)* असे निर्णय झाले असल्याचे अध्यादेशात म्हटले आहे.

### मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना दिलासा

राज्यात कोरोनाचा प्रभाव कायम आहे त्यामुळे आताच्याघडीला परीक्षा घेणे कोणत्याही विद्यापीठाला जमणार नाही. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत उदय सामंत यांची बैठक १८ जूनला पार पडली. त्यानुसार मुख्यमंत्री ठाकरे यांनी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल असा निर्णय घेतला. शुक्रवारी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्यावतीने अध्यादेश काढत आतापर्यंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा न घेण्याचा निर्णय जारी केला.

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

**लोकमत**

### विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा अखेर रद्द

**मुंबई :** कोरोनामुळे लटकलेल्या विद्यापीठांच्या अंतिम सत्राच्या परीक्षा अखेर रद्द झाल्या आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षादेखील घेणे शक्य नसल्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले आहे.

सामंत यांनी शुक्रवारी फेसबुक लाईव्हद्वारे विद्यार्थी व पालकांशी संवाद साधून ही माहिती दिली. बॅकलॉग तसेच एटीकेटीच्या विद्यार्थ्यांबाबत येत्या २ ते ३ दिवसांत विद्यापीठांचे कुलगुरु व अधिकारी यांची शासन स्तरावर बैठक घेऊन निर्णय घेण्यात येणार असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले. जे विद्यार्थी मागील सत्रात उत्तीर्ण आहेत आणि ज्यांना परीक्षा न देता पदवी (पान ४ वर)

Pune Main
Page No. 3 Jun 20, 2020
Powered by: erelego.com

**लोकमत**

### विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द

(पान १ वरून) प्रमाणपत्र हवे आहे अशा विद्यार्थ्यांकडून लेखी लिहून घेऊन विद्यापीठांनी योग्य ते सूत्र वापरुन निकाल घोषित करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची आहे त्या विद्यार्थ्यांकडून तसे लिहून घेऊन त्यांना परीक्षेची संधी देण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांची परीक्षा कधी व कशी घेता येईल यासाठी स्थानिक प्राधिकरणे व प्रशासनाशी चर्चा करुन विद्यापीठांनी वेळापत्रक ठरवावे असे निर्देशित करण्यात आले. या निर्णयामुळे कोणत्याही विद्यार्थ्याला त्याच्या भविष्यात नोकरी, परदेशी शिक्षण व इतर कामांत अडथळा येणार नसल्याचेही सामंत यांनी स्पष्ट केले.

#### शिखर संस्थांकडून मंजुरी मिळणे बाकी

व्यावसायिक परीक्षा (अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी, आर्किटेक्चर, अध्यापनशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट, विधि, प्लॅनिंग, व्यवस्थापन शास्त्र, संगणकशास्त्र, शारीरिक शिक्षण) रद्दच्या निर्णयाला त्यांच्या शिखर संस्थांकडून (अॅपेक्स बॉडी) मंजुरी मिळणे बाकी आहे.

त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून त्यांना विनंती करण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले. राज्यातील १४ सार्वजनिक विद्यापीठांत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम सत्रासाठी २,८३,९३७ विद्यार्थी आहेत.

Pune Main
Page No. 6 Jun 20, 2020
Powered by: erelego.com

### संशोधक विद्यार्थ्यांना दिलासा

**प्रभात वृत्तसेवा**

**'यूजीसी'कडून मानव्यविज्ञान, सामाजिक शास्त्रच्या फेलोशिप रकमेत वाढ**

**पुणे, दि. १९** - विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मानव्यविज्ञान आणि सामाजिक शास्त्रे या विषयांतील विविध फेलोशिप अर्थात पाठ्यवृत्तीची रक्कम वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. 'यूजीसी'च्या या निर्णयामुळे संशोधक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्ती (जेआरएफ) आणि वरिष्ठ संशोधक पाठ्यवृत्ती (एसआरएफ) या संशोधन पाठ्यवृत्तीची रक्कम जानेवारीमध्ये वाढवली होती. त्यानंतर आता मानव्यविज्ञान आणि सामाजिक शास्त्रांसाठीच्या पाठ्यवृत्तीची रक्कम वाढवण्याचा निर्णय यूजीसीच्या ५४६व्या बैठकीमध्ये घेण्यात आला. त्यानुसार डॉ. डी. एस. कोठारी पाठ्यवृत्तीमध्ये सर्वसाधारणसाठी पहिल्या वर्षात तीन हजार, द्वितीय वर्षात चार हजार, तृतीय वर्षात साडेसात हजार, उच्च गटात साडेसात हजार रुपये वाढवण्यात आले आहेत. डॉ. एस. आर. बालकृष्णन पाठ्यवृत्तीमध्ये पहिल्या वर्षासाठी आठ हजार दोनशे, द्वितीय वर्षासाठी आठ हजार सातशे, तृतीय वर्षासाठी बारा हजार शंभर रुपयांनी वाढ करण्यात आली. तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांसाठीच्या पीडीएफ पाठ्यवृत्तीमध्ये अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय वर्षासाठी अनुक्रमे आठ हजार दोनशे, नऊ हजार दोनशे आणि तृतीय वर्षासाठी सात हजार पाचशे रुपये वाढवले आहेत. महिलांसाठीच्या पीडीएफ पाठ्यवृत्तीसाठी आठ हजार दोनशे, दहा हजार दोनशे, सात हजार पाचशे रुपयांनी वाढ केल्याचे 'यूजीसी'ने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले.

प्रभात Sat, 20 June 2020
epaper.eprabhat.net/c/52877109

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# परीक्षा रद्द !

## पण विद्यार्थ्यांसाठी पर्याय ऐच्छिक

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १९** - बी.ए, एम.ए, बी.एस्सी, एम.एस्सी आणि बी.कॉम, एम.कॉम या पारंपरिक अर्थात अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाची परीक्षा होणार नसल्याची घोषणा राज्याचे उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी केली. त्याचप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष अथवा सत्राची परीक्षा घेतल्या जाणार नाहीत. या निर्णयास संबंधित शिखर संस्थेस मान्यता देण्याची शिफारस केली जाणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा असेल, त्यांना परीक्षेस बसण्याची संधी दिली जाणार आहे.

सामंत यांनी फेसबुक लाइव्हद्वारे संवाद साधताना अंतिम वर्षाची परीक्षा होणार असल्याचे जाहीर केले. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्या संलग्नित महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम सत्र अथवा अंतिम वर्षाची परीक्षा होणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना



### बॅकलॉगचा निर्णय दोन दिवसांत घेणार

परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र हवे असल्यास तसे त्यांच्याकडून लेखी स्वरूपात घेऊन विद्यापीठांनी योग्य तो निकाल जाहीर करावा. ज्यांना परीक्षा द्यायची असेल, तसे त्यांच्याकडून लेखी स्वरूपात घेऊन परीक्षेस बसण्याची संधी देण्यात यावी. अभियांत्रिकी, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट, व्यवस्थापनशास्त्र, वास्तुकला, प्लॅनिंग, संगणकशास्त्र, विधी (लॉ), शारीरिक शिक्षण व अध्यापन शास्त्र या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्र अथवा वर्षाच्या परीक्षा घेता येणार नाहीत. त्या निर्णयास मान्यता देण्याची विनंती संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिखर संस्थेस करण्यात येईल. स्वतंत्रपणे कळवण्यात येणार असल्याचे सामंत यांनी सांगितले.

प्रभात Sat, 20 June 2020 epaper.eprabhat.net/c/52864944

---

लोकमत

# निकाल लावताना विद्यापीठांचा कस

## शिक्षणतज्ज्ञांचे मत : बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांनी परीक्षा देणेच उचित; विद्यार्थ्यांना द्यावा लागेल तात्पुरता प्रवेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य शासनाने अंतिम वर्षाच्या परीक्षांसंदर्भात निर्णय जाहीर केला. मात्र, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा न घेतलेल्या अभ्यासक्रमांचा निकाल जाहीर करताना विद्यापीठांचा चांगलाच कस लागणार आहे. मुक्त विद्यापीठांच्या काही अभ्यासक्रमांसह बहिस्थ: अभ्यासक्रमांतर्गत परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल कसा जाहीर करावा, असा प्रश्न विद्यापीठांसमोर पडणार आहे.

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अंतिम वर्षाच्या परीक्षांसदर्भात अध्यादेश प्रसिद्ध केला आहे. त्यात मागील गुणांच्या आधारे परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र घेण्याचा व परीक्षा देऊन पदवी प्रमाणपत्र घेण्याचा, असे दोन पर्याय विद्यार्थ्यांना देण्यात आले आहेत.

तसेच, बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंदर्भात लवकरच निर्णय जाहीर केला जाणार आहे. परंतु, अनेक विद्यार्थ्यांचे प्रथम वर्षाचे, तर काहींचे द्वितीय व तृतीय वर्षाचे बॅकलॉगचे विषय राहिलेले असतात. तसेच, सरासरी गुण देऊनही या विद्यार्थ्यांन नापास झालेल्या विषयात उत्तीर्ण करता येत नाही. त्यामुळे बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याशिवाय सध्या, तरी दुसरा पर्याय उपलब्ध नाही.

राज्य शासनाने परीक्षेसंदर्भातील अनेक गोष्टी आता विद्यापीठाकडे सोपविल्या आहेत. स्थानिक प्रशासनाशी चर्चा करून विद्यापीठांना परीक्षांचे नियोजन करावे लागणार आहे. त्यामुळे यापुढे परीक्षा देण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे. हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. काही विद्यार्थी नियमित परीक्ष देणारे व बॅकलॉगची परीक्षा देणारे असू शकतात. त्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वेळापत्रक तयार करावे लागेल. तसेच, शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना तात्पूर्ता प्रवेश (प्रोव्हिजनल ॲडमिशन) द्यावा लागेल.



> अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा, यशवंतराव मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा आणि बहिस्थ: अभ्यासक्रमाच्या परीक्षा यात फरक आहे. मुक्त विद्यापीठाच्या काही अभ्यासक्रमासाठी अंतर्गत मूल्यमापनासाठी आवश्यक असणाऱ्या परीक्षा घेतल्या जात नाहीत. शासन निर्णयामुळे काही शैक्षणिक अडचणी निर्माण होणार आहेत, त्या सोडविण्यासाठी विद्यापीठाचा कस लागणार आहे.
>
> - प्रा. नंदकुमार निकम, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

> बहिस्थ:च्या व मुक्त विद्यापीठाच्या काही अभ्यासक्रमांसाठी अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा घेतल्या जात नाहीत. त्यामुळे या अभ्यासक्रमांचा निकाल जाहीर करण्यास अडचणी येऊ शकतील. तसेच, बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेचा मार्ग स्वीकारणेच उचित आहे.
>
> - डॉ. आर. एस. माळी, माजी कुलगुरु, जळगाव विद्यापीठ

Pune Main
Page No. 2 Jun 22, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

पुढारी

# परीक्षांचे अर्ज भरण्यास २५ जूनपर्यंत मुदतवाढ

## अंतर्गत मूल्यमापन गुणासाठी २७ जूनपर्यंत मुदत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

इंटरनेट संगणकीय प्रणालीत तांत्रिक अडचणी आल्यामुळे, तसेच व्यापक विद्यार्थिहिताचा विचार करून कुलगुरूंशी दूरध्वनीवरील चर्चेनुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने परीक्षा अर्ज भरण्यासाठी अंतिम मुदत गुरुवार दि. २५ जून २०२० तसेच अंतर्गत मूल्यमापनाचे गुण विद्यापीठ वेब पोर्टलवर घेण्याची अंतिम मुदत शनिवार दि. २७ जून २०२० पर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अनेक विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म भरणे बाकी असतानादेखील फॉर्मची ऑनलाईन लिंक ५ जून रोजी बंद करण्यात आली. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा विभागाच्या संचालकांचा निर्णय एकांगी व असंवेदनशील आहे. अनेक विद्यार्थ्यांचे अर्थिक गणित बिघडले असल्याने तसेच तांत्रिक सुविधा उपलब्ध नसल्याने परीक्षेचे फॉर्म भरण्यास उशीर होत होता. फॉर्म बंद झाल्याने अनेक विद्यार्थी शैक्षणिक वर्ष वाया जाण्याच्या भीतीने तणावाखाली आहेत.

एकंदरीत परिस्थिती बघता विद्यार्थ्यांना फॉर्म भरण्यासाठी अधिक मुदतवाढ देणे आणि त्यांच्यावरील ताण कमी करणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर अर्ज जमा करण्याची प्रक्रिया सोपी करून विद्यार्थ्यांना महाविद्यालयात जाण्याची आवश्यकता नसावी. तसेच, फॉर्म भरला नसेल तरीही विद्यार्थ्यांचे निकालपत्र तयार करण्यात यावे आणि सर्व सुरळीत झाल्यावर अर्जाची परिपूर्तता करून निकाल जाहीर करता येईल, अशी मागणी सिनेट सदस्य संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे यांनी निवेदनाव्दारे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली होती.

Pune Edition
22 Jun, 2020 Page No. 10
Powered by : erelego.com

# अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द झाल्याने परदेशी शिक्षण योजनेवर परिणाम

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** करोना संक्रमणाच्या भीतीमुळे विद्यापीठ स्तरावरील अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचे राज्य सरकारने ठरविले असल्यामुळे त्याचा मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या परदेशी उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजनांवर परिणाम होणार आहे.

या योजनेअंतर्गत अर्ज करण्यासाठी किमान गुणांची अट आहे. अंतिम वर्षाची परीक्षाच झाली नाही, तर विद्यार्थ्यांना अपेक्षित गुण मिळविता येणार नाहीत. त्याचा परिणाम त्यांच्या परदेशी शिक्षणाच्या संधीवर होऊ शकतो, असे सांगितले जाते.

करोनाच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. विद्यापीठ स्तरावरील अंतिम वर्षाच्या परीक्षेत मिळणाऱ्या गुणांवर विद्यार्थी आपले पुढील शैक्षणिक वा नोकरीविषयक नियोजन करीत असतात. बहुतांश मुले अंतिम वर्षातच जोराने अभ्यास करून अधिकाधिक गुण मिळविण्याचा प्रयत्न करतात. परंतु जर अंतिम वर्षाची परीक्षाच झाली नाही, तर त्यांना ही संधी मिळणार नाही. पदवी वा पदव्युत्तर पदवीच्या अंतिम परीक्षेच्या गुणांवर विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणासाठीचे प्रवेशही निश्चित होतात, त्यात आता अडचण निर्माण होणार आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या अनुसूचित जाती, जमाती, भूमिहिन शेतमूजर, पारंपरिक कारागीर अशा गरीब, परंतु गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण देण्याच्या स्वतंत्र योजना राबविण्यात येतात.

राज्य सरकारने २००३-०४ पासून अशी योजना सुरू केली आहे सुरुवातीला १० विद्यार्थ्यांनंतर, २५, ५० व आता दर वर्षी ७५ विद्यार्थी परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी पाठविले जातात. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी अलीकडेच परदेशी उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी संख्या २०० पर्यंत वाढविण्याची घोषणा केली आहे.




### निकष काय?

- या संदर्भात सामाजिक न्याय विभागातून देण्यात आलेल्या माहितीनुसार परदेशी उच्च शिक्षणासाठी निवड प्रक्रियाही किमान गुणांवर अवलंबून आहे. ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवीच्या शिक्षणासाठी परदेशी जायचे आहे, त्यांना पदवी परीक्षेत किमान ५५ टक्के आणि पीएचडी शिक्षणासाठी पदव्युत्तर पदवी परीक्षेतही किमान ५५ टक्के गुण असावे, हा एक महत्वाचा निकष आहे.
- केंद्र सरकारची परदेशी शिक्षणासाठीची स्वतंत्र योजना आहे. त्याअंतर्गत दर वर्षी १०० विद्यार्थ्यांची निवड केली जाते. त्यासाठी अंतिम वर्षाच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण प्राप्त करणारा विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र धरला जातो. महाराष्ट्रातील विद्यार्थीही त्यासाठी प्रयत्न करीत असतात.
- आता अंतिम वर्षाच्या परीक्षाच होणार नसतील, तर त्याचा मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या परदेशी उच्च शिक्षण योजनेवर परिणाम होऊ शकतो, असे या विभागातील उच्चपदस्थाकडून सांगण्यात आले.

लोकसत्ता Mon, 22 June 2020
https://epaper.loksatta.com/c/52906527

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

**लोकमत**

# प्राध्यापक गिरवताहेत ऑनलाइन शिक्षणाचे धडे!

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना वर्गात बसवून शिकवणे सध्या शक्य दिसत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने कसे शिकवावे, याबाबतचे मार्गदर्शन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्राध्यापकांना दिले जात आहे. त्यामुळे सध्या पुणे, अहमदनगर व नाशिक या जिल्ह्यातील प्राध्यापक ऑनलाइन शिक्षणाचे धडे गिरवत आहेत.

राज्य शासनाने यापूर्वी प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा न घेता पुढील वर्गात पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसमोर परीक्षा देण्याचा व न देण्याचा पर्याय ठेवला आहे. त्यामुळे अंतिम वर्षातील अनेक विद्यार्थी पदवी प्रमाणपत्र घेऊन उत्तीर्ण होणार आहेत. त्यातच काही महाविद्यालयांनी द्वितीय व तृतीय वर्षाची प्रवेशप्रक्रिया सुरु केली आहे. विद्यापीठानेसुद्धा विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करता येणे शक्य आहे का? याबाबतची चाचपणी करण्याचे निर्देश महाविद्यालयांना दिले आहेत. तर, ऑनलाइन पद्धतीने नवीन अभ्यासक्रम कसा शिकवावा आणि विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अधिक प्रभावीपणे कसे मार्गदर्शन करावे, याबाबतच्या कार्यशाळा विद्यापीठातर्फे घेतल्या जात आहेत.

### कंटाळवाणे होणार नाही याची दक्षता

♦ विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर म्हणाले, की 'झूम ॲप'सह विविध साधनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कसे मार्गदर्शन करावे, याबाबतचे प्रशिक्षण प्राध्यापकांना दिले जात आहे. तसेच, ऑनलाइन मार्गदर्शन करताना ॲनिमेशन किंवा शिक्षक शिक्षकांकडे असणारा कन्टेन्ट कसा पोहोचता येऊ शकतो, याचे मार्गदर्शन प्राध्यापकांना केले जात आहे. व्याख्यान कंटाळवाणे होणार नाही, याची काळजी घेऊन विद्यार्थ्यांनी सेल्फ लर्निंग कसे करावे? याचीही माहिती प्राध्यापकांना दिली जात आहे.



ऑनलाइन शिकवताना प्राध्यापकांचा पोशाख कसा असावा, कॅमेरा कसा हाताळावा, कॅमेरासमोर बसणाऱ्या प्राध्यापकांच्या मागे कोणते बॅकग्राऊंड असावे, अशा लहान लहान गोष्टींबाबत विद्यापीठातर्फे प्राध्यापकांना मार्गदर्शन केले जात आहे.

- डॉ. पराग काळकर,
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Main
Page No. 2 Jun 23, 2020
Powered by: erelego.com


# हंगामी प्राध्यापकांना विद्यापीठाकडून मुदतवाढ

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : करोना विषाणू संसगाने उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये महाविद्यालयात हंगामी प्राध्यापकांची भरती प्रक्रिया नव्याने राबवता येत नसल्याने सावित्रीबाई फु ले पुणे विद्यापीठाने कार्यरत हंगामी प्राध्यापकांनाच एक वर्ष मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे हंगामी प्राध्यापकांना दिलासा मिळाला आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी काही महाविद्यालयांना प्राध्यापकांच्या पदांना एका शैक्षणिक वर्षासाठी मान्यता देण्यात आली होती. मात्र करोनाच्या प्रादुर्भावामुळे नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे या पदांना मुदतवाढ देण्याची मागणी महाविद्यालयांकडून करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने खास बाब म्हणून हंगामी प्राध्यापकांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मान्यता घेतलेल्या, शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेल्या शिक्षकांनाच २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी नव्याने



दिलेले नियुक्ती आदेश, रुजू अहवाल आणि संस्थेच्या प्राध्यापक मान्यतेच्या मुदतवाढीच्या ठरावासह ३१ जुलैपर्यंत विद्यापीठाकडे पाठवणे आवश्यक आहे. तसेच ज्या पदांना विद्यापीठाची मान्यता शैक्षणिक वर्ष २०१९-२०साठी घेतलेली नाही, अशी पदे भरताना संस्था किं वा महाविद्यालयाने प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी विहित प्रक्रिया राबवणे बंधनकारक आहे. तसेच या प्राध्यापकनियुक्तीत काही कायदेशीर आणि आर्थिक समस्या उद्भवल्यास त्याला संस्था आणि महाविद्यालय जबाबदार असेल, असे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या कुलसचिवांनी स्पष्ट केले आहे.

**लोकसत्ता** Tue, 23 June 2020
https://epaper.loksatta.com/c/

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# ऑनलाइन अधिसभेवर बहिष्काराचे सावट

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेला सदस्यांकडून विरोध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन अधिसभेला सदस्यांकडून विरोध करण्यात येत आहे. ऑनलाइन अधिसभेच्या वैधतेविषयी प्रश्नचिन्ह अधिसभा सदस्यांनी उपस्थित केले असून, नेहमीच्या पद्धतीने अधिसभा न घेता ऑनलाइन पद्धतीने अधिसभा घेतल्यास त्यावर बहिष्कार घालण्याची काही अधिसभा सदस्यांनी भूमिका घेतली आहे.

करोना विषाणू संसर्गामुळे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा मार्चमध्ये होऊ शकली नाही. त्यामुळे कुलगुरूंच्या अधिकारात अर्थसंकल्पानुसार तीन महिने कामकाज करण्यात आले. मात्र, ही मुदत ३० जूनला संपत असल्याने २५ जूनला अर्थसंकल्पीय अधिसभा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, अधिसभा ऑनलाइन न घेता नेहमीच्या पद्धतीने घेण्याची मागणी आता जोर धरत आहे.

अधिसभा सदस्य डॉ. नंदू पवार म्हणाले, की अर्थसंकल्पाला मान्यता घेण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील आहे. पण विद्यापीठाशी संबंधित अन्य प्रश्नही महत्त्वाचे आहेत. ऑनलाइन अधिसभेत अर्थसंकल्प वगळता अन्य विषय बाजूला राहतील. तसेच ऑनलाइन बैठकीची तरतूद विद्यापीठ कायद्यात नसल्याने ऑनलाइन अधिसभेच्या वैधतेबाबतही प्रश्न आहे. तसेच अधिसभेची सूचना एकवीस दिवस आधी द्यावी लागते. त्यानुसार ही सूचना देण्यात आलेली नाही. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाला अधिसभेच्या कार्यप्रणालीचे उल्लंघन करता येणार नाही. विद्यापीठ लाखो विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यायला तयार आहे, पण थोडक्या सदस्यांची अधिसभा घेण्याची तयारी न दाखवणे योग्य नाही. ऑनलाइन अधिसभा घेतल्यास या बैठकीत सहभागी न होण्याचा निर्णय घ्यावा लागेल. नेहमीच्या पद्धतीने अधिसभा घेण्याबाबत राज्यपालांनाही निवेदन दिले आहे.

विद्यापीठाची अधिसभा नेहमीच्या पद्धतीनेच व्हायला हवी. अर्थसंकल्पाशिवाय अन्य महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी ऑनलाइन बैठकीत पुरेसा वेळ मिळणार नाही. मात्र विद्यापीठाने नेहमीच्या पद्धतीने अधिसभा न घेतल्यास अधिसभेवर बहिष्कार टाकण्याची भूमिका घ्यावी लागेल, असे अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी सांगितले.

### अंतिम वर्ष परीक्षेच्या मुद्द्यावर अधिसभेत चर्चेची मागणी

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा न देता त्यांना पदवी प्रमाणपत्र हवे असल्यास तसे त्यांच्याकडून लेखी स्वरूपात घेऊन विद्यापीठांनी योग्य ते सूत्र वापरून त्यांचा निकाल घोषित करण्याबाबतचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. हा मुद्दा व्यावसायिक आणि अव्यावसायिक अशा दोन्ही अभ्यासक्रमांना लागू आहे. मात्र या निर्णयामुळे विषय राहिलेल्या (बॅकलॉग) विद्यार्थ्यांना तांत्रिकदृष्ट्या पदवी देता येणार नाही. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या स्वायत्त परिषदांनी या निर्णयाला मान्यता न दिल्यास पदवीच्या वैधतेचा प्रश्न निर्माण होईल. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची पदव्युत्तर प्रवेशाची प्रवेश प्रक्रिया कशी राबवणार हाही प्रश्न आहे. तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशावरही परिणाम होणार आहे. अनेक अभ्यासक्रमांना पुरेसे विद्यार्थी मिळणार नाहीत. परिणामी शिक्षकांना कार्यभार राहणार नसल्याने त्यांच्या नोकरीवर गदा येण्याची शक्यता आहे. असे विविध मुद्दे उपस्थित करून अधिसभेमध्ये अंतिम वर्ष परीक्षांच्या विषयावर चर्चा करण्याची मागणी डॉ. शामकांत देशमुख, डॉ. संजय खरात, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, शशिकांत तिकोटे, तानाजी वाघ, डॉ. प्रवीण चौधरी, डॉ. सुनीता आढाव, डॉ. देविदास वायदंडे, गिरीश भवाळकर, बागेश्री मंठाळकर, डॉ. बाबा सांगळे यांनी केली आहे.

> “शासनाच्या निर्देशांनुसार जास्त व्यक्तींना एकत्र येता येणार नाही. तसेच राज्यपालांनीही ऑनलाइन अधिसभेला मान्यता दिलेली आहे. त्यानुसारच ही अधिसभा घेण्याचे नियोजन आहे. करोनाचा प्रादुर्भाव वाढत असताना जास्त लोकांनी एकत्र येणे योग्य नाही. तसेच प्रत्यक्ष अधिसभा घेतल्यास तीन जिल्ह्यांतून सदस्य येणार असल्याने त्यात जोखीम आहे. अर्थसंकल्पाशिवाय अन्य मुद्द्यांवर चर्चा होणे आवश्यक असले, तरी सध्याची परिस्थिती अनुकूल नाही. त्यामुळे २५ जूनच्या अधिसभेत अर्थसंकल्पाची मान्यता प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. परिस्थिती पूर्वपदावर आल्यावर अन्य विषयांवरील चर्चेसाठी पुन्हा स्वतंत्र अधिसभा घेता येईल.
>
> – डॉ. एन. एस. उमराणी, प्र कुलगुरू

लोकसत्ता Tue, 23 June 2020
https://epaper.loksatta.com/c/52929545

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# अकरावी प्रवेश प्रक्रिया व्यवस्थित राबवा : मुख्यमंत्री

मुंबई : दहावीच्या निकालानंतर अकरावी प्रवेश प्रक्रिया व्यवस्थित राबवा, प्रवेश सुरळीत होतील याकडे लक्ष द्या, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोमवारी दिले.

जिओ टीव्ही तसेच गुगल मीटद्वारे कशाप्रकारे ऑनलाईन वर्ग भरवता येतो त्याचे प्रात्यक्षिक त्यांनी पाहिले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. येत्या काही दिवसांत शिक्षक आमदार तसेच निवडक मुख्याध्यापक, शिक्षक यांना देखील हे सादरीकरण करून त्यांच्याकडून सुचना मागवाव्यात अशा सूचनाही शालेय शिक्षण विभागाला मुख्यमंत्र्यांनी दिल्या. व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून शालेय शिक्षण विभागाची बैठक त्यांनी घेतली. यावेळी शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड देखील उपस्थित होत्या. राज्यभरातून शिक्षण विभागातील अधिकारीही सहभागी झाले होते.

दहावीच्या निकालानंतर सुमारे दीड महिना अकरावीची प्रवेश प्रक्रिया चालेल. या वर्षापासून ऑनलाईन पोर्टलमध्येही आवश्यक ते बदल करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना ऑनलाईन शुल्क भरणे, डिजिटल पुस्तिका, मोबाईल ॲप अशा सुविधा देण्यात येत आहेत. १ जुलैपासून महाविद्यालयांचे नोंदणी सत्र सुरु होईल अशी माहिती यावेळी विभागाने दिली. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक या विभागांमध्ये ही प्रक्रिया ऑनलाईन चालणार असून इतरत्र व ग्रामीण भागात ऑफलाईन प्रक्रिया चालेल. राज्यभरात अकरावीची प्रवेश प्रक्रिया व्यवस्थित चालतील असे पाहण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

### बारावीचा निकाल १५ जुलैपर्यंत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण बोर्डाच्या अध्यक्षा शकुंतला काळे यांनी सांगितले की, आता निकाल लावण्यासाठी वेगाने प्रक्रिया सुरु आहे. जुलै १५ पर्यंत बारावीचा आणि जुलै अखेरीपर्यंत दहावीचा निकाल जाहीर केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

**Pudhari: 23.6.2020**

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

पुढारी

# अंतिम वर्ष परीक्षेचा वाद गाजणार

पुणे : विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा गुरुवारी होणार आहे. यामध्ये राज्य शासनाने अंतिम वर्षाच्या परीक्षा विद्यार्थ्यांना ऐच्छिक केल्यामुळे निर्माण झालेल्या संभ्रमावर सविस्तर चर्चा करण्याची मागणी तब्बल बारा अधिसभा सदस्यांनी केली असून, अधिसभा तहकुबीचा प्रस्ताव मांडणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अंतिम वर्ष परीक्षा निर्णयाचा वाद अधिसभेत गाजणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

राज्य शासनाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा न देता त्यांना पदवी प्रमाणपत्र हवे असल्यास तसे त्यांच्याकडून लेखी स्वरुपात घेऊन विद्यापीठांनी योग्य ते सूत्र वापरून त्यांचा निकाल घोषित करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थी, पालक यांच्यासहित प्राध्यापक देखील संभ्रमात आहेत.

अनेक अभ्यासक्रमांना पुरेसे विद्यार्थी मिळणार नाहीत. परिणामी शिक्षकांना कार्यभार राहणार नसल्याने त्यांच्या नोकरीवर गदा येण्याची शक्यता आहे. असे विविध मुद्दे उपस्थित करून अधिसभेमध्ये अंतिम वर्ष परीक्षांच्या विषयावर सविस्त चर्चा करावी. तसेच या विषयांवर सभेपुढे तहकुबीचा प्रस्ताव माडण्यात येणार असल्याचे पत्र डॉ. शामकांत देशमुख, डॉ. संजय खरात, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, शशिकांत तिकोटे, तानाजी वाघ, डॉ. प्रवीण चौधरी, डॉ. सुनीता आढाव, डॉ. देविदास वायदंडे, गिरीश भवाळकर, बागेश्री मंठाळकर, डॉ. बाबा सांगळे या तब्बल बारा अधिसभा सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना दिले आहे. त्यामुळे अंतिम वर्ष परीक्षा निर्णयाचा वाद अधिसभेत गाजण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### ऑनलाईन अधिसभेवर बहिष्काराचा इशारा...

*विद्यापीठाच्या ऑनलाईन अधिसभेला अधिसभा सदस्यांकडून विरोध करण्यात येत आहे. ऑनलाईन अधिसभेच्या वैधतेविषयी सदस्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, नेहमीच्या पद्धतीने अधिसभा न घेता ऑनलाईन पद्धतीने अधिसभा घेतल्यास त्यावर बहिष्कार घालण्याची काही अधिसभा सदस्यांनी भूमिका घेतली आहे.*

Pune Edition
23 Jun, 2020 Page No. 3
Powered by : erelego.com

# अंतिम वर्षाच्या परीक्षेचा मुद्दा गाजणार

**पुणे, ता. २३ :** राज्य सरकारने अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात घेतलेल्या निर्णयामुळे ४० टक्के विद्यार्थ्यांना कोणताही लाभ मिळणार नाही. तसेच निकालाबाबत स्पष्टता नसल्याने संभ्रम निर्माण होत आहे. यावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत चर्चा करण्यासाठी व विद्यापीठाकडून खुलासा घेण्यासाठी स्थगन प्रस्ताव मांडण्यात येणार असल्याने सभेत हा मुद्दा गाजणार आहे.

दरम्यान, यावर चर्चेसाठी अधिसभा सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना पत्र दिले. गुरुवारी (ता.२५ जून)



अधिसभा होणार आहे. राज्य सरकारने अंतिम वर्षाची परीक्षा विद्यार्थ्यांना ऐच्छिक केल्याने त्यांना परीक्षेला सामोरे जावे लागणार नाही. विद्यापीठ ठरवेल त्या सूत्राच्या आधारे निकाल जाहीर करून पदवी प्रमाणपत्र दिले जाईल. दोन पर्यायांमुळे अनेक विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राध्यापक हे संभ्रमात आहेत.मागील सर्व सत्रात उत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र हवे, असे त्यांच्याकडून लेखी घेतले जाणार आहे. व्यावसायिक, अव्यावसायिक अभ्यासक्रमांना हे लागू आहे. त्यामुळे मागील सत्रात जर एखाद्या विषयातही विद्यार्थी अनुत्तीर्ण असेल, तर त्यांना पदवी प्रमाणपत्र देता येणार नाही.

परीक्षा देण्याचा निर्णय घेणाऱ्या विद्यार्थ्यांची पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया विद्यापीठ कशाप्रकारे राबवणार? तसेच अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला सद्यःस्थितीत शिखर संस्था मान्यता देणार का? यासह अनेक प्रश्न अधिसभा सदस्यांनी उपस्थित केले आहेत.

**राज्य सरकारच्या आदेशामुळे नेमके काय करायचे ? हेच कळत नाही. या मुळे याचा परिणाम विद्यार्थी, पालक व संस्थांना भोगावा लागणार आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या अधिसभेत यावर सविस्तर चर्चा होणे गरजेचे आहे. यासाठी प्रस्ताव दिला आहे.**
**- डॉ. शामकांत देशमुख,** अधिसभा सदस्य

Sakaal: 24.6.2020

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# अकरावी प्रवेशासाठी यंदा 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' फेरी नाही

### विशेष फेऱ्यांसाठी आरक्षणही लागू राहणार नाही

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** अकरावीच्या नियमित फेऱ्यांनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील प्रवेश हे 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर केले जातात. मात्र, यंदा प्रवेश प्रक्रियेचा कालावधी कमी करण्यासाठी ही फेरी होणार नाही. नियमित फेऱ्यांनंतर होणाऱ्या विशेष फेऱ्यांसाठी आरक्षण लागू राहणार नाही.

मुंबई महानगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद येथे अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन होणार आहे. दरवर्षी गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांनी अर्जात दिलेले महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम यांनुसार नियमित प्रवेश फेऱ्या, त्यानंतर रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार प्रथम येणाऱ्यास प्राधान्य तत्वावरील फेऱ्या आणि यानंतरही राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रवेश फेऱ्या असे प्रवेश प्रक्रियेचे स्वरूप असते.

जूनमध्ये सुरू झालेली प्रवेश प्रक्रिया वाढणाऱ्या प्रवेश फेऱ्या, विद्यार्थ्यांच्या तक्रारी यांमुळे अगदी ऑक्टोबरपर्यंत लांबते. यंदा जुलैअखेरीस दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर पुढील दीड महिन्यात प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन शिक्षण विभागाने केले आहे. करोनाचा प्रादुर्भाव, लांबलेले शैक्षणिक वर्ष यांमुळे प्रवेश प्रक्रिया लवकर संपवणे आवश्यक आहे. त्यामुळे यंदा प्रथम येणाऱ्यास प्राधान्य तत्वावरील फेरीच गाळून टाकण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे. त्याचप्रमाणे नियमित फेऱ्या सुरू होण्यापूर्वी घेण्यात येणाऱ्या शून्य फेरीत द्विलक्षी अभ्यासक्रमाचे प्रवेश केले जाणार नाहीत.

### प्रवेश फेऱ्या कशा असतील

- द्विलक्षी अभ्यासक्रमाचे प्रवेश शून्य फेरीत न करता नियमित फेरीत करण्यात येतील.
- नियमित फेऱ्यांनंतर आवश्यकतेनुसार विशेष फेऱ्या.
- विशेष फेऱ्यांतील प्रवेश आरक्षणाऐवजी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार होतील.
- नियमित फेऱ्यांमध्ये पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश न घेतलेले विद्यार्थी विशेष फेरीमध्ये सहभागी होऊ शकतील.

### आरक्षणाच्या प्रमाणात बदल

सामाजिक, शैक्षणिक मागास प्रवर्गाकरता (एसईबीसी) गेल्यावर्षी १६ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या. मात्र, त्यानंतर आलेल्या सुधारित शासन निर्णयानुसार हे प्रमाण १२ टक्के करण्यात आले. त्यानुसार यंदा अकरावी प्रवेशासाठी एसईबीसी प्रवर्गासाठी १२ टक्के जागा राखीव असतील. अपंग विद्यार्थ्यांसाठी ३ टक्के जागा राखीव ठेवण्यात येत होत्या. हे प्रमाण आता ४ टक्के करण्यात आले आहे.

### सर्व प्रक्रिया ऑनलाईन



प्रवेश प्रक्रियेचे माहिती पुस्तक उपलब्ध करून देणे, अर्ज भरणे यांपासून ते प्रवेश शुल्क भरणे ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन होणार असून त्या अनुषंगाने प्रणालीत बदल करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना त्यांची कागदपत्रेही ऑनलाईन अर्जाला जोडता (अपलोड) येणार आहेत.

### महापालिकेच्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये कोटा

मुंबई महानगर आणि पुणे महापालिकेच्या कनिष्ठ महाविद्यालयांतील पन्नास टक्के जागा या महापालिकेच्या शाळेतून दहावी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी राखीव राहणार आहेत. स्थानिक परिस्थिती, विद्यार्थ्यांना होणारे लाभ, या मुद्द्यांची तपासणी करून संचालकांनी याबाबत निर्णय घ्यायचा आहे.

लोकसत्ता Wed, 24 June 2020 https://epaper.loksatta.com/c/52959938

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# आता निकालाचे सूत्र ठरवण्याचा तिढा

### सरकारच्या नव्या आदेशाने कुलगुरूंची तारांबळ

**देवेश गोंडाणे, लोकसत्ता**

**नागपूर :** अंतिम सत्र व वर्षातील विद्यार्थ्यांना गुण कसे द्यावेत, याचा निर्णय राज्यातील विद्यापीठांवर सोपवण्यात आला आहे. त्यासाठी, विद्यापीठांना मूल्यांकनाचे नवे निकष ठरवताना विद्वत परिषदेमधून तशा प्रस्तावावर मंजुरी मिळवणे बंधनकारक राहणार आहे.

मात्र, प्रत्येक विद्यापीठाने मूल्यांकनाचे वेगळे सूत्र ठरवल्यास नवा गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विविध विद्यापीठांच्या कुलगुरूंसमोरही पेच निर्माण झाला असून ते एकमेकांशी चर्चा करून राज्यस्तरावर निकालाचे एकसूत्र असावे यासाठी आपल्या स्तरावर प्रयत्न करीत असल्याची माहिती आहे.

युवा सेना वगळता अन्य विद्यार्थी संघटना व शैक्षणिक तज्ज्ञांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या सूचना धुडकावून लावत राज्य सरकारने विद्यापीठांच्या परीक्षा रद्द केल्या. लेखी निर्णयानुसार, ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा देण्याची इच्छा आहे त्यांच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. परंतु इतर विद्यार्थ्यांना कसे गुणदान करावे याचे सूत्र विद्यापीठांवर सोपवण्यात आले आहे. यामुळे प्रत्येक विद्यापीठाने आपापल्या निकषांनुसार मूल्यांकन केल्यास पुन्हा नवा पेच निर्माण होण्याचा धोका कुलगुरूंसमोर आहे. विद्यापीठ कायदा २०१६ नुसार, राज्यातील चौदा अकृषक विद्यापीठांची रचना असून कायद्याच्या चौकटीत राहून या विद्यापीठांचे प्राधिकरण, परीक्षा, मूल्यांकन, अभ्यासक्रम आदी गोष्टींची रचना करण्यात आली आहे. मात्र शासनाने स्वतः निकालाचे समान सूत्र न देता विद्यापीठांसमोर पुन्हा अडचण निर्माण केल्याने विद्यापीठ प्रशासनही गोंधळले आहे.

**अडचणी कोणत्या?**

- मूल्यांकनाचे सूत्र ठरवायचे असल्यास प्रत्येक विद्यापीठांना विद्वत परिषदेत तसा प्रस्ताव ठेवून चर्चा घडवून आणवी लागेल.
- प्रत्येक विद्यापीठाने मूल्यांकन करताना वेगळे निकष लावल्यास एका विद्यापीठातील विद्यार्थ्याला दुसऱ्या विद्यापीठात प्रवेश घेताना अडचणी येण्याची शक्यता.
- दीक्षांत सोहळ्यात पदवी देताना राज्यपालांची परवानगी हवी असते. आता प्रत्येक विद्यापीठांचे मूल्यांकन भिन्न असल्यास राज्यपाल अशा पदव्यांना परवानगी देणार का, हा प्रश्न.




**एकसमान सूत्राचा आग्रह**

राज्यातील सर्व विद्यापीठांसाठी मूल्यांकनाचे एकसमान सूत्र असावे, अशी भूमिका विदर्भ, मराठवाड्यासह अन्य भागांतील बहुतांश विद्यापीठांच्या कुलगुरूंनी 'लोकसत्ता'कडे नाव न छापण्याच्या अटीवर व्यक्त केली आहे. प्रत्येक विद्यापीठाने मूल्यांकनाचे आपापले निकष ठरवल्यास विद्यार्थ्यांसमोर अडचणी वाढणार आहेत. त्यामुळे आता एकमेकांशी संपर्क साधत सर्व विद्यापीठांनी एकसमान सूत्र ठरवावे यासाठी आम्ही प्रयत्न करीत असल्याचेही कुलगुरूंनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 24 June 2020
https://epaper.loksatta.com/c/52963120

पुढारी

# अकरावीची बायफोकलसह 'एफसीएफएस' फेरी झाली रद्द

### प्रवेश प्रक्रियेत बदल; दिव्यांग विद्यार्थ्यांचे आरक्षण वाढले

**मुंबई :** दरवर्षी अकरावी प्रवेश रेंगाळत ठेवणारी 'प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य' (FCFS) फेरी यंदाच्या प्रवेशात रद्द केली असून, शून्य फेरीच्या माध्यमातून होणारे द्विलक्षी अभ्यासक्रमा (बायफोकल) चे प्रवेशही नियमित फेरीत होणार आहेत. त्याचबरोबर अपंग विद्यार्थ्यांना दिलासा देत आरक्षण एक टक्क्याने वाढवले आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोमवारी आढावा घेतल्यानंतर शालेय शिक्षण विभागाने अकरावी ऑनलाईन प्रवेशाच्या बदलाचा शासन निर्णय जारी केला आहे. यंदा प्रवेशात 'एफसीएफएस' फेरीबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या फेरीबाबत अकरावी प्रवेश दोन महिने रेंगाळत राहतात तसेच पालक आणि विद्यार्थ्यांची वेळखाऊ आणि किचकट असणारी ही प्रक्रिया रद्द करावी, अशी मागणी विद्यार्थी संघटनांनी सातत्याने केली होती.

'एफसीएफएस' ही फेरी रद्द करत त्याऐवजी आवश्यकतेनुसार अतिरिक्त विशेष फेरी राबविली जाणार आहे. या फेरीत मात्र सर्व रिक्त जागा या सर्वसाधारण जागांमध्ये रूपांतरित करण्यात येतील व आरक्षणाऐवजी विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्ता यादीतील गुणांवर आधारित प्रवेश देण्यात येतील, असेही शासन निर्णयात स्पष्ट केले आहे. सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता (एसईबीसी) असलेल्या आरक्षणामध्ये गतवर्षीप्रमाणे यंदाही १६ टक्क्यांऐवजी १२ टक्के असा बदल करण्यात येत आहे. अपंग/ दिव्यांगांसाठी असलेले आरक्षण ३ टक्क्यांवरून ४ टक्के करण्यात आले आहे.

**अपंग विद्यार्थ्यांचे आरक्षण वाढले**

अपंग / दिव्यांगांसाठी असलेले आरक्षण ३ टक्क्यांवरून ४ टक्के करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त संविधानिक आरक्षण, अल्पसंख्याकांसाठी राखीव कोटा व व्यवस्थापन कोटा आदी राखीव जागांचे प्रवेश हे प्रचलित धोरणानुसार होणार आहेत.

Pune Edition
24 Jun, 2020 Page No. 2
Powered by : erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# यंदा अकरावी प्रवेशात बदल

**प्रवेश प्रक्रिया लांबणार नाही**

**प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरी रद्द**

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी) – कोरोनामुळे यंदा दहावीचा निकाल उशिराने जाहीर होणार आहे. त्यामुळे अकरावी प्रवेश प्रक्रियेतही बदल करण्यात आला आहे. यंदा प्रवेशप्रक्रिया लांबणार नसून दरवर्षी आयोजित होणारी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरी रद्द करण्यात आली आहे.

अकरावीच्या नियमित फेऱ्या पार पडल्यानंतही महाविद्यालयात जागा शिल्लक राहिल्यास प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य ही फेरी राबविण्यात येत होती. मात्र यंदा कमी कालावधीत प्रवेश प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने ही फेरी रद्द करण्यात आली आहे. गरज भासल्यास विशेष फेऱ्यांचे आयोजन करण्यात येईल तसेच या फेऱ्यांना आरक्षण लागू नसेल असे मंगळवारी प्रसिद्ध झालेल्या जीआरमध्ये म्हटले आहे.

मुंबईसह पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, अमरावती, नाशिक, संभाजीनगर येथे अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन होते. जूनमध्ये सुरू झालेले प्रवेश वाढणाऱ्या प्रवेश फेऱ्या, विद्यार्थ्यांच्या तक्रारी यामुळे अगदी ऑक्टोबरपर्यंत लांबते. यंदा जुलैअखेरीस दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर पुढील दीड महिन्यात प्रवेश प्रक्रिय पूर्ण करण्याचे नियोजन शिक्षण विभागाने केले आहे. करोनाचा प्रादुर्भाव, लांबलेले शैक्षणिक वर्ष यामुळे प्रवेश प्रक्रिया लवकर संपवणे आवश्यक आहे. यंदा सर्व प्रक्रिया ऑनलाइन करण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेचे माहिती पुस्तक उपलब्ध करून देणे, अर्ज भरणे यांपासून ते प्रवेश शुल्क भरणे ही सर्व प्रक्रिया ऑनलाइन होणार असून त्या अनुषंगाने बदल करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना कागदपत्रेही अर्जात अपलोड करता येणार आहेत.



- सामाजिक, शैक्षणिक मागास प्रवर्गाकरता (एसईबीसी) यंदा १२ टक्के जागा राखीव
- अपंग विद्यार्थ्यांसाठी चार टक्के जागा राखीव

**पालिकेच्या विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के जागा**

मुंबई आणि पुणे महापालिकेच्या ज्युनिअर महाविद्यालयांतील पन्नास टक्के जागा या पालिकेच्या शाळेतून दहावी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी राखीव राहणार आहेत. स्थानिक परिस्थिती, विद्यार्थ्यांना होणारे लाभ या मुद्द्यांची तपासणी करून संचालकांनी याबाबत निर्णय घ्यायचा आहे.

**प्रवेश फेऱ्यांचे स्वरूप**

- द्विलक्षी अभ्यासक्रमाचे प्रवेश शून्य फेरीत न करता नियमित फेरीत करण्यात येतील
- नियमित फेऱ्यांनंतर आवश्यकतेनुसार विशेष प्रवेश फेऱ्या होतील.
- विशेष फेऱ्यांतील प्रवेश आरक्षणाऐवजी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार होतील.
- नियमित फेऱ्यांमध्ये पहिल्या पसंतीक्रमाचे कॉलेज मिळूनही प्रवेश न घेतलेले विद्यार्थी विशेष फेरीमध्ये सहभागी होऊ शकतील

Samana: 25.6.2020

# अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करा

**यूजीसीच्या विशेष समितीची शिफारस**

## मागील सत्रांच्या गुणांवरून निकाल लावा

नवी दिल्ली, दि. २४ (वृत्तसंस्था) – देशातील उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याची शिफारस विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) समितीने केली आहे. या विद्यार्थ्यांचे अंतिम वर्षाचे निकाल त्यांच्या मागील सत्रांतील परीक्षांच्या गुणांवरून लावण्यात यावेत असेही समितीने सांगितले आहे. हा महाराष्ट्र सरकारचा विजय असून महाराष्ट्र सरकारने चार दिवसांपूर्वीच अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा निणर्य घेऊन लाखो विद्यार्थ्यांनादिलासा दिला होता.

कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा घेतल्या गेल्या तर देशातील लाखो विद्यार्थ्यांना संसर्गाची शक्यता होती. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांमधील अंतिम परीक्षेसह अनेक परीक्षा प्रलंबित राहिल्या. त्याबाबत निणर्य घेण्यासाठी यूजीसीने ही समिती स्थापन केली होती. हरियाणा विद्यापीठाचे कुलगुरू आर. सी. कुहाड हे या समितीचे अध्यक्ष होते.

**परीक्षेस इच्छुक विद्यार्थ्यांना कोरोना संपेपर्यंत थांबावे लागणार**

मागील सत्रांच्या परीक्षांमधील गुणांवरून अंतिम परीक्षेचा निकाल लावण्याबद्दल विद्यार्थ्यांना आक्षेप असेल तर त्यांच्या परीक्षा कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर घेण्यात येतील असेही समितीने सांगितले आहे. समितीच्या शिफारशीवरून यूजीसीकडून लवकरच विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांसाठी सूचना दिल्या जाणार आहेत.

**ऑक्टोबरपासून महाविद्यालये सुरू करा**

नवे शैक्षणिक वर्ष सुरू करण्याबाबतही या समितीने काही शिफारशी केल्या आहेत. जुन्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सत्र जुलैमध्ये तर नव्या विद्यार्थ्यांसाठी ऑगस्टमध्ये सुरू करण्यात येणार होते. ते ऑक्टोबरपासून सुरू करण्यात यावे अशी शिफारस समितीने केली आहे.

Samana: 25.6.2020

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

लोकमत

# 'अभियांत्रिकी'चे प्रवेश घटण्याची शक्यता

## तज्ज्ञांचे मत : मॅनेजमेंटच्या प्रवेशावर त्याचा फारसा परिणाम झालेला दिसणार नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : महाराष्ट्रातील नामांकित मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमध्ये परराज्यातील विद्यार्थी केवळ शिक्षण घेण्यासाठी येत नाहीत, तर शिक्षण घेऊन महाराष्ट्रात स्थायिक होण्याच्या दृष्टिकोनातून येत असतात. त्यामुळे कोरोनाचे संकट असले, तरी मॅनेजमेंटच्या प्रवेशावर त्याचा फारसा परिणाम झालेला दिसणार नाही. परंतु, अभियांत्रिकी प्रवेशावर त्याचा परिणाम दिसण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

मॅनेजमेंट अभ्यासक्रमाच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के इन्स्टिट्यूट कोट्याअंतर्गत आणि १५ टक्के ऑल इंडिया कोट्याअंतर्गत असे तीस टक्के परराज्यातील विद्यार्थी महाराष्ट्रात शिक्षणासाठी येतात. त्यातही पुण्यात ७ ते ८ हजार, तर मुंबईमध्ये १० हजारापेक्षा जास्त विद्यार्थी दर वर्षी मॅनेजमेंटचे शिक्षण घेतात.

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात रोजगाराच्या संधी तुलनेने अधिक आहेत. त्यामुळे मॅनेजमेंटची पदवी घेऊन पुणे-मुंबईसारख्या शहरांमध्ये स्थायिक होण्याच्या दृष्टिकोनातूनच अनेक विद्यार्थी महाराष्ट्रातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतात. तसेच पदवीवर आणि बायोडाटावर महाराष्ट्रातील पत्ता असेल तरच राज्यातील अनेक कंपन्या विद्यार्थ्यांना नोकरीसाठी बोलवतात. त्यामुळे कोरोनामुळे मॅनेजमेंटच्या प्रवेश प्रक्रियेवर फारसा परिणाम होणार नाही, असे तज्ज्ञांना वाटते.

गेल्या पाच ते सहा वर्षांपासून प्रत्येक राज्यात अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या वाढत गेली आहे. परिणामी परराज्यातून महाराष्ट्रात अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. येत्या काळात ही संख्या अधिकच कमी झाल्याचे दिसेल. कोरोनामुळे निर्माण झालेल्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर केवळ सीओईपी सारख्या नामांकित कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला तरच परराज्यातील विद्यार्थी पुण्यात येतील.



"परराज्यातील विद्यार्थी महाराष्ट्रात पदवीचे शिक्षण घेऊन आपल्या राज्यात परत जाण्यासाठी येत नाहीत. तर नामांकित कंपन्यांमध्ये रोजगार मिळवून स्थायिक होण्याच्या दृष्टिकोनातून येतात. पुण्यातील सिंबायोसिस, पुम्बा, एमआयटी, सिंहगड सारख्या प्लेसमेंटची चांगली संधी असणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये हे विद्यार्थी प्रवेश घेतात. काही विद्यार्थी कोरोनाच्या संकटामुळे यंदा प्रवेश न घेता पुढील वर्षी प्रवेश घेतील. मॅनेजमेंट प्रवेश शुल्क जास्त असल्याने केवळ पदवी मिळवण्यासाठी परराज्यातील विद्यार्थी महाराष्ट्रात येणार नाहीत. त्यामुळे यंदा प्रवेशावर १0 ते १५ टक्के परिणाम झालेला दिसेल.

**- डॉ. पराग काळकर**, अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

"गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश या सारख्या राज्यांमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या वाढली आहे. त्यामुळे गेल्या पाच-सहा वर्षांपासून या राज्यातून महाराष्ट्रात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. गेल्या वर्षी परराज्यातून महाराष्ट्रात अभियांत्रिकी शिक्षणासाठी आलेले विद्यार्थी हजारच्या घरातच असतील. कोरोनामुळे केवळ राज्यातीलच नाही तर नाशिक, धुळे,जळगावसह मराठवाड्यातील अनेक विद्यार्थी पुणे-मुंबई सारख्या शहरांमध्ये अभियांत्रिकीचे शिक्षण घेण्याचे टाळतील.

**- डॉ. गजानन खराटे**, माजी अधिष्ठाता, अभियांत्रिकी विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Main
Page No. 2 Jun 25, 2020
Powered by: erelego.com





Image Courtesy: *http://www.notable-quotes.com/e/education_quotes.html*

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

लोकमत

### 'ऑनलाइन'साठी महाविद्यालयांना सक्षम करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांना यापुढील काळात ऑनलाइन शिक्षण द्यावे लागणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयांना ऑनलाइन शिक्षणासाठी अधिक सक्षम करण्यावर भर देणे गरजेचे आहे. त्यासाठी विद्यापीठाने गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत ऑनलाइन शिक्षणासाठी आवश्यक तांत्रिक बाबी महाविद्यालयांना उपलब्ध करुन द्याव्यात, अशी मागणी केली आहे.

विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे, विद्यार्थ्यांची व प्राध्यापकांचे सक्षमीकरण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात यासाठी १७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

विद्यापीठाने तयार केलेल्या नियम व अटींची पूर्तता करणाऱ्या महाविद्यालयांनाच या योजनेअंतर्गत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, कार्यशाळा, सोलर सिस्टिम आदी साहित्य खरेदीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला जातो. परंतु, कोरोनामुळे एकूणच बदललेल्या परिस्थितीत सर्व महाविद्यालयांना ऑनलाइन शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी निधी द्यावा, अशी मागणी आहे.

डिजिटल शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यावर भर दिला जात आहे. परंतु, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांमधील संबंधित विषय तज्ज्ञ प्राध्यापकांच्या सहकार्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्हर्च्युअल क्लासरुमच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याबाबत विद्यापीठाने विचार करायला हवा. त्यासाठी विद्यापीठाने गुणवत्ता सुधार योजनेसाठीचा निधी १७ कोटीवरुन २५ कोटींपर्यंत आधिसभेमध्ये सादर केल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पात मंजूर करून घ्यावा.

> विद्यापीठाने महाविद्यालयांमधील चांगल्या प्राध्यापकांच्या मदतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सॅटेलाइटच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यासाठी 'ए-प्लस' दर्जा असणाऱ्या महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची निवड करावी.
>
> **- एस. के. जैन**, नियामक मंडळ अध्यक्ष, शि.प्र.मंडळी.

> महाविद्यालयांना ऑनलाइन मार्गदर्शनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी विद्यापीठाने अर्थसंकल्पात २५ कोटींपर्यंत वाढ करावी. गुणवत्ता सुधार योजनेचे नियम शिथिल करावेत.
>
> **- डॉ. संजय खरात**, अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> ऑनलाइन शिक्षणासाठी आवश्यक सुविधा काही महाविद्यालयांकडे उपलब्ध आहे. परंतु, ज्या महाविद्यालयांकडे कोणत्याच सुविधा उपलब्ध नाहीत त्यांना विद्यापीठाने तत्काळ मदत करणे गरजेचे आहे.
>
> **- डॉ. रवींद्रसिंह परदेशी**, प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय

Hello Pune
Page No. 1 Jun 25, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

### आज होणार सभा : अजेंडा व अर्थसंकल्पाची प्रतच मिळाली नसल्याची तक्रार

## ऑनलाइन अधिसभेवर सिनेट सदस्य नाराज

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक उद्या (गुरुवारी) ऑनलाइन पद्धतीने घेतली जाणार आहे. मात्र, कनेक्टिव्हिटीमध्ये अडचण येत असल्यामुळे अनेक अधिसभा सदस्य नाराज आहेत. त्यातच काही अधिसभा सदस्य आम्हाला अधिसभेचा अजेंडा व अर्थसंकल्पाची प्रतच मिळाली नाही, असे सांगत आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकललेल्या आधिसभेची बैठक येत्या गुरुवारी ऑनलाइन पद्धतीने घेतली जाणार असल्याचे विद्यापीठातर्फे जाहीर केले आहे. तसेच, सर्व सदस्यांना या बाबतची कल्पनाही देण्यात आली आहे. विद्यापीठातर्फे 'वेबेक्स' या ॲपवर अधिसभेची बैठक घेतली जाणार आहे. गुरुवारी होणाऱ्या आधिसभेच्या बैठकीचे ऑनलाईन टेस्टिंग बुधवारी घेण्यात आले. त्यात अनेक सदस्यांना कनेक्टिव्हिटीमध्ये अडचणी जाणवल्या. तर काहींना आवाज येत नसल्याचे दिसून आले. ऑनलाईन मीटिंग घेण्यापूर्वी कमीत कमी आठ दिवस आधी टेस्टिंग घेणे गरजेचे होते, असे काही सदस्यांकडन सांगितले जात आहे.



> कोरोनाचा प्रादुर्भाव आणि लॉकडाऊनच्या कालखंडात शासनाच्या प्रतिबंधित आदेशाचे पालन करुन ऑनलाइन पद्धतीने बैठक घेण्याशिवाय पर्याय उपलब्ध नव्हता. तसेच ऑनलाइन पद्धतीने बैठक घेण्याचे आदेश कुलपती कार्यालयाकडून प्राप्त झाले आहेत. त्यानुसार गुरुवारी ऑनलाइन पद्धतीने मार्च महिन्यात पुढे ढकलण्यात आलेली अधिसभेची बैठक घेतली जाणार आहे.
>
> **- डॉ. प्रफुल्ल पवार**, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> अधिसभेची ऑनलाइन बैठक घेण्यासाठी बुधवारी झालेल्या टेस्टिंगमध्ये कनेक्टिव्हिटीची अडचण येत असल्याचे दिसून आले. अधिसभेमध्ये अर्थसंकल्प मंजूर केला जाणार आहे. अधिसभा सदस्यांच्या सहमतीशिवाय अर्थसंकल्प मंजूर करणे योग्य नाही. त्यामुळे ज्या सदस्यांना बैठकीला उपस्थित राहणे शक्य आहे. त्यांना विद्यापीठाने प्रत्यक्ष बैठकीसाठी बोलवावे, अशी अनेक अधिसभा सदस्यांची भूमिका आहे.
>
> **- राजेंद्र विखे पाटील**, अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Hello Pune
Page No. 4 Jun 25, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

# देशभर परीक्षा रद्द?

## विद्यापीठ अनुदान आयोगाची चाचपणी; नवे शैक्षणिक वर्ष ऑक्टोबरपासून सुरू करण्याचा प्रस्ताव

लोकसत्ता प्रतिनिधी


**मुंबई :** राज्यातील अंतिम वर्षाच्या परीक्षा शासनाने ऐच्छिक केल्या असताना आता विद्यापीठ अनुदान आयोग अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याबाबत चाचपणी करत आहे. त्याचप्रमाणे नवे शैक्षणिक वर्ष ऑगस्टऐवजी ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलण्याचाही प्रस्ताव आयोगासमोर आहे. याबाबत लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशी डावलून राज्यातील अंतिम वर्षाच्या परीक्षा ऐच्छिक करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्याला राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आक्षेप घेतल्यानंतर या निर्णयावरून वादंग निर्माण झाला. मात्र, आता अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विचाराधीन आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने परीक्षा आणि नव्या शैक्षणिक वर्षाबाबत निर्णय घेण्यासाठी समिती नेमली आहे. समितीच्या शिफारशीनुसार आयोगाने मे महिन्यात परीक्षा आणि *(पान २ वर)*

### समितीची शिफारस...

आयोगाने नेमलेल्या समितीने अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करून आधीच्या वर्षातील कामगिरी आणि अंतर्गत गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याची शिफारस केल्याचे समजते आहे. ज्या विद्यार्थ्यांना सरासरी मूल्यांकनानुसार देण्यात आलेले गुण मान्य नसतील त्यांच्यासाठी परिस्थिती निवळल्यावर परीक्षा घेण्यात यावी, असेही या समितीने सांगितले आहे.



### शैक्षणिक वर्ष आणखी पुढे...

देशभरात एकच सूत्र लागू करण्याबरोबरच नवे शैक्षणिक वर्षही उशिरा सुरू करण्याचाही प्रस्ताव आयोगासमोर आहे. यापूर्वी आयोगाने जाहीर केलेल्या आराखड्यात प्रथम वर्ष वगळता इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष ऑगस्टमध्ये, तर नव्याने प्रवेश घेणाऱ्या म्हणजे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सप्टेंबरमध्ये सुरू करण्याची शिफारस केली होती. आता शैक्षणिक वर्ष ऑक्टोबरमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.

### 'आयसीएसई'बाबत आज निर्णय...

मुंबई : करोनाबाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर आयसीएसईच्या दहावी-बारावीच्या परीक्षा घेण्यास परवानगी दिली जाऊ शकत नाही, अशी भूमिका राज्य सरकारने बुधवारी उच्च न्यायालयात स्पष्ट केली. तर सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी या प्रकरणी सुनावणी होणार असून त्यावेळीच परीक्षा घ्यायच्या की नाहीत याबाबतचे चित्र स्पष्ट होईल, असे केंद्र सरकारतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

लोकसत्ता Thu, 25 June 2020
https://epaper.loksatta.com/c/52989261

# देशभर परीक्षा रद्द?

*(पान १ वरून)* नव्या शैक्षणिक वर्षाबाबत आराखडा जाहीर केला. अंतिम वर्ष वगळता इतर वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याची सूचना त्यामध्ये केली होती. तर अंतिम वर्षाच्या परीक्षा जुलैमध्ये घेण्याची सूचना विद्यापीठांना दिली होती.

मात्र, सध्याचा परिस्थितीत जुलैमध्ये परीक्षा घेणे शक्य नसल्याचे सांगून पुढील सूचनांची विचारणा आयोगाकडे केली. या पार्श्वभूमीवर आता आयोग यापूर्वी जाहीर केलेल्या आराखड्यामध्ये बदल करण्याची शक्यता आहे.

सर्व देशासाठी परीक्षांचे एकच सूत्र असावे, अशी मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत केली होती. 'परीक्षा आणि नव्या शैक्षणिक वर्षाबाबत यापूर्वी दिलेल्या सूचनांचा फेरविचार करण्यात यावा. त्याचप्रमाणे विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे आरोग्य, सुरक्षा यांचा विचार करून नवा आराखडा तयार करण्यात यावा, अशा सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाला दिल्या आहेत,' अशा आशयाचे ट्वीट मनुष्यबळ विकासमंत्री रमेश पोखरियाल यांनी केले आहे.

> समान सूत्र, नवे शैक्षणिक वर्ष आणि परीक्षांच्या आराखड्याबाबत आलेले प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विचाराधीन आहेत. त्याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही.
>
> – डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग

लोकसत्ता Thu, 25 June 2020
https://epaper.loksatta.com/c/52989304

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

### ऑनलाइन अधिसभेतून सभात्याग ?

**पुणे :** सावित्रीबाई फु ले पुणे विद्यापीठाची पहिली ऑनलाइन अधिसभा आज (२५ जून) होणार आहे. मात्र, ऑनलाइन अधिसभेत अर्थसंकल्पाशिवाय अन्य महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चेसाठी वेळ मिळणार नसल्याने सदस्यांकडून सभात्याग करण्याची भूमिका घेण्यात आली आहे.

करोना संसर्गामुळे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा मार्चमध्ये होऊ शकली नाही. विद्यापीठ कायद्यानुसार अर्थसंकल्पाला अधिसभेची मान्यता आवश्यक असल्याने राज्यपालांची मान्यता घेऊन नियोजनही करण्यात आले.

अधिसभा सदस्य संतोष ढोरे म्हणाले, की मान्यता देण्याबरोबर सूचना, दुरुस्त्यासह विद्यार्थ्यांशी, शिक्षणाशी संबंधित अन्य मुद्देही महत्त्वाचे आहेत. सध्या अंतिम वर्ष परीक्षांच्या मुद्द्याच्या संदर्भात निर्माण होणारे प्रश्न चर्चिले जाण्याची गरज आहे. मात्र, ऑनलाइन अधिसभा दिवसभर चालवणे शक्य नाही. त्यामुळे चर्चेसाठी वेळ मिळणार नसल्याने आम्ही काही सदस्य सभात्याग करण्याच्या तयारीत आहोत.

**अर्थसंकल्पांचे फलित काय ?**

विद्यापीठाच्या या पूर्वीच्या अर्थसंकल्पीय अधिसभांमध्ये अर्थसंकल्पांच्या तरतुदींतून काय साध्य झाले, याचा अहवाल सादर करण्याबाबतही चर्चा करण्यात आली होती. मात्र, त्याबाबत अद्याप कार्यवाही झाली नाही. त्यामुळे आतापर्यंतच्या अर्थसंकल्पांचे फलित काय, त्याचा अहवाल कधी सादर करणार असा प्रश्नही अधिसभा सदस्यांकडून उपस्थित करण्यात आला आहे.

लोकसत्ता Thu, http:

### Final year exams: SPPU to set up panel to decide evaluation pattern

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, JUNE 25

THE ISSUE of evaluation for final-year students dominated the discussion of the Senate meeting at Savitribai Phule Pune University (SPPU), which took place online on Thursday. After the state government announced cancellation of final-year examination, leading to confusion among students, it was announced by Vice-Chancellor Dr Nitin Karmalkar that an independent committee is being set up to decide the evaluation pattern.

The committee, including experts from the field of education, administrative officers, and professors, will deliberate over the evaluation pattern, admissions for next academic year, and other issues.

Owing to the pandemic, the budget session of the Senate meeting, pending since March, was conducted online for the first time. Even though the state government had announced the cancellation of final-year exams, Senate members said there was no clarity over the issue and confusion persisted over students' backlog exams as well.

Since the examination issue is important, Senate member Shamkant Deshmukh proposed the adjournment motion, for which he received the support of several members.

Responding to it, Karmalkar said the university was in the process of declaring results for first and second year students while for final year, there was confusion among students, parents, and professors. Since there is an option for students to opt for written exams, there is need for clarity over how to conduct these "at will" examinations, the nature of the exam and evaluation, and admissions for next year. For this, an expert committee is being constituted, Karmalkar added.


Meanwhile, the budget for 2020-2021 was tabled and approved at the "first-ever" online Senate budget meeting. Management council member Rajesh Pande presented a budget with deficit of Rs 61.24 crore, in which the university's income of Rs 506.76 crore against an expenditure of Rs 656.38 crore was presented. In view of the Covid-19 pandemic, budgetary provisions had to be adjusted.

The Senate meeting was overshadowed by arguments over the decision of the state government to cancel final-year exams. Arguments over politicising the issue of examinations and criticism over bringing the subject into the Senate meeting derailed discussions for a while.

Senate members also expressed anger over improper provisions for conducting online meeting and some members exited in protest. The meeting was also marred by technical glitches as many members were unable to speak or view, while other problems included connectivity errors.

Also, the online meeting saw a drop in attendance with barely 30 to 40 members present. Senate members, however, appreciated the performance of the SPPU team at Khelo India University Games and suggested that the budgetary expenditure on sports and facilities should be increased. Another prominent budgetary provision includes new student scholarships worth Rs 10 crore.

**Indian Express: 26.6.2020**



# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

पुणे शहर

## पाच नव्या शिष्यवृत्तींसाठी ९ कोटींची तरतूद

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ६५६ कोटींचा अर्थसंकल्प; कोरोनाच्या दृष्टीने निधी देणार

**पुणे, ता. २५ :** 'कोरोना'च्या संकटामुळे शैक्षणिक क्षेत्रात अनिश्चिततेचे वातावरण असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उत्पन्न व खर्चाचे गणित बिघडणार आहे. याच सावटाखाली ऑनलाइन अधिसभेत २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा ६१ कोटींची तूट असलेला ६५६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मंजूर केला.



नव्या शिष्यवृत्तींसाठी ९ कोटी ची तरतूद करण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर ा अध्यक्षतेखाली गुरुवारी (ता. २५) सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या अधिसभेत व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांनी अर्थसंकल्प सादर केला. सदस्यांनी चर्चा करून मान्यता दिली. विद्यार्थ्यांसाठी खास शिष्यवृत्ती योजनेचा समावेश केला आहे. विशेष उपक्रमात पदव्युत्तर विद्यार्थी आदान-प्रदानच्या सेतू कार्यक्रमासाठी २५ लाख, ऐतिहासिक स्थळ दत्तक योजनेसाठी दहा लाख, युवक-युवती उन्नयनीकरण तारुण्यभान उपक्रमासाठी ५० लाख, काश्मीर-लेह-लडाख शैक्षणिक प्रकल्पासाठी दहा लाखांची तरतूद केली.

**नव्या शिष्यवृत्ती योजना**

पाच नव्या शिष्यवृत्ती योजना सुरू केल्या आहेत. ९ कोटींची तरतूद आहे. त्यातून १५ हजार जणांना लाभ मिळेल. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अर्थसाह्य योजनेसाठी १ कोटीची तरतूद असून, १ हजार ९५५ विद्यार्थ्यांना लाभ मिळेल. अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी १ कोटीची तरतूद असून, २ हजार ८२२ जणांना लाभ मिळेल. तर, राजर्षी शाहू महाराज व महात्मा जोतिबा फुले योजनेसाठी प्रत्येकी २ कोटींची तरतूद आहे. यात प्रत्येकी दोन हजार लाभार्थी असतील. या ८ हजार ७७७ विद्यार्थ्यांपैकी पदवीचे पाच हजार ७३९, तर पदव्युत्तर पदवीचे तीन हजार ३८ विद्यार्थी लाभ घेतील. तसेच, स्वामी विवेकानंद शिष्यवृत्ती योजनेसाठी तीन कोटी १५ लाखांची तरतूद असून, सुमारे सात हजार जणांना लाभ मिळेल.

**६१ कोटींची तूट**

विद्यापीठाचे उत्पन्न कमी आणि खर्च जास्त झाल्याने ६१ कोटींची तूट निर्माण झाली. २०२०-२१ मध्ये खर्च ६५६ कोटी आहे. तर, उत्पन्न ५९५ कोटी असणार आहे.

**खर्चविषयक तरतुदी**

| | | |
|---|---|---|
| इमारती बांधकामासाठी २६ कोटी ३६ लाख | विद्यापीठ सुविधा-सुधारणांसाठी ४ कोटी १६ लाख | विद्यार्थ्यांच्या उपक्रमांसाठी २१ कोटी ८७ लाख |
| गुणवत्ता सुधार कार्यक्रम १३ कोटी २० लाख | समर्थ भारत अभियान १ कोटी ५० लाख | आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण २ कोटी |

हा अर्थसंकल्प कोरोनाच्या पूर्वी तयार केला. त्यात इ करव्या लागणार आहेत. कोरोनामुळे ऑनलाइन शि लागणार आहे. पुरवणी अर्थसंकल्पात त्यादृष्टीने तरतूद केली

– डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे तुटीचे अंदाजपत्रक

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा आर्थिक वर्ष २०२०–२१ चा वार्षिक अंदाजपत्रक गुरुवारी सादर करण्यात आले. अधिसभेचे व्यवस्थापन परिषदचे सदस्य राजेश पांडे यांनी सादर केले. अधिसभेत ६५६ कोटी ३८ लाख ४५ हजार रुपयांच्या अंदाज पत्रकाला मान्यता देण्यात आली. या अंदाजपत्रकात ६१ कोटी २४ लाख ४० हजार रुपयांची तूट आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना करण्यासाठी ऑक्टोबर महिन्यात पुन्हा एकदा पुरवणी मागण्यांसह अंदाजपत्रकात सविस्तर चर्चा होणार आहे. कोरोनानंतर परिस्थिती बदलल्याने अंदाजपत्रक पुन्हा मांडण्याची मागणी सिनेट सदस्यांनी केली होती.

यावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार उपस्थित होते. विद्यापीठाचा अंदाजपत्रक मार्च महिन्यापूर्वी तयार करण्यात आल्याने, त्यामध्ये कोरोना विषाणूला रोखण्यासाठी; तसेच नव्या उपाययोजना आखण्यासाठी कोणतीही ठोस तरतूद नाही. त्यामुळे विद्यापीठाचा खर्च भागवण्यासाठी अर्थसंकल्पाला तात्पुरत्या स्वरुपात मान्यता देऊन, ऑक्टोबर महिन्यात पुन्हा सिनेट घेण्याचा आग्रह सदस्यांनी मांडला. मात्र, विद्यापीठ कायद्यानुसार अशा पद्धतीने पुन्हा अंदाजपत्रक मांडता येणार नसल्याचे पांडे यांनी सांगितले. त्यावर उपाय म्हणून ऑक्टोबर महिन्यात पुन्हा एकदा सिनेट बैठक घेऊन, अर्थसंकल्पात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक बदल करण्यासोबतच पुरवणी मागण्या पूर्ण करण्यात येतील, असे आश्वासन पांडे यांनी दिले.

Kesari 26.6.2020

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

लोकमत

### ऑनलाइन अधिसभा : महाविद्यालयांच्या सक्षमीकरणासाठी गुणवत्ता सुधार योजना

# विद्यापीठाचा ६५६ कोटी खर्चाचा; ६१ कोटी तुटीचा अर्थसंकल्प सादर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ५९५ कोटी १४ लाख ५ हजार जमेच्या आणि ६५६ कोटी ३८ लाख ४५ हजार खर्चाच्या व ६१ कोटी २४ लाख ४० हजार तुटीच्या प्रस्तावित अर्थसंकल्पास गुरुवारी विद्यापीठाच्या ऑनलाइन अधिसभेच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यात विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, पुणे-नगर नाशिक जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळ दत्तक योजना, महाविद्यालयांच्या सक्षमीकरणासाठी गुणवत्ता सुधार योजना आदींचा समावेश करण्यात आला आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलण्यात आलेली मार्च महिन्यातील आधिसभेची बैठक गुरुवारी ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या बैठकीस विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व तीनही जिल्ह्यातील अधिसभा सदस्य उपस्थित होते. कुलगुरु डॉ. करमळकर यांच्या सूचनेनुसार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांनी २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला.

कोरोनाचे संकट येण्यापूर्वी तयार केलेला अर्थसंकल्प गुरुवारी अधिसभा सदस्यांनी मांडलेल्या कपात सूचनांसह मंजूर करण्यात आला. कोरोनाची पार्श्वभूमी विचारात घेऊन पुढील तीन महिन्यानंतर पुन्हा अर्थसंकल्पात दुरुस्त्या केल्या जाणार आहेत.

विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत महाविद्यालयांचे सक्षमीकरण करण्यासाठी विद्यापीठातर्फे १३ कोटी २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून रेन वॉटर हार्वेस्टिंग, वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लांट, बायोगॅस प्रकल्प, सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल मशिनसाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. मात्र, ही तरतूद कमी असून त्यात वाढ करावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली. तसेच विद्यार्थ्यांसाठी विमा योजना व कमवा व शिका योजनेत वाढ करावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

### विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना; ऐतिहासिक स्थळ दत्तक योजनेसाठी १० लाख

१. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अर्थसाहाय्य योजना - **तरतूद १ कोटी**

२. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसाहाय्य योजना - **तरतूद १ कोटी**

३. छत्रपती राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती - **तरतूद २ कोटी**

४. महात्मा जोतिबा फुले गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना- **तरतूद २ कोटी**

५. स्वामी विवेकानंद विद्यार्थी साहाय्य योजना- **तरतूद ३ कोटी २५ लाख**



- शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून ८ हजार ७७७ विद्यार्थ्यांपैकी ५ हजार ७३९ पदवी स्तरावरील तर ३ हजार ३९ पदव्युत्तर पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ दिला जाणार आहे.
- नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये; या उद्देशाने स्वामी विवेकानंद विद्यार्थी साहाय्य योजना सुरु करण्यात आली आहे.
- विशेषत: पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त आणि आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे.
- विद्यापीठातर्फे ऐतिहासिक स्थळ दत्तक योजनेसाठी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील गड, किल्ले, ऐतिहासिक स्थळे व इमारती दत्तक घेऊन या स्थळांना असलेले ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करण्याच्या दृष्टिने काम केले जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य घेतले जाणार आहे.

Pune Main
Page No. 2 Jun 26, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

लोकसत्ता पुणे

८ शुक्रवार, २६ जून २०२० WWW.LOKSATTA.COM

# अंतिम वर्ष मूल्यमापनाचे सूत्र निश्चितीसाठी समिती

## कुलगुरूंची घोषणा, ६१.२४ कोटींच्या तुटीचा अर्थसंकल्प मंजूर

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाचे सूत्र निश्चित करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याची घोषणा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी गुरुवारी अधिसभेत केली. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनातील संभ्रम दूर करण्यासह आगामी शैक्षणिक वर्ष, प्रवेश प्रक्रिया आदी विषयांबाबत ही समिती अभ्यास करून अहवाल सादर करणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा पहिल्यांदाच ऑनलाइन पद्धतीने झाली. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्यासह अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्यांनी या ऑनलाइन अधिसभेत सहभाग घेतला. या अधिसभेत विद्यापीठाच्या २०२०-२१ साठीच्या अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली. व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे यांनी ६१ कोटी २४ लाखांच्या तुटीचा अर्थसंकल्प सादर केला. त्यात विद्यापीठाचे उत्पन्न ५९५ कोटी १४ लाख, तर खर्च ६५६ कोटी ३८ लाख रुपये दाखवण्यात आला आहे. गेल्या वर्षी विद्यापीठाची तूट ४७ कोटी होती. त्यामुळे यंदा या तुटीमध्ये वाढ झाली आहे.

करोना विषाणू संसर्गामुळे निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून अर्थसंकल्पातील तरतुदींमध्ये बदल करावे लागणार आहेत. त्यामुळे पुरवणी अंदाजपत्रक तयार करण्यात येणार असल्याची माहिती अधिसभेत देण्यात आली. करोना संसर्गामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने अंदाजपत्रकात सुधारणा करण्याबाबत अधिसभेत चर्चा करण्यात आली. त्यासाठी काही अर्थशीर्षांमध्ये कपात आणि वाढ करण्याबाबत सदस्यांकडून सूचना करण्यात आल्या.

### क्रीडा सुविधांसाठी भरीव तरतूद करावी

राष्ट्रीय पातळीवरील 'खेलो इंडिया' स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने दमदार कामगिरी केल्याचे अधिसभेत कौतुक करण्यात आले. ही कामगिरी अधिक उंचावण्यासह क्रीडापटूंना प्रोत्साहन देण्यासाठी उपलब्ध क्रीडा सुविधांचा वापर वाढवण्यासह अंदाजपत्रकात भरीव आर्थिक तरतूद करण्याची सूचना राजीव साबडे यांनी केली. तर क्रीडा व्यवस्थापन हा नवीन अभ्यासक्रम, सचिन तेंडुलकर क्रीडा अध्यासन सुरू करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्याची सूचना अशिष पेंडसे यांनी केली.

### महाविद्यालयांबाबत दुजाभाव

विद्यापीठाशी संलग्न सुमारे नऊशे महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते. असे असताना विद्यापीठ संकुलाच्या तुलनेत संलग्न महाविद्यालयांसाठीच्या योजनांवर तरतूद कमी असल्याने दुजाभाव करण्यात आल्याची टीका डॉ. संजय खरात, बागेश्री मंठाळकर आदी सदस्यांनी केली. विद्यापीठ केवळ संकुलापुरतेच मर्यादित नसून महाविद्यालयांचा पुरवणी अर्थसंकल्पात विचार करण्याची भूमिका मांडण्यात आली.

### येणे रक्कम वसुलीसाठी कालबद्ध कार्यक्रम हवा

शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून विद्यापीठाला शुल्काच्या रूपात मोठ्या प्रमाणात रक्कम येणे आहे. सध्याच्या आर्थिक अडचणीच्या काळात ही रक्कम मिळणे विद्यापीठासाठी महत्त्वाचे असून, ही रक्कम लवकर मिळवण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम करण्याची सूचना अधिसभा सदस्यांकडून करण्यात आली.



### विद्यार्थी शिष्यवृत्ती, विविध उपक्रमांसाठी तरतूद

विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात येणाऱ्या नव्या शिष्यवृत्तीसाठी अंदाजपत्रकात सुमारे दहा कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सांस्कृतिक उपक्रम, क्रीडा यांसाठीच्या तरतुदींमध्ये वाढ करण्यात आली आहे. तर अन्य काही योजनांवरील खर्चात कपात करण्यात आली आहे. तसेच ऐतिहासिक वास्तू दत्तक योजनेसाठी १० लाख, विद्यार्थी आदानप्रदानासाठी सेतू योजनेसाठी २५ लाख, जम्मू-काश्मीर-लडाख शैक्षणिक प्रकल्पासाठी १० लाख, तारुण्यभान योजनेसाठी २५ लाखांची तरतूद करण्यात आली आहे.

# परीक्षेचे अधिसभेतही पडसाद

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील विद्यापीठांतील अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या मुद्द्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेतही पडसाद उमटले. राज्य शासनाच्या अंतिम वर्ष परीक्षा न घेण्याच्या निर्णयाला पाठिंबा देण्याची गरज, संघटनांच्या मागण्या, परीक्षा न घेण्यामुळे विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम, एकूणात परीक्षांमुळे निर्माण झालेला संभ्रम यावरून अधिसभेत वादविवाद झाले.

करोना विषाणू संसर्गामुळे राज्यातील विद्यापीठ परीक्षांचा प्रश्न निर्माण झाला. तर मार्ग काढण्यासाठी सुरुवातीला अंतिम वर्ष वगळता अन्य वर्षांच्या परीक्षा राज्य शासनाने रद्द केल्या. तर अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षा घ्यायच्या की नाही यावरून बराच काळ प्रश्न होता. अखेरीस अंतिम वर्ष परीक्षा न घेता विद्यार्थ्यांकडून परीक्षा न घेता पदवी प्रमाणपत्र देण्याचे लेखी घेण्याबाबत आणि श्रेणीसुधार हवी असलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचा निर्णय शासनाने घेतला. मात्र, या निर्णयानंतरही संभ्रमाचे वातावरण आहे.

अधिसभा सदस्य अमित पाटील म्हणाले, की मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अंतिम वर्ष परीक्षा न घेण्याच्या निर्णयाला विद्यापीठाकडून पाठिंबा न देता परीक्षा घेण्याचे सांगून संभ्रम वाढवण्यात आला. अर्थसंकल्पाची जबाबदारी राजेश पांडे यांना दिली जाते. अन्य सदस्यांनाही संधी द्यावी. तर राजकीय संघटना, राजकीय व्यक्तींचे उल्लेख करण्याची विद्यापीठाची अधिसभा ही जागा नाही, असे मत सदस्य गिरीश भवाळकर यांनी मांडले. विद्यापीठांच्या कामकाजात राजकारण करू नये. विद्यापीठाच्या कामासाठी सर्वांनी पुढे यावे, असे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे म्हणाले. तर डॉ. शामकांत देशमुख यांनी अंतिम वर्ष परीक्षेच्या मुद्द्यावर स्थगन प्रस्ताव मांडला. परीक्षेच्या कियावरून निर्माण झालेला संभ्रम, परीक्षा नको असल्याचे विद्यार्थ्यांनी लिहून देणे, विद्यार्थ्यांच्या रोजगारावर होणारा परिणाम आदी मुद्दे डॉ. संजय खरात, दादाभाऊ शिनलकर आदी सदस्यांनी मांडले.

### सदस्यांचा सभात्याग

ऑनलाइन पद्धतीने अधिसभा घेणे, विद्यापीठाकडून व्यवस्थित संवाद यंत्रणा निर्माण न करणे या विषयी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत डॉ. नंदू पवार, आशिष पेंडसे, अमित पाटील अशा काही सदस्यांनी अधिसभेतून सभात्याग केला. अभिषेक बोके, संतोष ढोरे आदींनीही नाराजी व्यक्त करून चर्चेसाठी स्वतंत्र बैठक घेण्याची मागणी केली. तसेच विद्यापीठाने समाजमाध्यमांवर सक्रिय होण्याची गरज बोके यांनी व्यक्त केली.

### सदस्यांची अल्प उपस्थिती

नेहमीच्या पद्धतीने होणाऱ्या अधिसभेच्या तुलनेत ऑनलाइन अधिसभेला अल्प उपस्थिती होती. शंभरहून अधिक अधिसभा सदस्य असताना जेमतेम तीस ते पस्तीस अधिसभा सदस्य, तर सुमारे तीस विद्यापीठ प्रशासन आणि व्यवस्थापन परिषद सदस्य या अधिसभेत सहभागी झाले. त्यामुळे एकूणात या ऑनलाइन अधिसभेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

### ऑनलाइन अधिसभेत तांत्रिक अडचणी

विद्यापीठाच्या पहिल्या ऑनलाइन अधिसभेत सदस्य आपल्या घरातून किंवा कार्यालयातून सहभागी झाले. मात्र आवाज नीट न येणे, चित्र नीट न दिसणे, कनेक्टिव्हिटी न मिळणे अशा तांत्रिक अडचणींचाही सामना करावा लागला. या अडचणींमुळे अनेक सदस्यांना बोलता आले नाही. त्या विषयी काही सदस्यांनी खंत व्यक्त केली.

लोकसत्ता Fri, 26 June 2020
https://epaper.loksatta.com/c/53017802

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

### परीक्षेबाबतचा संभ्रम दूर करण्यासाठी स्वतंत्र समिती

**पुणे** : राज्य सरकारचा विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय संभ्रमाचा आहे, हा मुद्दा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत गाजला. विद्यापीठाने परीक्षा, मूल्यमापन पद्धती, विद्यार्थ्यांचे प्रवेश आदींचा संभ्रम दूर करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे. या समितीमध्ये शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य आदींचा समावेश राहणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मार्चपासून रखडलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय सिनेट ऑनलाइन पद्धतीने गुरुवारी झाली. राज्य सरकारने विद्यापीठांच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. मात्र, या निर्णयात कोणत्याच प्रकारची स्पष्टता नाही. या निर्णयाचा लाभ घेणाऱ्यांना हमीपत्र द्यावे लागणार आहे; तर परीक्षा देण्याची इच्छा असणाऱ्यांना लेखी द्यायचे आहे. बॅकलॉगचे विषय असणाऱ्यांबाबत स्पष्टता नाही. या निर्णयामुळे विद्यार्थी, पालक, प्राध्यापक यांच्यामध्ये संभ्रम निर्णय झाला आहे. परीक्षा हा अंदाजपत्रकाप्रमाणे अतिशय महत्त्वाचा विषय असूनही, सरकारकडून अजूनही याबाबत ठोस सविस्तर निर्णय येत नाही. त्यामुळे या निर्णयात स्पष्टता येण्यासाठी सरकार आणो विद्यापीठाने भूमिका जाहीर करावी, अशा मागणीसाठी सदस्य शामकांत देशमुख यांनी स्थगनप्रस्ताव मांडला. त्याला डॉ. संजय खरात, संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे, डॉ. तानाजी वाघ, डॉ. देविदास वायदंडे, डॉ. बाबा सांगळे, डॉ. सुनीता आढाव, बागेश्री मंठाळकर, गिरीश भवाळकर आदींनी पाठिंबा दिला. त्यावर सिनेटचे अध्यक्ष आणि डॉ. करमळकर म्हणाले, राज्य सरकारच्या निर्णयाप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम आणि द्वितीय वर्षांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या ऐच्छिक परीक्षा कशा घ्यायच्या, परीक्षा पद्धती कशी राहणार, मूल्यमापन कसे करायचे, हमीपत्र, आगामी प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक वर्ष अशा विविध मुद्द्यांवर तोडगा काढण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमण्यात येईल. समितीच्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

**Kesari: 26.6.2020**

### विद्यापीठाचा अर्थसंकल्प मंजूर

**पुन्हा चर्चेसाठी ऑक्टोबरमध्ये विशेष बैठक**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेने ६५६ कोटी ३८ लाख ४५ हजार रुपये तरतुदीच्या आणि ६१ कोटी २४ लाख ४० हजार रुपये तुटीच्या अर्थसंकल्पाला गुरुवारी मान्यता दिली. ऑक्टोबर महिन्यात पुरवणी मागण्यांसह अर्थसंकल्पावर पुन्हा एकदा सविस्तर चर्चा होणार आहे.

विद्यापीठ अधिसभेच्या अर्थसंकल्पीय बैठकीत व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांनी २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प सादर केला. या वेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार उपस्थित होते. विद्यापीठाचा अर्थसंकल्प मार्च महिन्यापूर्वी तयार करण्यात आल्याने, त्यामध्ये करोनाला रोखण्यासाठी; तसेच नव्या उपाययोजना आखण्यासाठी कोणतीही ठोस तरतूद नाही. त्यामुळे विद्यापीठाचा खर्च भागविण्यासाठी अर्थसंकल्पाला तात्पुरती मान्यता देऊन, ऑक्टोबर महिन्यात पुन्हा अधिसभेची बैठक घेण्याचा आग्रह सदस्यांनी मांडला. विद्यापीठ कायद्यानुसार अशा पद्धतीने पुन्हा अर्थसंकल्प मांडता येणार नसल्याचे पांडे यांनी सांगितले. त्यावर उपाय म्हणून, 'ऑक्टोबर महिन्यात पुन्हा एकदा अधिसभेची बैठक घेऊन, करोनाच्या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पात आवश्यक बदल करण्यासोबतच पुरवणी मागण्या पूर्ण करण्यात येतील,' असे आश्वासन पांडे यांनी दिले. ते म्हणाले, 'विद्यापीठाची एकूण जमा रक्कम ५९५ कोटी १४ लाख ५ हजार रुपये आहे. मात्र, खर्चात वाढ झाल्याने ६१ कोटी २४ लाख ४० हजार रुपयांची तूट आहे.'

**क्रीडापटूंना प्रोत्साहन**

राष्ट्रीय पातळीवरील 'खेलो इंडिया' स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने दमदार कामगिरी केल्याचे कौतुक अधिसभा बैठकीत करण्यात आले. मात्र, ही कामगिरी अधिक उंचावण्याकरिता क्रीडापटूंना प्रोत्साहन देण्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याची सूचना राजीव साबडे यांनी केली. यासोबतच स्पोर्ट्स मॅनेजमेंट अभ्यासक्रम, सचिन तेंडुलकर क्रीडा अध्यासन सुरू करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्याची सूचना आशिष पेंडसे यांनी केली. त्याला कुलगुरूंनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

**विद्यार्थ्यांसाठी पाच शिष्यवृत्ती योजना**

विद्यापीठाने पाच शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, त्याचा फायदा विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांना होणार आहे. कला, क्रीडा, कौशल्य विकास उपक्रमांसाठी भरीव तरतूद आहे.

**Maharashtra Times : 26.6.2020**

### परीक्षा, प्रवेशांसाठी स्वतंत्र समिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

परीक्षा, मूल्यमापन पद्धती, विद्यार्थ्यांचे प्रवेश आदींबाबत संभ्रम दूर करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला आहे. या समितीमध्ये शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य आदींचा समावेश असेल.

करोनाच्या पार्श्वभूमीवर मार्चपासुन रखडलेली विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा बैठक ऑनलाइन पद्धतीने गुरुवारी पार पडली. 'राज्य सरकारने विद्यापीठांच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. मात्र, या निर्णयात कोणत्याच प्रकारची स्पष्टता नाही. या निर्णयाचा लाभ घेणाऱ्यांना हमीपत्र द्यावे लागणार आहे, तर परीक्षा देण्याची इच्छा असणाऱ्यांना लेखी द्यायचे आहे. बॅकलॉगचे विषय असणाऱ्यांबाबत स्पष्टता नाही. या निर्णयामुळे विद्यार्थी, पालक, प्राध्यापक यांच्यामध्ये संभ्रम निर्णय झाला आहे. परीक्षा हा अर्थसंकल्पाप्रमाणे अतिशय महत्त्वाचा विषय असूनही सरकारकडून अजूनही याबाबत ठोस सविस्तर निर्णय नाही. त्यामुळे या निर्णयात स्पष्टता येण्यासाठी सरकार आणि विद्यापीठाने भूमिका जाहीर करावी,' अशा मागणीचा स्थगनप्रस्ताव सदस्य श्यामकांत देशमुख यांनी मांडला. त्याला डॉ. संजय खरात, संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे, डॉ. तानाजी वाघ, डॉ. देविदास वायदंडे, डॉ. बाबा सांगळे, डॉ. सुनीता आढाव, बागेश्री मंठाळकर, गिरीश भवाळकर आदींनी पाठिंबा दिला.

सिनेटचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, 'राज्य सरकारच्या निर्णयाप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या निकालांचे योग्य मूल्यमापन करण्याची जबाबदारी महत्त्वाची आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत विद्यार्थी, पालक आणि प्राध्यापकांमध्ये संभ्रम आहे. विद्यार्थ्यांच्या ऐच्छिक परीक्षा कशा घ्यायच्या, परीक्षा पद्धत कशी राहणार, मूल्यमापन कसे करायचे, हमीपत्र, आगामी प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक वर्ष अशा विविध मुद्द्यांवर तोडगा काढण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमण्यात येईल. समितीच्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल.'

**सदस्यांची टोलेबाजी**

'विद्यापीठ प्रशासनाकडून राजकीय; तसेच कॉर्पोरेट क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या राजेश पांडे यांना झुकते माप देऊन, महत्त्वाच्या कामांची जबादारी दिली जाते. अर्थसंकल्पासारख्या महत्त्वाच्या विषयांची जबाबदारी त्यांनाच दिली जाते. अधिसभेत अर्थविषयक ज्ञान असणारे सदस्य असतानाही ठरावीक सदस्यांचा विचार का केला जातो,' असा प्रश्न सदस्य अमित पाटील यांनी उपस्थित केला. त्यावर पांडे यांनी, 'विद्यापीठाचा पंधरा कलमी कार्यक्रम राबवण्यासाठी सर्व सदस्यांचे स्वागत आहे. पुढे येऊन जबाबदारी घ्या,' असे उत्तर दिले. 'राजकीय पक्ष आणि त्यांच्या विद्यार्थी संघटनांचे मुद्दे अधिसभेत उपस्थित न करता अधिसभेची शिस्त पाळावी. शैक्षणिक आणि विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर व्हावी,' असा टोला गिरीश भवाळकर यांनी लगावला.

**विविध विषयांवर चर्चा आणि सभात्यागही**

विद्यापीठाच्या स्थापनेपासून अधिसभेची बैठक प्रथमच ऑनलाइन झाली. मात्र, तरीही सदस्यांनी नेहमीप्रमाणे प्रश्न उपस्थित करून, स्थगन प्रस्ताव सादर करून; तसेच विविध मुद्द्यांवर चर्चा करून नेहमीच्या बैठकीची आठवण करून दिली. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी विद्यापीठाच्या कार्याचा आढावा घेतला. ऑनलाइन पद्धतीने अधिसभेची बैठक आयोजित करणे, कार्यक्रम पत्रिका नसणे, विद्यापीठाकडे प्रभावी संवाद यंत्रणा नसणे, करोनाशी लढण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद नसणे, विद्यापीठ सोशल मीडियावर नसणे, विद्यापीठ प्रशासनाकडून उत्तरे न मिळणे, संलग्न महाविद्यालयांकडे दुर्लक्ष अशा विविध मुद्द्यांवर सदस्य आशिष पेंडसे, राजीव साबडे, डॉ. संजय खरात, अभिषेक बोके, विवेक बुचडे, डॉ. के. एन. गिरमकर यांनी चर्चा केली, तर प्रशासनाच्या उत्तरांनी समाधान न झाल्याने डॉ. नंदू पवार, अमित पाटील आदींनी ऑनलाइन सभात्याग केला.

**Maharashtra Times : 26.6.2020**

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

लोकमत

# परीक्षेवरील अध्यादेश अंमलबजावणीसाठी समिती

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत निर्णय : निकाल जाहीर करण्याचे सूत्र प्रसिद्ध करण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भातील अध्यादेशाचा अभ्यास करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुरुवारी झालेल्या अधिसभेच्या बैठकीत घेतला. त्यामुळे निकाल तयार करण्याचे सूत्र व त्या संदर्भातील आवश्यक बाबीच्या कामास लवकरच सुरुवात होणार आहे.

कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी घेतलेल्या ऑनलाइन अधिसभेच्या बैठकीत अंतिम वर्षाच्या परीक्षा व निकालाबाबत अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. अधिसभा सदस्य डॉ. शामकांत देशमुख, डॉ. संजय खरात, बागेश्री मंठाळकर आदी सदस्यांनी अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत मनोगत व्यक्त केले. केवळ विद्यार्थी पालकच नाही तर महाविद्यालयांमधील प्राचार्य, प्राध्यापकांमध्ये सुद्धा निकालाबाबत संभ्रम व गोंधळाचे वातावरण आहे. त्यामुळे विद्यापीठाने याबाबत स्पष्टता आणून सर्वांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा काही सदस्यांनी व्यक्त केली.

परीक्षा विभागाकडे उपलब्ध असलेल्या विद्यार्थ्यांच्या पर्वीच्या गुणांची माहिती ऑनलाइन पद्धतीने प्रसिद्ध करून विद्यापीठाने तयार केलेल्या सूत्राचा अवलंब केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याला किती टक्के गुण मिळणार आहेत, याबाबत कल्पना द्यावी. त्यामुळे एखाद्या विद्यार्थ्याला ५० किंवा ५५ टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळणार असतील तर काही विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाण्याचा निर्णय घेऊ शकतील, असेही काही अधिसभा सदस्यांनी सांगितले

### 'परीक्षा द्यावी किंवा न द्यावी' यावर होईल निर्णय

राज्य शासनाने बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत अद्याप कोणताच निर्णय जाहीर केलेला नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या परीक्षा व निकालाबाबत येणाऱ्या अडचणी संदर्भात विद्यापीठाने राज्य शासनाला कळवावे. त्याचप्रमाणे परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र मिळावे असा विचार करताना या विद्यार्थ्यांना किती टक्के गुण मिळणार आहेत, सुरुवातीलाच कल्पना द्यावी. त्यासाठी विद्यापीठाने सर्व प्रथम निकाल जाहीर करण्याचे सूत्र प्रसिद्ध करावे. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी किंवा न द्यावी या बाबतचा निर्णय घेणे शक्य होईल.

### विद्यापीठ चालते निवडक व्यक्तींवर

**पुणे** : कोरोनाच्या काळात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी व प्राध्यापकांनी केलेल्या कामाचा आढावा घेऊन यापुढील काळात राबविल्या जाणाऱ्या विविध उपाययोजनांची माहिती कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी ऑनलाइन अधिसभेच्या बैठकीत दिली. दरम्यान, काही अधिसभा सदस्यांनी अधिसभेची बैठक ऑनलाइन घेतल्याने नाराजी व्यक्त केले. तर काही निवडक व्यक्तींवर विद्यापीठाचे कामकाज चालवले जात असल्याचा आरोप करत काही सदस्य अधिसभेचा निषेध करून बैठकीतून बाहेर पडले.

विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच गुरुवारी ऑनलाइन पद्धतीने अधिसभेची बैठक घेण्यात आली.

अधिसभेत कामकाज सुरु झाल्यानंतर काही अधिक सभासदांनी ऑनलाइन अधिसभेवर नाराजी व्यक्त केली. तसेच प्रशासनातर्फे अधिसभा सदस्यांना गृहीत धरुन कामकाज केले जाते. त्याचप्रमाणे प्रत्येक कामकाजात व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांना प्राधान्य दिले जाते. इतर सदस्यांना कामकाजात सामावून घेतले जात नाही, असा आरोप अधिसभा सदस्य अमित पाटील यांनी केला. मुंबई विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय सभेत राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या अर्थसंकल्प सादर करण्यावर काही सदस्यांनी आक्षेप घेतला. तसेच विद्यापीठाच्या इतर अधिसभा सदस्यांनी अर्थसंकल्प सादर करावा, अशी मागणी केली.

Pune Main
Page No. 2 Jun 26, 2020
Powered by: erelego.com

# समिती दूर करणार परीक्षेचा संभ्रम

### निकाल कसा लागणार यावरून विद्यार्थी चिंतेत

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २५** - विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेवरून विद्यार्थी, पालक, महाविद्यालये संभ्रमात आहेत. निकाल कसा लागणार यावरून विद्यार्थी चिंतेत आहेत. यावरून अर्थसंकल्प अधिसभेत सदस्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी परीक्षेचा संभ्रम दूर करण्यासाठी विद्यापीठातर्फे समिती नेमली जाणार असल्याचे सांगितले.

करोनामुळे पुणे विद्यापीठाची अधिसभा व्हिडिओ कॉन्फरन्सींगद्वारे झाली. यात स्थगन प्रस्तावाद्वारे अन्य विषय बाजूला ठेवत परीक्षेच्या विषयावर चर्चा करावी, अशी मागणी डॉ. शाम्मकांत देशमुख यांनी केली. त्यावेळी त्यांनी ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे ती कशी घेतली जाणार, गुण कसे दिले जाणार, पदवी देताना दुजाभाव केला जाणार नाही ना, बॅंकलॉगच्या विद्यार्थ्यांसाठी काय निर्णय आहे यासह अनेक विषयांवर विद्यार्थी, पालक संभ्रमात आहेत. यावर विद्यापीठाने खुलासा करावा आणि एक समिती नेमून त्याचा अहवाल राज्य शासनाला सादर करावा, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली. दरम्यान, परीक्षा न देता पदवी घेतली तर काय होणार यासह अन्य प्रश्नांच्या चक्रव्युहात विद्यार्थी, पालक अडकले असून, ते तणावातून जात आहेत. यातून विद्यापीठाने त्यांना बाहेर काढले पाहिजे. तसेच, अधिसभेमध्ये परीक्षेवर ठोस निर्णय झाला पाहिजे, अशी भूमिका प्राचार्य संजय खरात आणि बागेश्री मंठाळकर यांनी मांडली.

यासंदर्भात कुलगुरू डॉ. करमळकर म्हणाले, परीक्षेचा संभ्रम दूर करण्यासाठी विद्यापीठातर्फे समिती नेमून, त्याद्वारे जलदगतीने काम करून निर्णय घेतले जाणार आहे. याबाबत राज्यातील अन्य विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक शुक्रवारी होणार आहे. त्यामध्येही परीक्षेच्या विषयावर चर्चा केली जाणार असल्याचे ते म्हणाले.

### काही सदस्यांचा सभात्याग

करोनाच्या प्रादुर्भावामुळे यंदा प्रथमच ऑनलाइन अधिसभेची बैठक झाली. त्यात अनेक सदस्यांचा ऑफलाइनचा आग्रह असतानाही विद्यापीठाने ऑनलाइनच बैठक घेतली. मात्र, ऑनलाइनद्वारे आपले म्हणणे मांडता आले नाही, असे काही अधिसभा सदस्यांचे म्हणणे आहे. ऑनलाइन बैठकीत योग्य नियोजन झाले नसल्याचे प्रश्न उपस्थित करीत काही सदस्यांनी सभात्याग केला.

### गृहीत धरल्याने प्रशासनावर टीकेची झोड

अधिसभा सदस्यांनी प्रश्न विचारले, पत्र पाठवले तरीही विद्यापीठ प्रशासन उत्तर देत नाही. आम्हाला तुम्ही गृहित धरता का? असा प्रश्न करत प्रशासनाला अधिसभेत जाब विचारला. विद्यापीठाची अधिसभा ऑनलाइन न घेता ऑफलाइन घ्यावी, अशी अनेक सदस्यांची मागणी होती. पण सुरक्षेच्या कारणास्तव ही ऑनलाइनच घेण्यात आली. अधिसभा सदस्यांनी याबाबत विद्यापीठाकडे त्यांचे म्हणणे मांडले होते. तरीही त्यास उत्तर दिले नाही. यापूर्वी अनेकदा अशाच प्रकारचा अनुभव आला आहे, अशी टीका अनेक सदस्यांनी केली.

प्रभात Fri, 26 June 2020
epaper.eprabhat.net/c/53018969

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020


## Section: Education



# SPPU adopts student exchange programme Setu to pool resources

**Students can study a subject with better known professor of another college; further, faculty members can also be swapped by colleges**

FILE PHOTO



SPPU has set aside Rs 25 lakh dedicated to facilitating Setu during this academic year

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

Following the path laid down by the University Grants Commission (UGC), Savitribai Phule Pune University (SPPU) has taken that leap towards resource pooling and adapted the special student exchange programme for all its colleges, including the autonomous affiliated ones. The programme will allow students from one college to be tutored by subject experts in another college for a limited time and also allow faculty members of one college to teach in other colleges similarly.




The programme has been christened 'Setu' (bridge) and is slated to give students access to teaching resources in other colleges to sharpen their study of one subject in a particular semester. "We've made budgetary provision for Setu and Rs 25 lakh will be dedicated to facilitate it during the academic year. It is expected to be beneficial to students from different colleges," pointed out Rajesh Pande, member of the varsity management council.

Stressing the point, SPPU senate member Sanjay Chakane added, "This will give students in certain colleges the chance to study under professors in other colleges, who are recognised for their expertise in specific subjects. Also, those in rural areas, who've taken admission in local colleges for their post-graduation, can now come to city colleges, availing their faculty as well as infrastructure such as laboratories, even if for a short duration." This horizontal model of knowledge sharing will enable both students and teachers to stretch their learning resources, he explained.

SPPU's vice chancellor Nitin Karmalkar also underscored that Setu will facilitate knowledge sharing and neither students nor teachers will be limited to one college, thanks to this. However, Pande pointed out, "As of now, the programme is applicable only for post-graduate courses."

Of course, the endeavour is to introduce it for undergraduate programmes subsequently. Similarly, in the present context of online classes, the programme will be limited to the digital platform with colleges sharing their e-content.

Times of India: 26.6.2020

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

### Special Panel To Look Into Last Semester Assessment Issue

# SPPU grad, post-grad pupils can expect results in July

TIMES NEWS NETWORK

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) will announce the results of graduate and postgraduate students, barring those in the final semester, next month, vice-chancellor Nitin Karmalkar stated during the first ever online senate meeting conducted on Thursday.

Karmalkar said that the university is in the process of calculating average marks and the final results will be announced in July.

The senate meeting, conducted to present the university budget for 2020-21, had been put on hold since March due to the Covid 19 pandemic. With discussions regarding the issue of final semester examinations being raised by several senate members, Karmalkar said that a committee would be formed to look into various aspects of the matter. Senate members said that many questions remained—from the fate of backlog students to the pattern and syllabus of examination, if a final year student chooses such an option.

Senate member Sanjay Kharat said, "If examinations are held, how will they be conducted? What will happen if the student opts for average marks instead of appearing for examinations? There are numerous such questions going through the students' mind and the anxiety must be put to rest by the university by issuing clear guidelines on all matters related to examinations."

Karmalkar added that all such matters will be studied by a committee and a clear response will be issued as soon as possible. "As per the state government's decision, the university has started compiling the results of first- and second-year students of conventional courses. It is important to ensure that the average marking is done without any errors. There is a lot of anxiety regarding final semester results among parents, students and teachers. A committee, comprising senior and learned members, will be formed to study and recommend best possible way to go about the process," said Karmalkar.

### ZOOM IN ON THE FINANCIAL PLAN

- SPPU senate members passed the annual budget of **₹656.38 crore for 2020-21**
- The budget saw a cut of nearly **₹61.24 crore this year**
- 5 scholarship schemes have been introduced in the budget to **benefit 15,000 students** of colleges affiliated to the varsity

**FOCUS ON SPORTS**

Senate members Rajiv Sabde and Ashish Pendse suggested an increase in the budget for sports activities following an impressive performance in the nation Khelo India tournament, starting a new course on sports management and instituting the Sachin Tendulkar chair

# ₹650cr budget presented at senate meet

TIMES NEWS NETWORK

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) passed the annual budget of Rs656.38 crore for the 2020-21 academic year.

The budget has been cut down by nearly Rs61.24 crore this year. The senate members passed the budget in the online meeting held on Thursday. The budget will be presented again in October with provisions made for dealing with the Covid-19 situation.

Management council member Rajesh Pande, who presented the budget, said, "Apart from scholarships, allocations have also been made for arts, sports and skill development programmes to boost ongoing activities."

The budget was prepared in March hence it did not deal with provisions to prevent the spread of Covid-19. When the budget will be presented in October, there will be revisions with respect to allocations made for the coronavirus situation, vice-chancellor Nitin Karmalkar said.

**Pune Mirror: 26.6.2020**

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

### 'कमवा व शिका योजनेमध्ये महाविद्यालयांना कमी निधी'

पुणे, ता. २६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कमवा व शिका योजनेच्या निधीचे वाटप करताना महाविद्यालयांवर अन्याय केल्याचा आरोप अधिसभा सदस्यांनी केला असून, जादा निधीची मागणी केली.

विद्यापीठाने अधिसभेत गुरुवारी (ता.२५) अर्थसंकल्प सादर केला. त्यात पाच हजार विद्यार्थी शिकणाऱ्या विद्यापीठासाठी अडीच कोटींची; तर तब्बल पाच लाख विद्यार्थी शिकणाऱ्या संलग्न महाविद्यालयांसाठी केवळ साडेचार कोटींची तरतूद केली. हा दुजाभाव का करता, असा सवाल सदस्यांनी केला. बागेश्री मंठाळकर, व्यवस्थापन परिषद सदस्य, प्राचार्य संजय चाकणे यांनी महाविद्यालयांना जास्त निधी देण्याची मागणी केली.

**Sakaal: 27.6.2020**

### विद्यापीठाचे क्रेडिट कोर्स 'स्वयं'वर

#### सहा विषयांवर अभ्यासक्रम; जुलैपासून ऑनलाइन शिक्षण

**ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा**

**पुणे, ता. २७ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक बहुमाध्यम संशोधन केंद्राने (ईएमआरसी) विकसित केलेले सहा क्रेडिट कोर्स केंद्र सरकारच्या 'स्वयं' पोर्टलवर उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे राज्यशास्त्र व व्यवस्थापन विषयातील क्रेडिट कोर्स करणे देशातील पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शक्य होणार आहे.**

'कोरोना'मुळे ऑनलाइन शिक्षणाचे महत्त्व वाढत आहे. त्यासाठी पुणे विद्यापीठाने 'ई-कंटेंट' तयार करणे, विद्यार्थ्यांना हे साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी काम हाती घेतले आहे. तसेच, ४० टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन करण्याची तयारी केली आहे. दरम्यान, मागील वर्षापासून विद्यापीठाने पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या अभ्यासक्रमासाठी चॉइस बेस क्रेडिट सिस्टिम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.



गेल्या वर्षी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम या पद्धतीने शिकविल्यानंतर यंदा द्वितीय वर्षही त्याच्या कक्षेत आले आहे. या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना 'स्वयं'च्या माध्यमातून ऑनलाइन शिक्षणातून क्रेडिट कोर्स करता येणार आहेत.

पुणे विद्यापीठाच्या सहा क्रेडिट कोर्सला 'स्वयं'च्या विद्या परिषदेने मान्यता दिली आहे, अशी माहिती 'ईएमआरसी'चे समन्वयक श्रीकांत ठकार यांनी दिली.

**'स्वयं'च्या माध्यमातून २० टक्के क्रेडिट ट्रान्स्फर शक्य होते. मात्र, आता ते ४० टक्क्यांवर नेले जाणार आहे. देशातील नामांकित प्राध्यापकांनी तयार केलेले अभ्यासक्रम 'स्वयं'वर सर्व विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क उपलब्ध असतात. पुणे विद्यापीठानेही सहा अभ्यासक्रम तयार केले आहेत.**

**- डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, पुणे विद्यापीठ

**क्रेडिट कोर्समधील बहुतांश विषय व्यवस्थापन शाखेशी संबंधित असले, तरी कोणत्याही पदवीचे विद्यार्थी यासाठी अर्ज करू शकतात. ८ ते १२ आठवड्यांचे हे अभ्यासक्रम आहेत. यास प्रत्येकास ३ ते ४ क्रेडिट मिळणार आहेत. तसेच, प्रत्येक आठवड्याला अंतर्गत मूल्यांकनासाठी परीक्षा असते. अंतिम परीक्षा नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये 'स्वयं'कडून घेतली जाते.**

**- विवेक नाबर,** निर्माता, ईएमआरसी

**हे आहेत सहा कोर्स**

१. पॉलिटिकल आयडियॉलॉजी
२. मायक्रो इकॉनॉमिक्स
३. स्पेशल सर्व्हिसेस मार्केटिंग इन इंडिया
४. फंडामेंटल्स ऑफ ऑफिस मॅनेजमेंट अँड मेथड्स
५. फंडामेंटल्स ऑफ इंडिया फायनान्स अकाउंटिंग
६. बिझनेस एथिक्स

**Sakaal: 28.6.2020**

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

### सर्व विद्यापीठे, महाविद्यालयांना 'यूजीसी'चे निर्देश

# 'रेनवॉटर हार्वेस्टिंग' बंधनकारकच

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २७** - पाण्याचा अपव्यय टाळून त्याची बचत व्हावी, यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'कॅच द रेन' ही मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांना रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा कार्यान्वित करण्याचे निर्देश 'यूजीसी'ने दिले आहेत.

नॅशनल वॉटर मिशन अंतर्गत ही मोहीम राबवण्यात येत आहे. प्रत्येक राज्याला समान पाणी मिळावे असा त्यामागचा उद्देश आहे. पावसाने जोर धरण्यापूर्वीच रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा उभारा, अशा यूजीसीच्या सूचना आहेत. साठवलेल्या पावसाच्या पाण्याचा उपयोग भूगर्भातील पाण्याची स्रोते सक्रीय करण्यास केला जाणार आहे.

पावसाचे पाणी साठवण्यासाठी जमिनीखाली टाक्या बनवणे, इमारतींच्या छतांवर रेनवॉटर हार्वे स्टिंग यंत्रणा उभारणे, पाण्याच्या स्रोतांमध्ये निर्माण झालेले अडथळे



दूर करणे यासाठीही कार्यक्रम राबवण्याच्या सूचना यूजीसीने दिल्या आहेत. विद्यार्थी सहभागातून जुन्या विहिरींची डागडुजी करणे तसेच बंद पडलेली बोअरवेल्स सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही यूजीसीने सांगितले आहे.

**Prabhat: 28.6.2020**

# कमवा व शिका योजनेसाठी अत्यल्प तरतूद

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २७** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजने'साठी अर्थसंकल्पात तरतुदींवरून महाविद्यालयांत दुभाजाव होत आहे. या योजनेसाठी तरतूद अत्यल्प आहे. या महत्त्वाच्या विषयाकडे अधिसभा सदस्यांनी कुलगुरूंचे लक्ष वेधले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण आहे. तथापि, विद्यापीठाने अधिसभेत नुकताच अर्थसंकल्प सादर केला. त्यावेळी अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर यांनी कमवा व शिका योजनेची तरतूद महाविद्यालयांसाठी कमी असल्याचे सांगितले. सदस्य प्राचार्य संजय चाकणे यांनीही हा निधी वाढवण्याची मागणी केली.

**Prabhat: 28.6.2020**

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

लोकमत

# परीक्षा न देता पदवीसाठी विद्यार्थ्यांचे ११ हजार अर्ज

### मुख्य परीक्षा दिलीच नव्हती । कोरोनामुळे होणार फायदा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : 'कोरोना'मुळे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तब्बल ११ हजार ५०० विद्यार्थ्यांनी २५ जूनपर्यंत ऑनलाईन अर्ज केल्याची माहिती समोर आली आहे. कोरोनामुळे परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र मिळू शकते, या विचारातून अनेक विद्यार्थ्यांनी हे अर्ज हे केल्याचे विद्यापीठातील काही अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक या जिल्ह्यातील महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना मार्च २०२० मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी ५ जानेवारी ते ८ मार्चपर्यंत अर्ज करण्यास मुदत देण्यात आली होती. परंतु, कोरोनाचे संकट आल्याने विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यानच्या कालावधीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरता आले नाहीत त्यांना विद्यापीठाने अर्ज करण्यास मुदत द्यावी, अशी मागणी विद्यापीठाकडे करण्यात आली. त्यावर विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने ५ जूनपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यास मुदत दिली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत अर्ज भरणे अपेक्षित होते. परंतु, अनेक विद्यार्थ्यांनी अर्ज भरले नाहीत. त्यामुळे तीन वेळा मुदतवाढ द्यावी लागली.

राज्य शासनाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा न घेता त्यांना मागील सत्रातील गुणांच्या आधारे उत्तीर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच ज्यांना परीक्षा देऊन पदवी प्रमाणपत्र हवे आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी परीक्षेचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. त्याचप्रमाणे बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांसंदर्भातील निर्णय लवकरच जाहीर केला जाणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे परीक्षा न देता पदवी मिळू शकते, या मानसिकतेतून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेच्या तब्बल ११ हजार ५०० विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत.

द्वितीय व तृतीय वर्षाचे बॅकलॉगचे विषय राहिलेल्या विद्यार्थ्यांपैकी ४ टक्के विद्यार्थी दर वर्षी परीक्षा अर्ज भरत नाहीत. परंतु, यंदा या ४ टक्क्यांपैकी सुमारे २ टक्के विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे अर्ज केले आहेत. त्यात २०१४ व २०१५ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. परीक्षा न देता आपण उत्तीर्ण होऊ, असे या विद्यार्थ्यांना वाटत असले, तरी प्रत्यक्षात तसे होणार नाही, असेही विद्यापीठातील अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

### परीक्षा झाल्यावर विद्यापीठाने परीक्षा अर्ज का स्वीकारले ?

**1** कोरोनामुळे परीक्षा होणार आहेत किंवा नाहीत; याबाबत स्पष्टता नसताना विद्यापीठाने विद्यार्थ्यांकडून अर्ज स्वीकारण्याचा निर्णय का घेतला? या मागील तार्किता विद्यापीठाने समजून सांगितली पाहिजे.

**2** त्याचप्रमाणे केवळ विद्यापीठ अधिकार मंडळाच्या काही व्यक्तीच्या आग्रहामुळे परीक्षा अर्ज भरण्यास तीनवेळा मुदतवाढ का देण्यात आली, याचेही उत्तर विद्यापीठाने द्यायला हवे.

**3** विद्यापीठ अनुदान आयोग किंवा राज्य शासनाने परीक्षा न घेताच सर्वांचा निकाल जाहीर करण्याचे आदेश दिल्यास विद्यापीठ सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्काचे पैसे परत देणार का, असाही सवाल उपस्थित केला जात आहे.



### परीक्षेचा निकाल लांबणार...

- विद्यापीठाने उशीरापर्यंत विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज स्वीकारले आहेत. त्यामुळे विद्यापीठाला संलग्न महाविद्यालयांकडे संबंधित विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण मागावे लागत आहेत.
- परिणामी निकालाची प्रक्रिया पूर्ण करण्यास उशीर होत आहे. विद्यार्थ्यांचे गुण प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाला निकाल तयार करण्यासाठी सुमारे चार आठवडे लागतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा निकाल तयार करण्यास ऑगस्ट महिना उजाडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

Pune Main
Page No. 2 Jun 28, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education

### मूल्यांकनामुळे 'सीबीएसई'च्या तुलनेत राज्यमंडळाचे विद्यार्थी मागेच राहणार...

# अकरावीच्या प्रवेशावेळी यंदा वादाची चिन्हे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) आणि राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांमधील अकरावी प्रवेशाची स्पर्धा यंदाही वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे. मूल्यांकनाच्या पद्धतीतील तफावतीमुळे सीबीएसईचे विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेत आघाडीवर असतील, अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे.

'सीबीएसई'च्या विद्यार्थ्यांना परीक्षा न झालेल्या विषयांसाठी सर्वोत्तम गुण मिळालेल्या तीन विषयांच्या गुणांची सरासरी काढून गुण देण्यात येणार आहेत. राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांची भूगोलाची परीक्षा रद्द झाली. त्यासाठी सर्व विषयांच्या लेखी परीक्षेच्या गुणांची सरासरी काढून गुण देण्यात येणार आहेत. प्रवेशासाठी सर्वोत्तम पाच विषयांचे गुण गृहीत धरले तरीही सीबीएसईच्या विद्यार्थ्यांच्या गुणांच्या सरासरीनुसार पाच विषयांचे गुण ग्राह्य धरण्यात येणार आहेत. त्याचवेळी गुण मिळवण्यासाठी भाषांच्या तुलनेत सोप्या वाटणाऱ्या समाजशास्त्रात किती गुण मिळू शकतील, याबाबत अद्याप संदिग्धता आहे.



**तफावत कशी ?** सीबीएसई आणि राज्य मंडळ यांच्या मूल्यांकनातील तफावतीमुळे राज्य मंडळाचे विद्यार्थी मागे पडण्याची शक्यता मुख्याध्यापकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे यंदाही सीबीएसईच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत प्रवेशाच्या स्पर्धेत राज्य मंडळाचे विद्यार्थी मागे पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

**गेल्यावर्षी काय घडले ?**

गेल्यावर्षी राज्य मंडळाचा दहावीचा निकाल घटला होता. उत्तीर्णांचे प्रमाण कमी होण्याबरोबरच चांगले गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही कमी झाले. त्याचवेळी सीबीएसईच्या विद्यार्थ्यांचे निकाल वाढले. त्यामुळे विशेषतः मुंबईतील नामांकित महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी 'सीबीएसई'च्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याचे प्रमाण अधिक होते. त्यावर उपाय म्हणून महाविद्यालयांना दहा टक्के जागा वाढवून देण्याची वेळ आली होती.

paper.loksatta.com

लोकसत्ता Sun, 28 June 2020
https://epaper.loksatta.com/c/53067744

---

**लोकमत**

# ...तर विद्यार्थ्यांचे समाधान होणार नाही; राज्यपालांचे मत

**विशेष प्रतिनिधी** ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** परीक्षा न देता विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर त्यांना स्वत:ला खचितच समाधान लाभणार नाही असे नमूद करुन आजच्या युगात तंत्रज्ञानाचा वापर करुन परीक्षा घेणे व त्याकरिता ज्या विद्यार्थ्यांकडे संगणक नाही त्यांना संगणक पुरवून परीक्षा घेणे शक्य आहे, असे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी व्यक्त केले.

एकीकडे राज्य शासनाने अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेता सरासरी गुण देण्याचा निर्णय घेतला असताना राज्यपाल मात्र अजूनही परीक्षा घेण्यावर ठाम असल्याचे यामुळे स्पष्ट झाले. ऑनलाईन अध्यापनाकरिता नव-युगातील साधने या विषयावरील वेबिनारचे राजभवन येथून उद्घाटन करताना राज्यपाल बोलत होते.

करोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये तसेच उच्च शिक्षण संस्थांनी अध्ययन तसेच अध्यापनासाठी आधुनिक डिजिटल नव साधनांचा स्वीकार करावा. आयआयटीसारख्या संस्थांनी देखील ऑनलाइन अध्यापनाचा पर्याय स्वीकारला आहे. मात्र नवे तंत्रज्ञान सुसंवादी, प्रमाणित आणि व्यवहार्य आहे का याचा देखील साकल्याने विचार करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. कालप्रवाहानुसार अनेक गोष्टी बदलत असतात परंतू अध्यापनात काही गोष्टी शाश्वत असतात, असे सांगून नवतंत्रज्ञान स्वीकारताना शिक्षणातील शाश्वत मूल्ये जपली पाहिजेत, असेही मत राज्यपालांनी परीक्षेचा संदर्भ देताना मांडले.

चर्चासत्राच्या उद्घाटन सोहळ्याला विविध विद्यापीठांचे कुलगुरु, प्रकुलगुरु व शिक्षक उपस्थित होते.

Pune Main
Page No. 5 Jun 29, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020


## Section: Education

# 'स्वयं'चे कोर्स शिका आता मराठीसह आठ भाषांत

## देशातील ४० कोर्सची निवड; ग्रामीण विद्यार्थ्यांचाही फायदा

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २८ : पदवी प्राप्त करताना पूरक शिक्षणासाठी 'क्रेडिट कोर्स' करणे आवश्यक भाग बनत असताना, त्यात ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे पडत आहेत. इंग्रजीसह मातृभाषेतून हे शिक्षण मिळाल्यास त्यांनाही या प्रक्रियेत पुढे येता येईल, यासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालयाने पुढाकार घेतला आहे. देशात सर्वाधिक नोंदणी होणारे ४० क्रेडिट कोर्स मराठीसह आठ भाषांमध्ये अनुवादित केले जात आहेत.



सध्या 'स्वयं'वर ६०० पेक्षा जास्त ऑनलाइन कोर्स उपलब्ध आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत पुणे, नगर व नाशिक या तीन जिल्ह्यांत ग्रामीण भागात अनेक महाविद्यालये आहेत. येथील विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. अनेक विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षणामुळे अडथळे येत असल्याने ते ऑनलाइन कोर्स करण्यासाठी पुढे येत नाहीत. ही अडचण लक्षात घेऊन मनुष्यबळ विकास मंत्रालयाने 'स्वयं'वर सर्वाधिक जास्त नोंदणी झालेले ४० अभ्यासक्रम आठ भाषांमध्ये अनुवादित करण्याचे काम शैक्षणिक बहुमाध्यम संशोधन केंद्रांना (ईएमआरसी) दिले आहे. त्यामध्ये मराठीत भाषांतरित करण्याचे काम पुणे विद्यापीठातील 'ईएमआरसी' केंद्रांत सुरू आहे. सुमारे दीड महिन्यात ३० ते ४० टक्के भाषांतराचे काम पूर्ण झाले आहे, असे 'ईएमआरसी'चे निर्माता विवेक नाबर यांनी सांगितले.

### आठ भाषांमध्ये अनुवाद

'स्वयं'चे ४० ऑनलाइन कोर्स मराठी, तमीळ, हिंदी, तेलगू, गुजराती, बंगाली यासह आठ भाषांमध्ये अनुवाद केले आहेत. हे कोर्स संगणक विज्ञान, अन्नतंत्रज्ञान, व्यवस्थापन, औषधनिर्माण, न्याय वैद्यकशास्त्र, भूशास्त्र, मास कम्युनिकेशन अँड मीडिया व मानसशास्त्र या विषयांतील आहेत. या ४० पैकी बिझनेस एथिक्स, फायनान्स फॉर नॉन-फायनान्स, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट हे तीन कोर्स पुणे विद्यापीठाने तयार केले आहेत, असे समन्वयक श्रीकांत ठाकूर यांनी सांगितले.

### शिक्षण मातृभाषेत, उत्तर इंग्रजीत

ऑनलाइन कोर्स मराठीतून शिकविले जाणार आहेत

ग्रामीण भागातील काही विद्यार्थ्यांना इंग्रजीतून शिकविलेले पूर्ण कळत नसल्याने त्यांना ऑनलाइन कोर्स मराठीतून शिकविले जाणार आहेत. त्यामुळे त्यांची संकल्पना स्पष्ट होईल. पण, त्यांना या क्रेडिट कोर्सची परीक्षा देताना इंग्रजीतून पेपर लिहावे लागणार आहेत. मात्र, देशभरात यावर दीड महिन्यापासून काम सुरू असल्याने हे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होण्यास आणखी काही महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

**Sakaal: 29.6.2020**

लोकमत

# ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमधील न्यूनगंड वाढीचा धोका

दृष्टिकोन

**सविता देव हरकरे** । उप वृत्तसंपादक, लोकमत, नागपूर

**घरात** संगणक किंवा स्मार्टफोन नसल्याने ऑनलाईन शिक्षणवर्गात सहभागी होता आले नाही व पुढेही अशीच परिस्थिती कायम राहिली, तर आपले शिक्षण सुटेल या भीतीपोटी केरळमधील नवव्या वर्गात शिकणाऱ्या एका मुलीने आत्महत्या केली. त्यापाठोपाठ आता महाराष्ट्रात जळगाव आणि बीडमध्ये दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे धक्कादायक वास्तव पुढे आले आहे. जळगावात एका विद्यार्थ्याने ऑनलाईन अभ्यासाच्या ताणातून टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती मिळाली आहे, तर बीड जिल्ह्यात ऑनलाईन शिक्षणासाठी टॅब घेऊन न दिल्याने गळफास घेतला.

कोरोना महामारीच्या या काळात लॉकडाऊनमुळे सारा देश थांबला असताना शिक्षण क्षेत्र त्यातून सुटणार नव्हतेच. गेल्या अडीच-तीन महिन्यांपासून शाळा, महाविद्यालये बंद आहेत. परीक्षा ठप्प झाल्या. विद्यार्थ्यांच्या भविष्यावर याचा थेट परिणाम होत असल्याने यावर ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय तूर्तास निवडला आहे. झुम, वेबएक्स, गुगल मीट यांसारख्या व्यासपीठांचा वापर त्यासाठी केला जात आहे; परंतु खरोखरच ही व्यवस्था विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे काय? किंवा यातून शिक्षण देण्याचा मूळ उद्देश पूर्ण होईल काय? यासह अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत. त्याचे कारण असे की, आपल्या देशात ऑनलाईन शिक्षणाची ही संकल्पना शिक्षक, विद्यार्थी व पालकांसाठीही तशी नवखीच म्हणावी लागेल. त्यामुळे अचानक बदललेल्या या व्यवस्थेने विद्यार्थी भांबावले आहेत. त्यांना व पालकांनाही चिंता वाटते आहे. त्यातही ज्यांच्याकडे ऑनलाईन शिक्षणासाठीची संसाधने आहेत, त्यांचे कसेही निभून जाईल; पण ज्यांच्याकडे ती नाहीत त्यांचे काय? ते या ऑनलाईन शिक्षण व्यवस्थेत कसे टिकाव धरतील की, त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागेल, याचा विचार भविष्यात ऑनलाईन शिक्षणावर भर देताना होणे गरजेचे आहे.

यासंदर्भात पुण्यातील बालमजुरी विरोधी अभियान (सीएसीएल) या संस्थेने केलेला पाहणी अहवाल समोर आला आहे. त्यानुसार राज्यातील ६४ टक्के मुलांचा अभ्यास पूर्ण बंद आहे. कारण त्यांच्याकडे स्मार्टफोनसुद्धा नाहीत. संपूर्ण देशात हीच परिस्थिती आहे. दुसरीकडे काही कंपन्या मात्र ऑनलाईन शिक्षणाची भरभरुन प्रशंसा करीत आहेत. कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा लाभ घेत देशात ऑनलाईन शिक्षणाची बाजारपेठ वाढविण्याचे त्यांचे मनसुबे आहेत. भविष्यात असे घडले तर भारतासारख्या देशात जेथे सामाजिक आणि आर्थिक विषमता संपविणे अजूनही शक्य झालेले नाही, तेथे ऑनलाईन-ऑफलाईनच्या या नव्या स्पर्धेने या विषमतेत भर पडण्याची भीती आहे. शिक्षण क्षेत्रातील विषमता पराकोटीला पोहोचली आहे. दर्जेदार शिक्षणाचा हक्क केवळ श्रीमंतांनाच असल्याचा एक समज समाजमनात रुजला आहे. एखाद्या चांगल्या शाळेत दर्जेदार शिक्षण घेणे हे येथील गरिबांसाठी दिवास्वप्नच समजले जाते.

आपल्या मुलांना महागडे शिक्षण देण्याची ऐपत लाखो-करोडो गरीब पालकांची नाही. शिक्षणासाठीचा हा अवाढव्य खर्च मध्यमवर्गीयांचेही कंबरडे मोडणारा आहे. अशात ऑनलाईन शिक्षण हे शालेय शिक्षणाला पर्याय होऊ शकेल काय? दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, शाळेत जाऊन शिक्षण घेण्याची आपली परंपरा केवळ पुस्तकी ज्ञान मिळविण्यापुरती मर्यादित खचितच नाही. मुलांना एक चांगला नागरिक घडविणे, त्यांचा सर्वांगीण विकास करणे, त्यांच्यात सामाजिक व राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. शालेय शिक्षण व्यवस्थेत गुरु-शिष्य संबंध, सामूहिक शिक्षण घेताना एकमेकांच्या विचारांचा आदर, चर्चा या सर्वांचा एक वेगळाच आनंद आहे, जो मुलांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात मोलाची भूमिका वठवित असतो. ऑनलाईन शिक्षण पद्धतीत हा उद्देश एक टक्काही सफल होत नाही. त्यांचा शिक्षकांशी थेट संवाद होणार नाही. उलट यामुळे मुलांमधील न्यूनगंड मात्र आणखी वाढेल. सगळ्यात मोठा धोका म्हणजे ऑनलाईन शिक्षण प्रणालीवरील अवलंबित्व वाढल्यास देशातील मोठी लोकसंख्या शिक्षण व्यवस्थेतून बाहेर पडेल आणि त्याचे परिणाम समाजातील दुर्बल गटांना भोगावे लागतील. या तीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्येने त्याची जाणीव करुन दिली आहे. देशात ऑनलाईन शिक्षणावरुन वादंग सुरु असताना गडचिरोलीतील हेमलकसा आश्रमशाळेने मात्र कोरोना लॉकडाऊनच्या या काळात 'शिक्षण तुमच्या द्वारी' हा आगळावेगळा उपक्रम राबवून शिक्षणाला नवी दिशा दिली आहे. या उपक्रमांतर्गत शाळेतील शिक्षक गावागावांत जाऊन आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देत आहेत. तीन ते चार महिन्यांच्या सुट्टीनंतर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे आणखी नुकसान होऊ नये म्हणून लॉकडाऊनचे नियम शिथिल होताच हे शिकवणीवर्ग सुरु झाले. गावागावांत केंद्र स्थापन करण्यात आले. परिसरातील विद्यार्थी तेथे शिकायला येतात. मोकळ्या जागेत २० विद्यार्थ्यांचा एक वर्ग घेतला जातो. 'इच्छा तेथे मार्ग' असे म्हणतात. राज्यातही कोरोनाचा विळखा कमी होऊन लवकरच शाळा मुलांनी गजबजतील अशी आशा करुया.

फिजिकल डिस्टन्सिंगच्या सर्व नियमांचे पालन तेथे केले जाते. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाशी जुळवून ठेवण्यास हा उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरणारा आहे.

Pune Main
Page No. 4 Jun 30, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Education



Tuesday, June 30, 2020 | 5

# SPPU to soon have lectures in Marathi available online

**The project has been undertaken by Education Media Research Centre to help students from rural areas**

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

Savitribai Phule Pune University (SPPU) has started translating its popular courses and content in Marathi to overcome the discussion barrier and help students understand concepts better.

The project has been undertaken by Education Media Research Centre (EMRC).

There are almost 40 courses online which have been mapped by SPPU and available on Swayam, an online platform for e-courses for different faculties and departments. As the online modules of these courses are not being made in Marathi, this approach has been adopted, taking into consideration that many students in the university come from rural areas.

Vivek Nabar, information officer at EMRC, said, "There are courses from faculties like psychology, mass media, management, forensic, food science, among others, which are popular with students. We have chosen 40 courses in the first phase and 40 per cent of work to accomplish this goal has already been started."

While online courses are widely available and accessible, students from rural areas need some content in the regional language to understand concepts better. Under normal circumstances, when a concept is being taught in English in physical classrooms, students are free to ask questions and also discuss the same in a language they are more comfortable with for better understanding. Thus, to avoid creating a barrier in online classes, the same courses are being translated in Marathi.

FILE PHOTO

Almost 40 courses available online

Teachers from SPPU who are able to translate the courses in Marathi have already started doing it and the university has also invited volunteers to join the initiative who would be able to translate the content.

While Marathi is the language being focussed on as of now, there are also plans to translate courses into other languages like Tamil, Hindi, Telugu and Bengali.

Shrikant Thakur, coordinator, EMRC courses, said, "Students can also so indulge in discussion while they take these courses. While the discussion is important, the same is carried in classroom. To make students understand the same concepts, these translated lectures will be helpful."

Pratik Gudhati, a student of Economics from Indapur, said, "In classrooms, we usually request our faculties to discuss in Marathi for better understanding. Once the concept is understood, then it becomes easier for us to write in English. Even when regular lectures happened, there are a few remedial lectures which are taught in Marathi for most students who completed their graduation in Marathi. Similarly, if the same is given on online platforms, then it will help us who come from rural backgrounds."

Pune Mirror: 30.6.2020

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Contribution of Institutions towards the Society

hindustantimes

# SPPU, IISER to undertake epidemiological survey in city

Dheeraj Bengrut
puneletters@htlive.com

PUNE: The Pune Municipal Corporation (PMC) will undertake an epidemiological and serological surveillance project in the city within the civic limits.

The project will be undertaken by researchers at the Savitribai Phule Pune University's (SPPU) Interdisciplinary School of Health Sciences and Indian Institute of Science Education and Research (IISER), Pune.

As of Sunday, the city's Covid tally reached 12,474 and the overall death toll was at 510.

According to officials, the data from the survey will help the civic body in decision making and planning. Dr Aarti Nagarkar, director, SPPU's Interdisciplinary school of health sciences, said, "The survey will help us understand how many people have developed antibodies against Covid-19 infection. This proportion is important because this will give us an idea about the level of herd immunity in the community."

> Data collected during survey will help us make appropriate decisions.
> SHEKHAR GAIKWAD, PMC commissioner

"In phase 1 only in high-risk areas will be covered, where the proportion of cases to the population is high. For this, we have selected randomly five wards out of the 11 high-risk wards currently in Pune city. From this wards, we have identified 61 different locations and from each location, we will be collecting data of 25 random people around the location above the age of 18," said Dr Nagarkar.

"During the project, we have a one-page questionnaire which includes questions like travel history, among others. We will also be collecting 5ml blood of the persons," said Dr Nagarkar.

"The project will be done under the guidance of SPPU vice-chancellor prof Nitin Karmalkar," she added.

Shekhar Gaikwad, PMC commissioner, said, "The findings will provide an insight into the effectiveness of measures and initiatives taken by PMC to combat with Covid-19. It will help us to make appropriate decisions."

Hindustan Times: 23.6.2020

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Contribution of Institutions towards the Society

# विद्यापीठाची 'व्हर्च्युअल वारी'

## डिजिटल प्रबोधनासह सामाजिक उपक्रमांचे आयोजन




म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या (एनएसएस) स्वच्छ वारी - स्वस्थ वारी - निर्मल वारी - हरित वारीची परंपरा अखंडित राहण्यासाठी, 'एनएसएस'ने यंदा 'व्हर्च्युअल वारी' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यावरण व आरोग्यविषयक उपक्रमांवर याद्वारे भर दिला जाणार असून, २९ जून ते ४ जुलै या काळात असणारी 'व्हर्च्युअल वारी' होणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले आहे.

दर वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आषाढी वारीनिमित्त स्वच्छ वारी - स्वस्थ वारी - निर्मल वारी - हरित वारीचे आयोजन करण्यात येते. यंदा करोनाच्या संसर्गामुळे प्रत्यक्ष वारी पंढरपूरला जाणार नाही. त्यामुळे विद्यापीठाची १६ वर्षांची परंपरा असलेल्या 'स्वच्छ वारी - स्वस्थ वारी - निर्मल वारी - हरित वारी'बाबत राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ विभाग व विद्यार्थी उपक्रम समितीने महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन 'व्हर्च्युअल वारी'चे आयोजन केले आहे. त्यामुळे पर्यावरण व आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यावर भर दिला जाणार असून, जनजागृतीदेखील केली जाणार आहे.

'कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी उपक्रम समितीच्या सल्ल्यानुसार 'व्हर्च्युअल वारी'चे उपक्रम पार पडणार आहेत. लॉकडाउनचे सर्व नियम पाळून वारी यशस्वी करण्याचा विद्यार्थ्यांचा प्रयत्न आहेत. २९ जून ते ४ जुलै या काळात विविध उपक्रम घेतले जातील,' अशी माहिती 'एनएसएस'चे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी दिली.

**प्रमुख उपक्रमांची माहिती**

- **स्वच्छ वारी :** स्वच्छता व निर्जंतुकीकरण. 'कोव्हिड १९'बाबत जनजागृती.
- **स्वस्थ वारी :** रक्तदान व आरोग्य सर्वेक्षण.
- **निर्मल वारी :** उघड्यावर शौच आणि उघड्यावर थुंकण्यास प्रतिबंध करण्याबाबत डिजिटल प्रबोधन.
- **हरित वारी :** कार्यक्रम अधिकारी, प्राचार्य, संचालक, 'एनएसएस'चे विद्यार्थी आणि नागरिकांमार्फत प्रत्येकी किमान एक देशी वाणाचे फळझाड लावून घेणे आणि त्याचे वर्षभर संगोपन करण्यास त्यांना प्रोत्साहित करणे.

दर वर्षी आपण प्रत्यक्ष वारीत सहभागी होतो. यंदा त्याऐवजी व्हर्च्युअल वारीद्वारे लॉकडाउनचे सर्व नियम पाळून सामाजिक उपक्रम राबवले जाणार आहेत. किमान एक लाख फळझाडे लावणे, त्याचे संगोपन करणे व भौगोलिक आरेखन हा त्यातील एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

– डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



**Maharashtra Times : 27.6.2020**

लोकमत

# विद्यापीठ रासेयोकडून राज्यस्तरीय वारीचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोनामुळे वारीबाबत शासकीय स्तरावर महत्त्वपूर्ण निर्णय होऊन वारीमार्गावर प्रत्यक्ष वारीचे नियोजन होणार नाही. तरीही १६ वर्षांची परंपरा असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आषाढी वारीनिमित्त 'स्वच्छ वारी-स्वस्थ वारी-निर्मल वारी-हरित वारी'बाबत राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ विभाग व विद्यार्थी उपक्रम समितीने महत्त्वपूर्ण असा निर्णय घेतला आहे.

लॉकडाऊनचे सर्व नियम पाळून २९ जून ते ४ जुलैदरम्यान अत्यंत प्रभावी पद्धतीने आयोजन केले जाणार आहे. स्वच्छ वारी-स्वच्छता व निर्जंतुकीकरण तसेच कोविड-१९ बाबतीत जनजागृती, स्वस्थ वारी-रक्तदान व आरोग्य सर्वेक्षण, निर्मल वारी-उघड्यावर शौच प्रतिबंध व उघड्यावर थुंकणे प्रतिबंध याबाबत डिजिटल प्रबोधन, हरित वारी- प्रत्येक रासेयो विद्यार्थी, कार्यक्रम अधिकारी, प्राचार्य, संचालक व नागरिकांमार्फत प्रत्येकी किमान एक देशी वाणाचे फळझाड लावणे व त्याचे वर्षभर संगोपन करणे आदी उपक्रम राबवणार आहेत.

दरवर्षी आपण प्रत्यक्ष वारीमध्ये सहभागी होत होतो. त्याऐवजी या वेळी आपण 'व्हर्च्युअल वारी'मधून लॉकडाऊनचे सर्व नियम पाळून सामाजिक उपक्रम राबवून वारीमध्ये सहभागी होणार आहोत. किमान १ फळझाड आणि त्याचे संगोपन व भौगोलिक आरेखन हा त्यापैकीच एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

-डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Main
Page No. 2 Jun 27, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Contribution of Institutions towards the Society

# विद्यापीठाकडून यंदा आभासी वारीचे आयोजन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोना विषाणू संसर्गामुळे यंदा आषाढी वारी न करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आभासी पद्धतीने (व्हर्च्युअल) वारी आयोजित केली असून, त्या अंतर्गत आजपासून ४ जुलैपर्यंत विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. संतोष परचुरे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, प्रसेनजित फडणवीस, डॉ. संजय चाकणे, अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर, वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर आदी या वेळी उपस्थित होते. आज (२९ जून) या उपक्रमाचे उद्घाटन होईल.

कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, की यंदा प्रत्यक्ष वारीचे आयोजन करता येणार नाही. पण या काळात विद्यार्थ्यांनी निराश न होता उपक्रमशील राहाण्यासाठी, त्यांचे मनोबल उंचावण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांनी शिकतानाच समाजाभिमुख असणेही आवश्यक आहे.

'या वारीमध्ये विद्यापीठाचे किमान एक लाख विद्यार्थी सहभाग नोंदवण्याची अपेक्षा आहे. त्याशिवाय राज्यभरातील अन्य विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनाही यात सहभागी होता येईल. वारीतील उपक्रमांचे विद्यापीठाच्या समितीकडून मूल्यांकन करण्यात येईल. २३ जुलैला आभासी पद्धतीने पारितोषिक वितरण होईल,' असे पांडे यांनी सांगितले. विद्यापीठाचे संकेतस्थळ, यूट्यूब वाहिनी आणि फेसबूकद्वारे वारीचे प्रक्षेपण केले जाईल.

### वारीतील उपक्रम...

**संसर्ग टाळण्यासाठीचे सर्व नियम पाळून व्हर्च्युअल वारीच्या माध्यमातून स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण, करोना विषाणूबाबत जागृती, रक्तदान आणि आरोग्य सर्वेक्षण, उघड्यावर शौच आणि थुंकण्याला प्रतिबंध करण्यासाठी डिजिटल प्रबोधन, एनएसएसचे विद्यार्थी, कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक आणि नागरिकांकडून किमान एक देशी वाणाचे झाड लावून त्याचे संगोपन आदी उपक्रम व्हर्च्युअल वारीदरम्यान करण्याचे नियोजन विद्यापीठाकडून करण्यात आले आहे.**

लोकसत्ता Mon, 29 June 2020
https://epaper.loksatta.com/c/53084349

लोकमत

## विद्यार्थी राबविणार विविध सामाजिक उपक्रम : एक लाख देशी फळझाडांची लागवड करणार

# विद्यापीठाच्या 'व्हर्च्युअल वारी'ला सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ विभागातर्फे आयोजित 'स्वच्छ वारी-स्वस्थ वारी-निर्मल वारी-हरित वारी' या व्हर्च्युअल वारीची सोमवारी (दि. २९) ऑनलाईन सुरुवात केली. यामध्ये विद्यार्थी आपल्या भागात विविध सामाजिक उपक्रम राबविणार आहेत.

विद्यार्थी दर वर्षी प्रत्यक्ष वारीमध्ये सहभागी होतात. यामध्ये खंड पडू नये म्हणून यावर्षी व्हर्च्युअल वारीची संकल्पना पुढे आली. कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते या वारीचे उद्घाटन केले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. संतोष परचुरे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई उपस्थित होते.



'व्हर्च्युअल वारी'चे उद्घाटन करताना डॉ. नितीन करमळकर व इतर मान्यवर.

ललित केंद्र विभागाच्या गुरुकुल शाखेतील विद्यार्थ्यांनी भक्तिरंग कार्यक्रम सादर केला. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराममहाराज व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन केले.

करमळकर म्हणाले, की कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निराशेच्या गर्तेत गेलेला विद्यार्थी व इतर समाज घटकांना बाहेर काढण्याचे काम या वारीतून यंदा विद्यार्थी करणार आहेत. या वारीमुळे एक सकारात्मक वातावरण निर्मिती तयार होऊन कोरोनामुळे संभ्रमावस्थेत असणारे विद्यार्थी त्यातून बाहेर येतील.

एक लाख देशी फळझाडांची लागवड व संगोपनाचा संकल्प केला आहे. सर्व स्वयंसेवक विद्यार्थी यंदाच्या वारीमध्ये सहभाग नोंदविणार आहेत.

Pune Main
Page No. 2 Jun 30, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Miscellaneous

### शहर स्थिरावतेय



'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांमध्ये विश्वासार्हता आहे. कोणत्याही प्रकारचे उथळ लेखन नसून, सविस्तर अभ्यास करून बातमी प्रसिद्ध केली जाते. त्यामुळे बातमीला एक वजन असते. त्यातही 'मटा'तील बातम्यांमध्ये अन्यायाला वाचा फोडणारे ताकदीचे लेखन असते.

– डॉ. नितीन करमळकर,
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

आम्ही 'महाराष्ट्र टाइम्स' नियमित वाचतो. 'मटा'मुळे शैक्षणिक घडामोडी ते राजकीय घडामोडींपर्यंतची सविस्तर माहिती आमच्यापर्यंत पोहोचते. बातमीमागची बातमी 'मटा' वाचकांपर्यंत पोहोचवतो. यापुढेही ही वाटचाल, अशीच अविरत सुरू राहण्यासाठी शुभेच्छा!

– डॉ. गजानन एकबोटे,
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी



**Maharashtra Times: 17.6.2020**

लोकमत

# कोरोनाबाबतचे पहिलेच पुस्तक मायमराठीत!

## डॉ. नितीन करमळकर : 'ड्रॅगनचे कोरोनास्त्र' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाबाबत लोकांच्या मनात अनेक प्रश्न असून गैरसमज अधिक आहेत. गैरसमजामुळे विनाकारण भीती निर्माण होत असून ती दूर करण्याचे काम 'ड्रॅगनचे कोरोनास्त्र' हे पुस्तक करेल, यात तीळमात्र शंका नाही. ड्रॅगनचे कोरोनास्त्र हे कोरोनाबाबतचे पहिलेच पुस्तक आणि तेही आपल्या मायमराठीत लिहिले गेल्याने अभिमानाने ऊर भरून आला असून हा खऱ्या अर्थाने दुग्धशर्करायोगच म्हणावा लागेल, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी मंगळवारी केले.

ज्येष्ठ पत्रकार अरविंद व्यं. गोखले व वासुदेव कुलकर्णी लिखित व श्री गंधर्व-वेद प्रकाशित ड्रॅगनचे कोरोनास्त्र या पुस्तकाचे प्रकाशन करमळकर यांच्या हस्ते पुणे विद्यापीठात झाले. यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी अर्थतज्ज्ञ अभय टिळक, ज्येष्ठ पत्रकार अरविंद व्यं. गोखले, प्रकाशक दीपक व प्रकाश खाडीलकर, आदी उपस्थित होते.



'ड्रॅगनचे कोरोनास्त्र'चे प्रकाशन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते विद्यापीठात मंगळवारी पार पडले. यावेळी दीपक खाडीलकर, डॉ. करमळकर, लेखक अरविंद व्यं. गोखले, प्रकाश खाडीलकर आणि अभय टिळक आदी.

### सोशल डिस्टन्सिंग नव्हे, हे फिजिकल डिस्टन्सिंग

- कोरोनापासून बचाव करण्याकरिता सोशल डिस्टन्सिंग पाळा, असे सर्रासपणे वापरले जाते. परंतु, 'सोशल डिस्टन्सिंग' हा शब्द चुकीचा असून 'फिजिकल डिस्टन्सिंग' हा शब्द बरोबर आहे. सोशल डिस्टन्सिंग राखा याचा अर्थ 'सामाजिक अंतर ठेवा' असा होतो. तर फिजिकल डिस्टन्सिंग म्हणजे दोन माणसांमध्ये सुरक्षित अंतर ठेवा असा होतो. समाजात आधीच तेढ निर्माण होत असताना सोशल डिस्टन्सिंग हा चुकीचा शब्द आपण सर्वांनीच टाळायला हवा, असे करमळकर यांनी नमूद केले.

गोखले म्हणाले, विज्ञानाशी निगडित माणसाच्या हातून पुस्तकाचे प्रकाशन झाले, हे मी माझे भाग्यच समजतो.

ड्रॅगनचे कोरोनास्त्र हे शिवधनुष्य मी एकट्याने पेलले नसून टीमवर्कमुळे अवघ्या १७ दिवसांत ते लिहून व छापून पूर्ण झाले, याचे श्रेय सर्वांनाच जाते.

Hello Pune
Page No. 3 Jun 19, 2020
Powered by: erelego.com

# NEWS PAPER CLIPPINGS DURING JUNE 2020

## Section: Miscellaneous

पुढारी

### मनोहारी सोहळा...



काही अंशी ढगाळ वातावरण असतानाही रविवारी पुण्यातील नागरिकांना खंडग्रास सूर्यग्रहणाचा आनंद घेता आला. जवळपास साडेतीन तासांच्या कालावधीत ग्रहणाच्या विविध स्थितींचे हे छायाचित्र.

Pune Edition
22 Jun, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# सचित्र 'विष्णू अवतार' हस्तलिखिताची प्रत उपलब्ध

## २२ वर्षांनी जपानहून पुण्यामध्ये दाखल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुस्तकामध्ये वापरण्यासाठी जपान येथे नेण्यात आलेले 'विष्णू अवतार' हे सचित्र हस्तलिखित पत्रव्यवहारानंतर २२ वर्षांनी पुण्यामध्ये दाखल झाले आहे. तब्बल ६० चित्रांचा समावेश असलेले 'विष्णू अवतार' हे हस्तलिखित सुमारे दीडशे वर्षांपूर्वीचे आहे.

टेंभुर्णीजवळील (जि. सोलापूर) सापटणे या गावी भालचंद्र जोशी यांच्याकडे असलेले 'विष्णू अवतार' हे सचित्र हस्तलिखित १९९८ मध्ये भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेला मिळाले होते. यामध्ये विष्णूच्या राम, कृष्ण आणि परशुराम अशा अवतार कथा खास मराठमोळ्या शैलीमध्ये रंगविलेल्या होत्या. या हस्तलिखितामधील चित्रांतील महिला नऊवारी साडीमध्ये, तर पुरुष धोतर आणि बंडी या पेहरावामध्ये दाखविण्यात आले होते, अशी माहिती भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे माजी ग्रंथपाल आणि प्राचीन हस्तलिखितांचे अभ्यासक वा. ल. मंजूळ यांनी दिली.



जपानमधील टोयो विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या प्रा. शिमिझू यांनी १६४८ मधील सचित्र भागवत पुराणाचे पुस्तक भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे तत्कालीन मानद सचिव आणि ज्येष्ठ प्राच्यविद्या संशोधक डॉ. रा. ना. दांडेकर यांच्या संमतीने प्रकाशित केले होते. त्यासाठी त्यांना 'युनेस्को'च्या जपान शाखेचे अर्थसाह्य लाभले होते. त्यानंतर प्रा. शिमिझू यांनी त्यांच्या संशोधन कार्याचे पुस्तक करण्यासाठी 'विष्णू अवतार' या सचित्र हस्तलिखिताची छायाचित्रे टिपली होती. एका दुर्दैवी घटनेनंतर भांडारकर संस्थेच्या ग्रंथालयात हे हस्तलिखित नसल्याची माहिती मिळाल्याचे मंजूळ यांनी सांगितले.

वर्षभरापूर्वी प्रा. शिमिझू यांच्याशी पत्रव्यवहार करून त्यांनी नेलेली छायाचित्रे तसेच निर्मिती करण्यात आलेला ग्रंथ पाठवावा, अशी विनंती मी केली होती, असे मंजूळ यांनी सांगितले. हा ग्रंथ काही प्रसिद्ध झाला नाही, पण त्यांनी टिपलेली हस्तलिखिताची पृष्ठे आणि त्यातील छायाचित्रे रंगीत झेरॉक्स स्वरूपात परत पाठविली. त्यामुळे दुर्मीळ असलेले हे सचित्र हस्तलिखित २२ वर्षांचा प्रवास करून पुण्याला पोहोचले, असेही मंजूळ यांनी सांगितले.

लोकसत्ता Tue, 30 June 2020
https://epaper.loksatta.com/c/53102284





## *कोरोना योद्धा शहीद अनिल पवार अमर रहे...जय हिंद..*

**श्री. अनिलदा पवार वरिष्ठ पोलिस निरीक्षक वाहतूक शाखा ठाणे ग्रामीण** यांचे नुकतेच कोरोनाशी लढा देत असताना से व्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी ईस्ट मुंबई येथे ऊपचार सुरू असताना दुःखद निधन झाले.

अनिल पवार हे कोरोना योद्धा होते व ते आपली सेवा करताना शहीद झाले. त्यांनी आपले प्राण आपल्या सेवेसाठी व देशासाठी कुर्बान केले.

पोलिस निरीक्षक अनिल पवार हे पुण्याचे रहिवाशी, मॉडर्न कॉलेज चे माजी विद्यार्थी ( मॉडर्न श्री विजेते ) होते....अनिल चे मृत आत्म्यास चिरशांती लाभो व त्यांच्या कुटुंबीयास हे दु:ख सहन करण्याची ताकद ईश्वर देवो अशी प्रार्थना करूया.






*Other than the College Photos, Event Photos, newspaper clipping images, all other mages in this Bulletin Issue are downloaded from Google Images.*
*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.*

Image Courtesy: https://www.pinterest.com/pin/432486370437580636/